
साप्ताहिक
# माणूस
४ डिसेंबर '८२
दोन रुपये



दानं संविभागः



## प्रेरणा चिपकोची... भटकंती उत्तराखंडाची!

## अंधश्रध्दा, भोंदूगिरी?
## विज्ञानानिष्ठा
ण पॅरासायकॉलॉजीचं काय?

साप्ताहिक

# माणूस

¤

वर्ष : बाविसावे

अंक : पंचविसावा २७

¤

४ डिसेंबर १९८२

किंमत : दोन रुपये

¤

संपादक

श्री. ग. माजगावकर

¤

सहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

¤

वार्षिक वर्गणी

पन्नास रुपये

¤

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

¤

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

पत्ता :

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव, पुणे ३०

दूरध्वनी : ४४३४५९

¤

मुखपृष्ठ

सुभाष अवचट

# अ-सरकारी विनोबा 'असर'कारी

विनोबांनी देहत्याग केला त्याच दिवशीच्या टाइम्स ऑफ इंडिया-मध्ये बिहारातील सध्याच्या दुष्काळ-स्थितीबद्दलचे जनकसिंग यांचे एक खास वार्तापत्र प्रसिद्ध झाले आहे. बोधगयेपासून पसतीस किलोमीटर अंतरावर असलेल्या इमामगंज भागातील लोटुवा खेड्यातील उपासमारीची अवस्था त्यात सांगितली आहे. हा भाग डोंगराळ व दुर्गम असल्याने एरवीची तिथली स्थितीही हलाखीची; पण वार्तापत्र म्हणते : १५–२० वर्षांपूर्वी भूदान चळवळीत बऱ्याच शेतमजूर व हरिजनांना या ठिकाणी जमिनी मिळाल्या. एक सर्वोदय केंद्र स्थापन झाले. या केंद्राच्या मदतीने शेतमजूर व हरिजनांनी विकासाची नवी वाटचाल सुरू केली. या मागासलेल्या व उपेक्षित भागाला, केंद्र हे एक आशेचे किरण ठरले होते; पण जयप्रकाशांच्या निधनानंतर केंद्राचे काम थंडावले व आता पूर्वीसारखाच या सर्व भागात सर्वत्र अंधार पसरलेला आहे. चालू वर्षी भूकबळी पडेपर्यंत स्थिती आली तरी सरकारी यंत्रणा व इतर कुणाचेच या भागाकडे अद्याप लक्ष गेलेले नाही...

[ "It was 15 to 20 years ago that a large number of landless labourers, Harijans and others settled in the valley on land received in donation during Acharya Vinoba Bhave's Bhoodan movement. They began life on a happy note despite the rocky terrain. Workers of a Sarvodaya ashram, set up in the area, helped them in creating an oasis of happiness amid jungles. Under the ashram's auspices a number of road building, soil conservation and soil reclamation projects were launched to offer employment opportunities to the settlers......

"With Mr. Jayaprakash Narayan's death the Sarvodaya movement in Bihar has virtually become extinct. The sprawling ashram, which used to hum with life and was a symbol of hope for the downtrodden in the valley has been closed for lack of funds"

—*Times of India*

November 15, 1982 ]

केवळ बिहारातच नाही, विनोबांच्या भूदान संचाराच्या काळात अशी केंद्रे भारतात ठिकठिकाणी स्थापन झालेली होती. विश्वसनीय आकडेवारी उपलब्ध नाही; पण प्रत्येक प्रांतात भूदाने झाली, हरिजनांना-शेतमजुरांना जमिनी मिळाल्या हे सत्य आहे. विनोबांची चळवळ या टप्प्यावरच थांबली असती, तिने मिळालेले भूदान कायदेशीररीत्या पक्के केले असते, तेथे विकासकार्यक्रम राबवले असते तर या चळवळीला पुढे जे वैफल्य आले ते आले नसते. पण विनोबांनी भूदान सोडून एकदम ग्रामदानावर उड्डाण केले. ही झेप फार मोठी होती व सर्वोदयी कार्यकर्त्यांना, सर्व सेवा संघाला ती न पेलणारी ठरली. अहिंसक आर्थिक-सांस्कृतिक क्रांतीचा हा एक अभूतपूर्व प्रयोग होता; पण वास्तवाचा त्याला आधार नव्हता. विनोबा या काळात एखाद्या प्रेषितासारखे वावरत होते.

विचारांच्या, संकल्पांच्या नव्या नव्या, उंच उंच भराऱ्या घेत होते. ओरिसामध्ये त्यांना कोरापुट हा सबंध जिल्हाच दान मिळाला. त्यांनी संपूर्ण बिहारदानाचीच मागणी केली ! कोरापुटच्या जिल्हादानामागची वस्तुस्थिती काय होती हे मागे वळून पाहायला त्यांना फुरसतच नव्हती! कोरापुट हे ग्रामदानक्रांतीचे मक्का-मदिना-मॉस्को आहे असा त्या काळी सर्वत्र बोलवाला झाला होता. अण्णासाहेब सहस्रबुद्धे याच्यासारखी अनुभवी व अधिकारी व्यक्ती कोरापुटमध्ये ठाण माडून बसली होती. पण पुढे पाठ आणि मागे सपाट ! अण्णासाहेबांना निराश होऊन परतावे लागले व ग्रामदान-सर्वोदयाचे तीर्थस्थान ठरण्याऐवजी कोरापुट हे या चळवळीचे स्मशान ठरले ! (जिज्ञासूंनी या प्रयोगाची चिकित्सा करणारे 'ग्रामदानाची प्रयोगभूमी' हे श्री. ग. माजगावकर याचे पुस्तक व या पुस्तकाला डॉ.धनंजयराव गाडगीळ यांनी लिहिलेली प्रदीर्घ प्रस्तावना यासाठी वाटल्यास पहावी.) दोष विनोबांकडे जातो तसा त्यांच्या जयप्रकाशांसारख्या अनुयायांकडेही जातो. जमिनीवर कुणीच त्या काळात वावरायला, स्थिर व्हायला तयार नव्हते. भूदानाची पहिली पायरी पक्की झाल्याशिवाय ग्रामदानाच्या पुढच्या पायरीकडे झेप घ्यायला अनुयायांनी तरी वेळीच नकार द्यायला हवा होता. असे न केल्याने शेवटी दोन्ही पायऱ्यांवरचा तोबा निसटला, चळवळ पतंगासारखी आकाशात भरकटत राहिली आणि कुठल्या तरी झाडावर अडकून पतंगाचा जो शेवट होतो तसा या चळवळीचाही झाला ! श्रीमंतांकडून, जमीनदारांकडून गरिबांकडे जमिनी हस्तांतरित करण्याचे काम हे तसे द्रोणागिरी उचलण्याइतकेच महाकठिण काम आहे. सर्व सत्ता हाती असून, अनेक कायदे करून अद्याप ते शासनालाही पूर्णपणे जमलेले नाही. मग ते शासन कॉंग्रेसचे, जनता पक्षाचे वा कम्युनिस्टांचे—कोणत्याही पक्षाचे असो. जमीनवाटपाचा कार्यक्रम हा कुठेही ५०–६० टक्क्यांपेक्षा अधिक यशस्वी ठरलेला नाही. कत्तल आणि कायदा हे दोन्ही मार्ग जेथे अपुरे ठरले तेथे विनोबाचा करुणामार्ग अपुरा ठरणे अपेक्षितच होते. तरीपण ग्रामदानाची भलती उडी न घेता भूदानापर्यंतच्या टप्प्यावरच आपली पकड या चळवळीने मजबूत केली असती तर पुढचा दारुण भ्रमनिरास टळला असता. पण प्रेषिताला हे कोणी सांगावयाचे ? तो एखाद्या धूमकेतूसारखा अचानक उगवतो-संचारतो आणि कोसळतोही तितक्याच अचानकपणे. भूदान-ग्रामदान-चळवळ अशी उगवली आणि कोसळली.मात्र,कोसळली तरी तिने आकाश उजळून-प्रकाशून टाकले होते, क्षितिजे विस्तारली होती हे खरेच आहे. पुढे हा प्रकाश मावळला, क्षितिजे अंधारली हेही खरेच आहे. तरीपण प्रकाशदूताचे विस्मरण कसे होणार ? स्वातंत्र्यानंतर जमिनीच्या प्रश्नाकडे साऱ्या देशाचे लक्ष वेधणारा विनोबा हा पहिला दार्शनिक होता ही वस्तुस्थिती चळवळीच्या यशापयशामुळे बदलत नाही....आणि अजून तरी हा प्रश्न कुठे धडपणे सुटला आहे ? विनोबांचे यश अल्प असेल; पण आहे ते मौलिक स्वरूपाचे आहे. शंभर टक्के यश नाही तरी कुणाला मिळालेले आहे ?

---

श्री. ग. मा.

---

'दानं संविभागः' ही शंकराचार्यांची 'दान' या शब्दाची 'समविभाजन' ही व्याख्या विनोबांनी प्रमाण मानून भूदान मागितले तरी चळवळीचा एकूण भर समानभावापेक्षा हृदयपरिवर्तनावर होता.जमीन बाळगणाऱ्याच्या सद्भावनेला, बंधुत्वाला यात आवाहन होते. ऋषितुल्य विनोबा काही मागत होते, भलेपणाने ते दिले जात होते. देणाऱ्याला हा दानमार्ग अपरिहार्य ठरलेला नव्हता. फक्त घेणाऱ्याचेच त्यामुळे काही कल्याण होणार होते. मोठमोठी आर्थिक-राजकीय परिवर्तने अशा परिस्थितीत घडून येत नाहीत. आपल्याला स्वातंत्र्य केव्हा मिळाले ? ४२ चा देशातर्गत उठाव,नाविकाचे बंड,आझाद हिंद सेनेची उभारणी ही एक बाजू झाली; पण ब्रिटिशांना महायुद्धानंतर हिंदुस्थानची वसाहत सांभाळणे अवघड व बिनफायदेशीर ठरणार होते, म्हणून ते सत्तांतर करण्यास तयार झाले. तशी स्थिती भूदान चळवळीच्या काळात जमीनधारकवर्गाची झालेली नव्हती आणि हरिजन-शेतमजूरवर्गही संघटित नव्हता. म्हणून भूदान चळवळ निर्णायक स्थितीपर्यंत पोचू शकली नाही. काळ टंचाईचा होता. जमीन किंवा इतर मालमत्ता बाळगणे बिनफायद्याचे ठरलेले नव्हते. तेलंगणातील सशस्त्र उठाव, कुळकायद्यासारखे जमीनपुनर्वाटपाचे कायदे होऊनही जमीनदारवर्ग जमिनी सोडायला तयार नव्हता; मग विनोबांच्या नैतिक आवाहनाला तो कितीसा दाद देणार ? जमिनी सोडून देण्यातच आपला फायदा आहे हे त्याला कळल्याशिवाय या तीनही मार्गांपैकी कुठलाच मार्ग पूर्णपणे यशस्वी ठरणार नाही हे उघड आहे. अल्प उत्पादन, टंचाईची स्थिती, वस्तूंची कमतरता असताना मालमत्ता

कुणालाही जवळ बाळगावीशीच वाटणार. तो सोडून देणे अशा वेळी फायदेशीर ठरत नसते. अशी परिस्थिती विपुलतेच्या, अतिरिक्त उत्पादनाच्या काळातच संभवू शकते. म्हणून, तेव्हा जरी भूदान चळवळ अल्पयशी ठरली तरी भावी काळात विनोबांचा दानमार्ग पुन्हा प्रचलित होणारच नाही असे समजण्याचे कारण नाही. आपले अर्थशास्त्रज्ञ, राजकीय नेते उत्पादनवाढीची आवाहने नेहमी करीत असतात; पण सध्या पुढारलेल्या पाश्चिमात्य देशात व आपल्याकडेही उत्पादनवाढ हा शाप ठरू पाहात आहे. उत्पादन विपुल आहे, बाजारपेठा नाहीत हे सध्याचे खरे दुखणे आहे. मुंबईच्या कापडगिरण्या दहा महिने बंद आहेत. तरी बाजारात कापडाचा तुटवडा नाही, हे कशाचे लक्षण आहे? जर कापडाला बाजारपेठा असत्या तर दहा महिने गिरणीमालक थांबलेच नसते! तडजोड करून त्यांनी गिरण्या केव्हाच सुरू केल्या असत्या. कारण त्यांचा मतलब फायद्याशी, ताळेबंदाशी असतो. गिरण्या बंद राहणे मालकांना-सरकारला सध्या फायदेशीर आहे म्हणून संप मिटवायला कुणीच फारसे उत्सुक नाही! मागणी नाही म्हणून आपली व इतर देशांचीही अर्थव्यवस्थाही मंदीच्या संकटात सध्या सापडलेली आहे. मागणी वाढायची तर संपत्तीचे पुनर्वाटप आवश्यकच आहे. मग ते लॉर्ड कीन्सचा सल्ला घेऊन करा, मार्क्सची मदत घ्या किंवा विनोबांचे ऐका. वाटप केल्याशिवाय फाज़ील व अतिरिक्त उत्पादनामुळे निर्माण झालेली कोंडी फुटणार नाही. भांडवलशाही देशांनाच ही कोंडी जाणवते असे नाही. आपले अतिरिक्त उत्पादन—मग ती शस्त्रास्त्रे असोत किंवा गरजेच्या वस्तू असोत—समाजवादी देशही अविकसित देशांच्या माथी मारतच असतात. त्यासाठी कर्जे देऊन अविकसित देशांना खरेदीदार बनवण्यात येते. कर्जे कधीच फिटत नाहीत म्हणून नवीन कर्जे! यातून प्रथम आर्थिक नंतर राजकीय गुलामगिरी—परावलंबन! असे हे सगळे एक दुष्टचक्र! यातून बाहेर पडायचे असेल तर विनोबांचा दानमार्ग हा एक सरळचा उपाय. वाटल्यास विनाअट दान द्या नाही तर गेला उडत, असे अविकसित लोकसमूहांनी म्हणायला हवे. न देऊन जाणार कुठे? कारखाने बंद ठेवायचा पर्याय नाही तर स्वीकारावा लागेल. मंदीची कोंडी एरवी फुटणारच नाही.

¤

औद्योगिक प्रतिष्ठानांची संख्या अलीकडे खूप वाढली आहे.

स्वयंसेवी संस्थांच्या कार्यालाही मान्यता लाभत आहे.

ही विनोबाप्रणीत दानमार्गावरचीच वाटचाल नाही का?

### बहिष्काराचे अस्त्र

कन्याकुमारीच्या ज्या शिलाखंडावर विवेकानंदांना साक्षात्कार झाला त्याच शिलाखंडावर उभे राहून, सूर्यनारायणाच्या साक्षीने विनोबांनी ग्रामस्वराज्यसंस्थापनेसाठी जीवन व्यतीत करण्याची प्रतिज्ञा घेतली होती. भूदान आंदोलन हे या प्रतिज्ञापूर्तीचा एक भाग होता. ग्रामस्वराज्य हे काही एक। दोन पिढ्यात, दोन। चार दशकात साध्य होणारे ध्येय नव्हे. जगभर सगळीकडे केंद्रीकरण, शहरीकरण होते आहे. ग्रामस्वराज्य हे नेमके याविरुद्धचे टोक आहे. हुकुमशाही सत्ता आणि बळकट पक्षसंघटना हाताशी असून चीनमध्ये माओलाही या टोकाच्या जवळ जाता आले नाही. मग एकाकी, विनोबा या टोकापासून शतयोजने दूरच राहिले यात आश्चर्य कसले? सध्याच्या शहरी औद्योगिकरणाची कोंडी पूर्ण झाल्याशिवाय या दुसऱ्या टोकाकडची वाटचाल खऱ्या अर्थाने सुरूही होणार नाही. उद्या शहरातील उद्योगधंद्यांना बाजारपेठाच नाहीत म्हटल्यावर आपोआप नव्या मार्गाचा, नवनियोजनपद्धतींचा शोध सुरू होईल व ग्रामस्वराज्याचे आंदोलन पुढे सरसावेल. विनोबांनी शहरी मालावर ग्रामीण जनतेने बहिष्कार पुकारावा असे अनेकदा आवाहन केले होते; पण गोहत्याबंदीसाठी जसा त्यांनी आग्रह धरला, त्यासाठी उपोषणे केली, त्यांच्या अनुयायांनी सत्याग्रह केले तसा पाठपुरावा त्यांनी याबाबतीत केला नाही. जे उद्योगधंदे विकेंद्रित पद्धतीने ग्रामीण भागात चालू शकतात त्यांनी शहरात गर्दी करण्याचे कारणच काय? उदाहरणार्थ खतांचा उद्योग. एक तर रासायनिक खते तारक की मारक हा वाद आहेच. ही खते उपयुक्त मानली तरी आपल्यासारख्या शेतीप्रधान देशांनी स्वतंत्र होऊन पसतीस वर्षे उलटल्यावरही रासायनिक खते परदेशांतून आयात करावीत काय, हा पुढचा प्रश्न. निदान परदेशातून आयात केलेल्या रासायनिक खतांवर तरी ग्रामस्वराज्यवादी मंडळींनी तावडतोब बहिष्कार पुकारायला हवा. भूदानाला, विधायक कार्याला अशी बहिष्कार—आंदोलनाची जोड द्यायला हवी. पूर्वी स्वदेशीचे आंदोलन झाले. परदेशी कापडाच्या होळ्या झाल्या. आता निदान परदेशी खतांच्या होळ्या तरी व्हायला हव्यात. नुकतीच पुणे येथे सर्वोदयी नेते आणि शरद जोशीप्रणीत शेतकरीसंघटना यांच्यात समान

कार्यक्रमाबाबत काही बोलणी झाली. शेतकरी संघटनेच्या शेतमालाला किफायतशीर भाव मिळाले पाहिजेत या एक कलमी कार्यक्रमाला सर्वोदयवाद्यांनी, सर्व सेवा संघाने यापूर्वीच पाठिंबा व्यक्त केला आहे. आता या दोन संघटना अधिक जवळ येत आहेत ही स्वागतार्ह घटना आहे. शेतकरी चळवळ ही सध्या फक्त आर्थिक पायावर-कार्यक्रमावर उभी आहे. उलट सर्व सेवा संघ व देशातल्या इतर सर्वोदयी संस्था वयोवृद्ध व अतिआध्यात्मिक-सांस्कृतिक झालेल्या आहेत. त्यामुळे दोन्हीच्या परस्पर सहयोगातून व्यापक जनआंदोलन व व्यवस्थाबदल घडून येणे शक्य आहे. चरणसिंग–शरद जोशी वगैरेंना गांधी-विनोबांकडून खूप घेता येण्यासारखे आहे. तर गांधी-विनोबांच्या संस्थांना नव्या ताज्या दमाची कुमक मिळाली नाही तर लवकरच आश्रमाच्या इस्टेटी होतील आणि जसे जुने धार्मिक मठ तशा या नव्या संस्था ठरतील! बहिष्काराचा एखादा कार्यक्रम या संयुक्त आघाडीला ताबडतोबही हाती घेता येईल. अतिरिक्त उत्पादनांचा, विपुलतेचा हा काळ असल्याने उत्पादन रोको, पुरवठा रोको यासारखे अडवणुकीचे मार्ग सध्या तरी फलदायी ठरणार नाहीत. शेतकरी संघटनेने पुकारलेल्या दूध रोको आंदोलनाच्या अपयशाचे हेही एक कारण आहे. शहरात दूध आले नाही तर परदेशातून चोवीस तासात दुधाची भुकटी मागवून शहराची गरज भागवणे सध्या शासनकर्त्यांना शक्य आहे. अगदी नाशिवंत मालही जगाच्या या टोकापासून त्या टोकापर्यंत नेण्या-आणण्याची वेगवान साधने उपलब्ध आहेत. इस्रायलसारख्या वाळवंटी देशात फुललेले गुलाब, पिकवलेला भाजीपाला आज रोजच्या रोज युरोपात पाठविला जातो आहे. अशा स्थितीत दूध किंवा इतर शेतीमालाचा पुरवठा रोखून, चालू व्यवस्था अडचणीत कशी आणता येणार? हा विपुलतेचा काळ आहे आणि बहिष्कार हेच अस्त्र या वेळी परिणामकारक ठरू शकणार आहे. पुण्यात ग्राहकचळवळ सुरू झाली तेव्हा तीन दिवसांचा 'ऑपरेशन लक्ष्मी रोड' हा कार्यक्रम योजला गेला. कापड-कपडा खरेदी करू नका एवढीच विनंती दुकानांसमोर उभे राहून गिऱ्हाइकांना करण्यात येत होती. यामागील भूमिका सांगणारी पत्रकेही वाटण्यात आली. परिणाम? तीन दिवस लक्ष्मी रोडवरील कापडदुकानात शुकशुकाट! व्यापारी हवालदील! असे शांततापूर्ण निरोधन कार्यक्रम (PICKETING) योजून शेतकरी संघटना व सर्वोदयी संस्था आपले बहिष्कार–आंदोलन उभे करू शकतील. सध्याच्या काळात बलप्रयोगाचा, रोको वगैरे अडवणुकीच्या कार्यक्रमांचा प्रभाव पडणार नाही. देवनारच्या कत्तलखान्यासमोर गाई आणि गोवंश वाचवण्यासाठी निष्प्रभ सत्याग्रह करण्याऐवजी असे बहिष्कार आंदोलन, सर्वोदय आणि शेतकरी संघटना यांना अधिक बळ प्राप्त करून देईल. नाईलाज म्हणून शेतकरी आज गाई–बैल कसाईखान्यात पाठवतो आहे. सरकारने कायदा करून गोहत्याबंदी केली तरी गाई–बैलांची कत्तल थांबणार आहे थोडीच? पण सरकारवर, विशेषतः नेहरू–इंदिरा–काँग्रेस सरकारवर विनोबाचा भलताच विश्वास! त्यांचे सर्व वाङ्मय विचार अ–सरकारी असूनसुद्धा! येलवाल परिषदेत भूदान चळवळ नेहरू–सरकारवर सोपवून ते मोकळे झाले. तसेच गोहत्याबंदी चळवळीबाबत. भारतातील बहुसंख्य राज्यात असा कायदा आजही आहेच. समजा बंगाल–केरळ या उरलेल्या राज्यांनी किंवा केंद्र सरकारने गोहत्याबंदी कायदा केला तरी गोहत्या थांबणार नाही. त्यासाठी शेतकऱ्यांनाच गाई-बैल शेवटपर्यंत सांभाळणे शक्य होईल अशी आर्थिक परिस्थिती हवी. ती आज नाही म्हणून देवनारपुढे पवनार निष्प्रभ ठरते. कायदा असूनही तो अंमलात येत नाही. विनोबांनी अ-सरकारवाद सांगितला; पण सरकारवर विसंबून! त्यानी लोकनीतीचा उपदेश केला; पण राजनीती सांभाळून! नतिजा काय निघाला?

विनोबा अमर आहेत!

सर्वोदय चळवळ गारठली–गोठलेली आहे!

शेतकरी चळवळीशी तिचा संयोग घडून आला तर गांधी–विनोबांच्या विचारांचे आणि सर्वोदयी चळवळीचे पुनरुज्जीवन शक्य आहे!

□


वैराण मुलुखाचे
सुजलाम् सुफलाम् भूमीत
रूपांतर करणारा
थोर निग्रो संत आणि शास्त्रज्ञ
डॉ. कार्व्हर याचे
प्रेरणादायी चरित्र

**एक होता कार्व्हर**

लेखिका : **सौ. वीणा गवाणकर**

मूल्य : रुपये पंधरा

**राजहंस प्रकाशन**

१०२५ सदाशिव पुणे ३०


# दीपावली शुभेच्छा

- टॅग अॅडव्हरटायझिंग, मार्गो गोवा
- दयानंद समाचार एजन्सी, अंबेजोगाई.
- पायोनियर बुक कंपनी, मुंबई.
- श्री लेखन वाचन भांडार, पुणे
- एक्स्प्रेसो अॅडव्हरटायझिंग, वानवडी
- बँक ऑफ महाराष्ट्र, पुणे
- काळेज गुड्स कॅरिअर्स, मुंबई
- सवाद, पुणे
- उत्तम जाहिरातवितरक, पुणे
- मेघना इंटरप्रायजेस, पुणे
- स्पिन इंडिया, पुणे
- नासिक औद्योगिक सहकारी वसाहत लि. नासिक
- अकाय इडस्ट्रीज, मुबई
- हॉटेल श्रेयस, पुणे
- एन्. के. पब्लिसिटी, वेळगाव
- डँगर फॉर्स्ट टूल्स लिमिटेड, ठाणे
- शहा ब्रदर्स, पुणे
- फाटक ब्रदर्स, सातारा
- रचना प्रॉडक्टस्, पुणे
- डी. जी. गुप्ते, मुबई
- अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, मुबई
- काशिनाथ वाळशेठ गुजराथी अँड सन्स, शहापूर
- रमापती ड्रेसेस, सोलापूर
- गानवर्धन, पुणे
- सदानंद प्रकाशन, पुणे
- कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारा बँक लि. कोल्हापूर
- गरुड ट्रॅव्हल्स अँड टूर्स, मुबई
- स्पॅन इंजि.नअरिंग, पुणे
- आर्ट अलोन, पुणे
- आशिश इंटरप्रायजेस, पुणे
- प्रोग्रॅफ अॅडव्हरटायझिंग, पुणे
- अमीत लुब्रिकंट्स अँड केमिकल्स, पुणे
- व्ही. बी. अभ्यंकर अँड ब्रदर्स, पुणे
- जे डी. इंडस्ट्रिअल स्प्रेपेंटर्स, पुणे
- खाडिलकर प्रोसेस स्टुडिओ, पुणे
- विजय न्यूज एजन्सी, अकोला
- भारद्वाज कटेनर्स, पुणे
- जी. आर. ताम्हनकर, बुकसेलर्स अँड स्टेशनर्स, सांगली
- कोमार्टस, पुणे
- शकुतला पब्लिशिंग हाउस, मुबई
- श्री. गणेश पेपर कंपनी, पुणे
- निको ट्रेडिंग कंपनी, पुणे
- स्वस्तिक ट्रॅक्टर्स, पुणे
- अजय इंजिनिअरिंग वर्क्स, अरविंद इंजिनिअर्स, पुणे
- वनाझ इजिनिअर्स एम्प्लॉ. युनियन, पुणे
- प्रकाश भिडे, के. एस्. बी. प्रिंटर्स, पुणे
- माधव फळणीकर, पुणे
- अरविंद चिटणीस, मुबई
- विजय पाध्ये, पुणे
- लक्ष्मीनारायण मुरलीधर मुडेल, नंदकिशोर दायमा, अहमदनगर
- श्री. शरद पवार, सौ. प्रतिभा पवार, मुबई
- शरद जोशी, डोबिवली
- पद्माकर सोहोनी, सौ. वसुधा सोहोनी, पुणे
- यशवंत ठकार, सौ. सुजाता ठकार, पुणे
- माधव शिरवळकर, मुबई
- उल्हास लुकतुके, पुणे
- अण्णा जोशी, पुणे
- चंद्रकात अवाडे, भुसावळ
- विनय गुणे, सगमनेर
- वा. ह. जोशी, पुणे
- चंद्रशेखर राजे, सौ. उमा राजे, डोबिवली
- वि. शं. पारगावकर, पुणे
- श्याम भिडे, डोबिवली
- प्र. स. गद्रे, सौ. आशा गद्रे, मुलुड
- सुहास बाक्रे, सौ. माधवी बाक्रे, ठाणे
- श्री. बाबासाहेब भोसले, सौ. कलावती भोसले, मुबई
- जी. व्ही. गणपत्ये, पुणे
- आनंद बागलकोटे, बडोदा
- रमण देशपाडे, पुणे
- शंकर नारायण जोशी, लोणी खुर्द
- विश्वास गागुर्डे, पुणे
- एस. एन. भागवत, मुबई
- शेखर सोमण, पुणे
- द. म. बिडकर, डॉ. विजय बिडकर, पुणे
- एच. आर. बर्वे, पुणे
- द. रा. पेंडसे, मुबई
- व्ही. आर. क्षीरसागर, डहाणू
- राजू नायक, गोवा
- सुधाकर चिटणीस, डोबिवली
- शहा न्यूज एजन्सी, परभणी
- हॉटेल ग्रीन व्ह्यू, नासिक
- पढरीनाथ कुलकर्णी परिवार, नासिक
- भा. द वाळुजकर-परिवार, शाजापूर (म. प्र.)
- सुरेश शंकर खेर, माहिम-मुबई
- दिलीप कुलकर्णी, पुणे
- इलेक्ट्रो एंटरप्राईज, नासिक
- अहमदनगर जिल्हा वाचनालय, अहमदनगर
- सुयय ट्रान्सपोर्ट, पुणे
- डायमंड क्लॉक मॅन्युफॅक्चरिंग कंपनी, पुणे.
- तेजपालजी शहा अँड सन्स, औरंगाबाद

□

या सर्व स्नेहीजनांचे, हितचितकांचे मन:पूर्वक आभार.

**राजहंस प्रकाशन । साप्ताहिक माणूस । साप्ताहिक मुद्रण, पुणे**



वन आंदोलनं आपल्याला नवीन नाहीत. बिहारमधलं साल विरुद्ध साग आंदोलन, केरळचं 'सायलेंट व्हॅली' आंदोलन, बस्तरचं साल-पाईन आंदोलन आणि प्रसिद्ध चिपको आंदोलन.
याच पार्श्वभूमीवरची ही उत्तराखंड मोहीम. थरारक, उत्साहवर्धक !
पुण्याच्या महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेनं ही मोहीम १ ते २३ मार्च ८२, या कालात पूर्ण केली. सुमारे पन्नास युवक-युवतींनी आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी या मोहिमेत भाग घेतला.

वनसंवर्धन आणि पर्यावरण या विषयात गोडी असणाऱ्या सर्वांसाठी ही लेखमाला–

# प्रेरणा चिपकोची, भटकंती उत्तराखंडाची !

**जगदीश गोडबोले**

**लेखांक–पहिला**

वाघ मानगुटीवर बसल्याच्या शिकारकथा तुम्ही वाचल्या असतील, ऐकल्याही असतील; पण माझ्या मानगुटीवर एक शिकारी बसून आहे. गेली कित्येक वर्षे !

खूप वर्षापूर्वीची गोष्ट, शिकत होतो तेव्हाची. सालावादप्रमाणे परीक्षा संपली आणि रात्री सहज जिम कॉर्बेटचे 'मॅन ईटिंग लेपर्ड ऑफ रुद्रप्रयाग' (रुद्रप्रयागचा नरभक्षक चित्ता) वाचायला घेतलं. अगदी आरामात. पलंगावर हातपाय पसरून. मात्र रात्र चढत गेली आणि आराम गेला जहंन्नममध्ये. पाय पोटाशी केव्हा आले कळलं नाही. खोलीच्या आजूबाजूला लपेटलेल्या अंधारातून चित्त्याचे रोखलेले डोळे दिसायला लागले. आठ वर्ष गढवालमध्ये आनंद फैलावणारे. शेकडो माणसांचा बळी घेणारे. चित्ता आणि त्याच्याशी जिवाच्या कराराने झुंजणारा जिम कॉर्बेट. रात्रभर झुंज चालू होती. पहाटे-पहाटे जिम कॉर्बेटने त्या नरभक्षकाला टिपला. मात्र पार उजाडेपर्यंत पलंगाखाली उतरण्याची आपली हिंमत झाली नाही ! मग रुद्रप्रयागचा चित्ताच काय गढवाल–कुमाँऊमधील पौडी–चंपावत, चौगड आदी ठिकाणचे एकसोएक महाखतरनाक वाघ खलास झाले; पण तो जिम कॉर्बेट आणि त्याचा लाडका गढवाल–कुमाऊँ काही मानगुटीवरून खाली उतरले नाहीत. अगदी वाघीण येऊनब सली तरीसुद्धा !

शिक्षण संपलं. वर्षं आली–गेली. आम्ही मार्गाला लागलो. मार्ग सोडूनही चालते झालो. मात्र गढवाल–कुमाऊँच्या वाटेला जाणं काही जमलं नाही आणि एक दिवस अचानक पेपरमध्ये बातमी वाचली–

उत्तराखंडातील (गढवाल–कुमाऊँ) पहाडी–आदिवासी लोकांनी आपले जंगल वाचविण्यासाठी 'चिपको' नावाचे अभिनव आंदोलन सुरू केले आहे. आता 'चिपको' आणि 'आंदोलन' दोन्ही शब्द नवीन नव्हते. मात्र आंदोलनाच्या संदर्भात 'चिपको' बापजन्मात प्रथमच ऐकत होतो. त्यातून धडाधड नष्ट होणाऱ्या जंगलाबाबत बहुतांश लोक कमालीचे बेफिकीर असताना या पहाडी–आदिवासी लोकांनी हा काय उद्योग आरभला आहे याची उत्सुकता वाटायला लागली. त्यातून आदिवासी आणि जंगल दोन्ही आमचे 'वीक पॉइन्ट्स' रादर 'लव्ह पॉइन्टस् !' गेली पाच–सहा वर्षे बिहार–ओरिसा–मध्य प्रदेश–महाराष्ट्र–केरळातील जंगलं पालथी घालण्यात गेली. चंद्रपूरच्या सागवनातून बस्तरच्या 'बस्तरी' तून (बाबूच्या राज्या) मनमुराद भटकणे झाले होते. अबूझ माड–काळा हांडीच्या अनवट रानात पार हरवलेल्या माडिया–गोंडांच्या अटकर वस्त्यातून मुक्काम ठोकून राहिलो होतो. शेकोटीशी शेकताना सुख–दुःखाच्या गोष्टी केल्या होत्या. महुवाच्या मदहोषात रानच्या कंच जीवनाचा कैफ अनुभवला होता. सहाजिकच बातमी वाचली आणि झपाटल्यागत झालो. और हम वह नही जो बैठेंगे खाली हाथ–!

सुदैवाने एक संधी धावून आली. पुण्याच्या 'आदिवासी जाणीव–जागृती केंद्रा'तर्फे वन–आंदोलनांचा अभ्यास करण्याची योजना ठरत होती. सिंगभूमच्या 'साग विरुद्ध साल' आंदोलनापासून 'चिपको' पर्यंत अनेक आंदोलनांची प्रत्यक्ष जाऊन माहिती घ्यायची होती. प्रा. शरद कुळकर्णींनी त्याबाबत विचारणा करताच क्षणार्धात होकार देऊन टाकला. सुरुवात 'चिपको' पासून करावी असं ठरलं. साथीला माझे जानी दोस्त आणि उत्तम छायाचित्रकार पापा पाटील आणि अशोक यादव सांगलीच्या 'रिव्हर व्हॅली एक्सपिडिशन अँड रिचर्स सोसायटी ऑफ इंडिया' तर्फे येणार होते.

आम्ही उत्साहाने तयारीला सुरुवात केली. हिमालय मला तसा नवा नव्हता. गिर्यारोहणासाठी सिक्कीम–हिमालय अथवा गुलजारीसाठी काश्मीर भटकून झाले होते; पण उत्तराखंड प्रत्यक्ष माहितीच्या दृष्टीने नवीन होता. त्यामुळे मोसम, सामान–सुमानाचा नीट अंदाज येईना. म्हणून उत्तराखंडात नेहमी मुशाफिरी करणाऱ्या मित्रांना गाठले; पण आम्हाला नेमक्या कोणत्या व किती उंचीवरच्या गावात जायचे आहे हे खुद्द आम्हालाच माहीत नसल्याने काही सल्ला द्यायला ते असमर्थ होते. बरं, आंदोलनाची काही माहिती घ्यावी तर पॉप सॉंगपासून डिंग–डॉंगपर्यंतच्या अगम्य शिखराची धडाधड सहस्रनामे घेणाऱ्या वीरानी 'चिपको' नाव ऐकलेही नव्हते. अर्जुनाच्या इमानाने शिखर आणि केवळ शिखर हेच त्यांचे लक्ष्य असे. आजूबाजूचे जन–जीवन, परिस्थिती यांच्याशी त्याना कर्तव्य नव्हते. 'चिपको' आंदोलक प्रामुख्याने सर्वोदयी आहेत असं कुठून तरी समजल्याने पुण्यातील विंचूरकर वाड्यातील सर्वोदयकार्यालयाकडे मोर्चा वळवला. आम्ही चौकशीला तोंड उघडताच कार्यालयातील सद्‌गृस्थाने पलीकडच्या ओसरीवरील दोन वृद्ध सद्‌गृहस्थाकडे आमची पाठवण केली.

'आम्हाला चिपको आंदोलनाची माहिती...'–मी.

'तुम्ही प्रथम गोपुरीला जा...' पहिले सद्‌गृहस्थ 'अहो, पण उत्तराखंड कुठे आणि गोपुरी कुठं–' मी एकदम दचकून मनातल्या मनात बिगरी ते मॅट्रिकपर्यंत आठवतील ते सर्व नकाशे पालथे घातले.

'मग असं करा, आधी पवनारला जा. तिथे तुम्हाला कसलीही माहिती ससजेल...' दुसरे सद्‌गृस्थ.

माय गॉड ! तेवढी एक जागा सोडून जगाच्या पाठीवर कुठेही जाण्याची आमची तयारी होती. एक तर 'अंत्योदया'ची आणि 'वाल्या'ची मला भयंकर भीती वाटते आणि दुसरी गोष्ट म्हणजे आश्रमातली पाटी फुटली असेल तर 'चिपको' विथ् ॲक्शन दाखवायचे म्हणजे आली का आफत ! पण देवाने संकटात टाकल्यावर जसा देवच धावून येतो तसेच श्री. गोविंदराव शिंदे व श्रीमती इंदुताई टिकेकर हे प्रख्यात सर्वोदयी कार्यकर्तेच आमच्या मदतीला धावले. त्यांनी आवश्यक ती माहिती ओळख–पत्र वगैरे दिली. प्रसिद्ध निसर्ग–शास्त्रज्ञ डॉ. माधव गाडगीळ याच्याकडून काही माहिती घेतली आणि आम्ही जून १९७९ अखेर डेहराडून गाठले.

डेहराडून गाठायचे उद्देश दोन. एक तर संबंधित वन–अधिकाऱ्यांची मुख्यालये तिथे होती आणि मुख्य म्हणजे तेथील विख्यात वन–संशोधनसंस्था (Forest Research Institute) बघायची होती. शिवाय आमचा दोस्त दिलीप काळे तिथे होता. त्यामुळे काहीच कशाची कमतरता नव्हती. डेहराडूनला आवश्यक ती प्राथमिक माहिती घेतली आणि पाऊस कोसळायच्या आत हिमालय गाठला. गढवालमधील उत्तरकाशीपासून कुमाऊँमधील अलमोरा–नैनीतालपर्यंत आंदोलन–क्षेत्र पसरले होते. आम्हाला आंदोलनाचा उगम, प्रभावक्षेत्र, विविध आंदोलन–केंद्र, नेते–कार्यकर्ते, त्यांची कार्यपद्धती, लोकांचा सहभाग, वनमजूर–वन ठेकेदारांची प्रतिक्रिया वगैरे सर्वांकडून सर्वांगाने माहिती घ्यायची होती. पाठीवर पिठ्ठू (रुकसॅक) टाकून भटकंती सुरू केली.

चीडच्या गहिऱ्या राईत रमलेला सिल्याराचा देखणा नवजीवन आश्रम, दूर पहाडातील लस्यालगाव, सफरचंदाच्या बागेतलं धारगाव, मनी ऑर्डर्सवर जगणारे बढधारगड, अलकनंदेच्या हाहाःकारातून जेमतेम सावरलेले पाखी, शहरीपणाला अजून न सरावलेले गोपेश्वर, बर्फातले बेमरू, धुक्याच्या घुंघटमध्ये सरोवराआड दडलेले स्वप्निल नैनीताल–महिनाभर मुशाफिरी चालू होती. परत फेब्रुवारीमध्ये नागेश हाटकरबरोबर भटकून आलो. गावागावातून भटकलो. घरात–दारात–अंगणात–शेतात–बाजारात लोकाना भेटत होतो, बोलत होतो, ऐकत होतो. जाणवत गेले व्यापारी जंगलतोडीमुळे लोकांचे अतोनात नुकसान झाले आहे. लोक दुःखी आहेत; पण आणखी एक गोष्ट जाणवली. आपल्यावरील आपत्तींनी लोक दुःखी आहेतच; पण त्याहूनही दुःखी आहेत आपल्या सुखदुःखाची कोणाला पर्वा नाही म्हणून ! उत्तराखंड म्हणजे गंगोत्री–जमनोत्री–केदारनाथ–बद्रीनाथसारख्या तीर्थक्षेत्राचे आगर. देशभरचे लाखो यात्रेकरू तिथे दरसाल येतात वा नंदादेवी–कामेत–नीळकंठासारख्या गिरिशिखरावर चढाई करायला गिर्यारोहक येतात; पण सुंदरलाल बहुगुणापासून छोट्याशा खेड्यातील शकुंतलादेवीपर्यंत गढवाली माणसाचे दुःख होते–हमारा दर्द न जाने कोय ! जो तो येतो तो पुण्य जोडायला नाही तर शिखर चढायला धावतो; पण आमच्या अडी–अडचणी, सुख–दुःखं जाणून घ्यायला कोणाला फुरसद नाही, इच्छाही नाही !

गोष्ट खरी होती. गंगोत्रीच्या दर्शनाने लाखोजण पावन झाले.

हरिद्वार–हृषीकेशच्या गंगेच्या विशाल पात्राने आकंठ तहान शमवली; पण वर दूर डोंगरातील अनेक गावं जंगलतोडीमुळं पाण्याच्या घोटालाही दुरावली आहेत हे आपल्या लक्षात आले नाही. उत्तुग गिरिशिखर पादाक्रांत करण्याची मर्दुमकी अनेकांनी गाजवली; पण भगवंताने 'स्थावराणाम् हिमालय:' म्हणून गौरवलेला हिमालय ठायी–ठायी कोसळत आहे याची आपण तमा बाळगली नाही. सर्वांत दु:खाची गोष्ट म्हणजे गढवालची–हिमालयाची सुख–दु:खं केवळ त्यांच्यापुरतीच मर्यादित नव्हती, तर गंगा–यमुनेच्या मैदानातील लाखो लोकांचे जीवन हिमालयाच्या सुख–दु:खाशी निगडित होते. प्रत्यही त्याचा प्रत्यय येत होता. १९७० चा अलकनंदेचा हाहाकार आणि १९७८ ची भागीरथी–दुर्घटना त्याचे भरभक्कम पुरावे होते. केवळ हिमालयातच नाही तर अँडीज पर्वतातील व्हेनेझुएला, कोलंबिया, इक्वेडोरपासून दक्षिण–पूर्व आशियाच्या पहाडी भागापर्यंत सर्व विकसनशील देशांत हीच परिस्थिती होती. जगाच्या एकूण भू–भागापैकी हा पहाडी प्रदेश एकचतुर्थांश असला किंवा जगाच्या एकूण लोकसंख्येपैकी एकदशांशच लोक पहाडी प्रदेशात रहात असले तरी जीवन–दायी नद्यांचे उगम व पहाडी पर्यावरणाचा निसर्ग-बंधावर होणारा परिणाम यामुळे केवळ या दहा टक्के पहाडी लोकांचेच नाही तर मैदानातील कोटयवधी लोकांचे जीवन पहाडी–पर्यावरणाच्या सुदृढतेवर अवलंबून आहे. पहाडी–पर्यावरण आधीच कमालीचे संवेदनाशील, त्यातून 'जवान' हिमालयासारखी भूगर्भशास्त्रदृष्ट्या आधीच नाजुक हालत असली तर गर्भवतीप्रमाणे जपायला पाहिजे–भविष्याशी संकेत असेल, तर! नुसत्या धरणांचाच विचार केला तरी मनाचा थरकाप उडतो. १९७० साली अलकनंदेच्या प्रलयामुळे हरिद्वार ते पट्टानीपर्यंत दहा किलोमीटर गंगाकालवा गाळाने भरला. नुसता गाळ काढायला एक कोट रुपये लागले! भाक्रा–नागल धरणात आत्ताच अपेक्षेपेक्षा चौपट वेगाने गाळ भरतो आहे. हिमालयातील नद्यांवर आज कोटयवधी रुपये खर्चून आपण डझनावारी धरणे बांधतो आहोत. भारतातील इतर बावीस धरणांच्या पहाणीचा निष्कर्ष वेगळा नाही. त्यातील अनेक धरणाना पर्यायी जागा नाही. एकदा ती अक्षरश: गाळात गेली की, कपाळाला हात लावून बसायचं का? निदान त्यासाठी तरी नद्यांच्या पाणलोट–क्षेत्राचा विचार व्हायला नको का?

## झोप उडाली!

उत्तराखंडाच्या भटकंतीनंतर झोप उडाली, साफ उडाली! मी जंगलात राहिलो होतो, भटकलो होतो. वन–संवर्धन, निसर्ग–संतुलनावर थोडेफार वाचत होतो, चर्चा करत होतो; पण सुंदरलाल बहुगुणा वा चंडीप्रसाद भटासारख्या आदोलकांशी बोलल्यानंतर लक्षात यायला लागलं, आपण प्रत्यक्ष जगण्याच्या पातळीवर जंगलाचा फार कमी विचार केला आहे किंवा उत्तराखंडासारखा पर्यावरण व मानवी जीवन याचा इतका जिता–जागता अनुबंध पहिल्यांदाच अनुभवत आहोत. दूर डोंगरावरच्या एखाद्या अनसूयादेवीला आम्ही मुद्दाम डिवचायचो 'तुम्हाला इकॉलॉजी–बिकॉलॉजी काय समजतं? मग कशाला या 'चिपको'च्या भानगडीत पडता?' हमखास उत्तर यायचं, 'भाईसाब, आप जो बोलते हैं, हमे नही समझता। मगर माथे के मंजराखाल का जंगल काट दिया और अगले साल रोडे-रवाडोके (दगडमाती) नीचे गाँव दब गया।' अथवा ल्हाशीचा एखादा विश्वंभरबूढा थरथरत्या हाताने गावच्या ओढ्याकाठी घेऊन जायचा आणि डोळ्यांत पाणी आणून सांगायचा, 'भाईसाब, नातवासारखं गावाचं बोट धरून वर्षानुवर्षे वहात होता हा. डोंगरमाथ्यावरचं जंगल कापलं आणि हा एकदम गावच्या जिवावर उठला!

> **आम्ही मुद्दाम डिवचायचो, 'तुम्हाला इकॉलॉजी–बिकॉलॉजी काय समजतं? मग कशाला या 'चिपको'च्या भानगडीत पडता?**
> **'भाईसाब, आप जो बोलते है, हमे नही समझता। मगर माथें के मंजरावालका जंगल काट दिया और अगले साल रोडे–रवाडोके नीचे गाँव दब गया!'**

अभ्यासक शास्त्रज्ञ, निसर्गशास्त्रज्ञ सांगायला लागले की, समजतं; पण अशी ही साधी-सुधी माणसं पोटातून बोलायला लागली की, पार अंत:करणाला जाऊन भिडतं, शास्त्र जिवंत होतं. गावोगावच्या अनसूयादेवीची अन् विश्वंभराची कहाणी ऐकून वाटायला लागतं आपण जे पाहिलं–अनुभवलं ते मित्राना, कार्यकर्त्यांना सांगायला पाहिजे. मी बोरूबहाद्दर तर पापा–नागेश कॅमेरावर्ची! आम्ही लेख, स्लाइड–शोचा सपाटा लावला. वर्तमानपत्र, मासिकं, सभा-संमेलने–शिबिरे जिथे चान्स मिळेल तिथे 'चिपको'! थोड्याच काळात 'पर्यावरण नको पण यांना आवरा' अशी गंभीर परिस्थिती झाली. एकेक मजा असते. जामखेडला एका मित्राबरोबर डॉ. दादा गुजराचे चीन-दौऱ्याचे अनुभव ऐकत होतो. दादा अगदी पोटतिडकीने चीनची माहिती सागत होते. कदाचित मित्राला ओव्हर–डोस झाला असावा. तो हळूच म्हणाला, 'सालं, कठीण झालं आहे. दादा हो-हांग हो मध्ये पार बुडाले आहेत. तिकडे कुमारला (सप्तर्षी) ह्या कुमारी बाभळीने (आता सुमारी) झपाटलं आहे आणि तू ऊठ–बस 'चिपको.' अरे, माणसासारखे चार शब्द सरळ बोलाल की नाही!'

गोष्ट खरी असली तरी आम्ही मजबूर होतो. निदान मी तरी. एखादी गोष्ट मनाला पटली–भिडली की, सर्वांना सांगेपर्यंत जिवाला चैन नाही. मग इतरांची चैन हराम झाली तरी बेहत्तर! गंमतीचा भाग सोडला तरी याबाबत बोलताना प्रकर्षाने लक्षात यायला लागलं की, आपल्यातील अनेक जण पर्यावरण, निसर्ग–संतुलनाला काही मूठभर लोकांची चैन समजत आहोत. पण ही चैन फार काळ परवडणारी नाही. विशेषत: वनवासी–आदिवासी माणसांचा हा जीवन-मरणाचा प्रश्न आहे, हे समजून घ्यायला पाहिजे!

आपल्याकडे हा प्रश्न समजावून सांगताना एक वादा यायचा. हिमालयात जंगलतोडीचे परिणाम तावडतोब आणि ठळकपणे दिसतात. डोंगर–कडे कोसळले की, अगदी नाटयमयरीतीने ते दृग्गोचर होतात. आपल्या 'राकट देशा, कणखर देशा' महाराष्ट्रात अगदी पहाडी भागातही विशिष्ट नैसर्गिक परिस्थितीमुळे हे दुष्परिणाम लगेच

जाणवत नाहीत. कोसळणारा कडा मृत्यु-घंटा दणाणून सोडतो; पण सुपीक माती वाहून काळा पत्थर उघडा पडायला कैक वर्षं जावी लागतात. हळू-हळू भिनणाऱ्या विषाप्रमाणे ही प्रक्रिया घडते, म्हणून जास्त धोकादायक आहे. कारण आपल्या अस्तित्वाचा आधार असलेली लाख मोलाची माती एकदा पायाखालून सरकली की, परिणाम एकच–सत्यानाश ! हा धोका वेळीच ओळखला पाहिजे, सावध झाले पाहिजे. इतरांना केले पाहिजे. या विषयाचा अभ्यास करणाऱ्यांची मुख्य म्हणजे अभ्यासाला जोडून प्रत्यक्ष काम करणाऱ्या कार्यकर्त्यांची निसर्ग–प्रेमीची एकसंघ फळी उभी राहिली पाहिजे.

## धोका वेळीच ओळखला तर ?

उत्तराखंडातील 'चिपको' आंदोलनाने व केरळातील 'सायलेंट व्हॅली' प्रकल्पाने पर्यावरण–विषयक चर्चेला देशभर थोडे-फार तोड फुटले होते. वर्तमानपत्रात उलट-सुलट लेख प्रसिद्ध होत होते. परिसंवाद झडत होते; पण पर्यावरण व निसर्ग–संतुलन जे खरोखर तारू वा मारू शकतील अशा आदिवासी मित्रांपासून, कार्यकर्त्यांपासून या गोष्टी दूर होत्या. महाराष्ट्रात ठाणे–धुळे–चंद्रपूरसारख्या आदिवासी-वनवासी भागातून आम्ही 'जंगल–बचाव परिषदा' घेत होतो; पण जंगल-बचावासाठी साधा-सुधा माणूसही किती प्रचंड काम करू शकतो हे प्रत्यक्ष पहाणं महत्त्वाचं होतं. उत्तराखंडात जंगलतोडीचे दुष्परिणाम आणि ते थोपविण्यासाठी स्थानिक लोक करत असलेले उपाय दोन्ही जवळून बघणं शक्य होतं. लेख–भाषणं–स्लाइड-शोपेक्षा प्रत्यक्ष बघण जास्त अर्थपूर्ण होतं. नागेशशी बोलताना सहज विचार सुचला महाराष्ट्राच्या आदिवासी–वनवासी भागात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना घेऊन उत्तराखंडाची अभ्यास–मोहीम आखली तर ? आमच्या 'महाराष्ट्र मानव–विज्ञान परिषदे'च्या प्रा. मुटाटकराना सहज कल्पना बोलून दाखवली आणि त्यानी क्षणार्धात 'आगे बढो'चा ग्रीन सिग्नल दिला !

'महाराष्ट्र मानव–विज्ञान परिषदे'ची (Maharashtra Association of Anthropological Sciences) स्थापना पाच-सात वर्षांपूर्वीची. महाराष्ट्रात 'मानव–शास्त्र' (म्हणजे Anthropology, पूर्वी त्याला मराठीत मानव–वंश–शास्त्र म्हणत.) या विषयाच्या अभ्यासाचा पाया स्व. इरावतीबाई कर्व्यांनी घातला. बाईंचा व्यासंग जबर, तितकीच शास्त्र जिवंत अनुभवातून शिकण्याची धडपड लोकविलक्षण ! इरावतीबाईंच्या हयातीत 'मानव–शास्त्रा'चा स्वतंत्र विभाग पुणे विद्यापीठात नव्हता. तो प्रा. मुटाटकरांनी परिश्रमाने उभा केला. 'मानव–शास्त्रा'च्या अभ्यासाची–डिग्रीची सोय झाली; पण विद्यापीठाचा विभाग म्हटला की, मर्यादा–चौकटी पडल्याच ! ज्ञान फक्त पुस्तकात वा हस्तिदंती मनोऱ्यात सीमित होऊ नये, अशी बाईंप्रमाणेच प्रा. मुटाटकरानाही तळमळ. शास्त्रीय ज्ञानोपासनेला जिवंत अनुभवाची–वास्तवाची जोड मिळात्री या विचाराने प्रा. मुटाटकर व त्यांच्या सहकाऱ्यानी 'परिषदे'ची स्थापना केली. दलित–आदिवासीच्या प्रश्नांमध्ये ज्याना आस्था आहे असे शिक्षक–प्राध्यापक–कार्यकर्ते–शासनकर्ते याना एक राजकारण–निरपेक्ष मुक्त व्यासपीठ उपलब्ध व्हावे ही परिषदेच्या स्थापनेमागची भूमिका. दलित–आदिवासीच्या जीवन–विकासाच्या विविध पैलूं-संबंधी परिषदेने परिसंवाद, चर्चासत्रे आयोजित केली होतीच. 'हाकारा' त्रैमासिकाचे प्रकाशनही सुरू केले होते. वनसंवर्धनाच्या प्रश्नात परिषदेला विशेष आस्था होती. भूत–वर्तमान व भविष्य-काळ आणि सर्व 'वादा'ना (isms) जोडणाऱ्या वन-संवर्धना-सारख्या राष्ट्रीय महत्त्वाच्या प्रश्नाचा सर्वांगीण व समतोल अभ्यास व्हावा अशी परिषदेची धारणा. या भूमिकेतूनच परिषदेने वन–कर्मचारी व कार्यकर्ते यांच्या संयुक्त बैठकी, नाशिक वन–विभागाचा अभ्यास–दौरा आदि कार्यक्रम अगोदरच आयोजित केले होते. मुख्य म्हणजे वन–कर्मचारी व कार्यकर्ते याच्यामध्ये 'संवाद' घडावा यासाठी परिषदेची धडपड होती. कारण बहुताश वेळी वनकर्मचारी व कार्यकर्ते आमने-सामने येणार एखाद्या तणावाच्या वेळी नाही तर हाणामारीच्या (शाब्दिक) प्रसंगी. अशा वेळी साधक–बाधक चर्चा अशक्यच. यातून मार्ग काढण्यासाठी परिषदेने प्रयत्न केले आणि नाशिकच्या 'वृक्ष–मित्र मंडळाचे' अध्यक्ष डॉ. गोगटे यांच्या पुढाकाराने नाशिकच्या 'वन–विकास महामंडळा'चे प्रादेशिक संचालक श्री. मरवल्ली व वन–संरक्षक श्री. साठे यानी उत्तम प्रतिसाद दिला. परिषदेच्या सहकार्याने वीस–पंचवीस कार्यकर्त्यांचा नाशिक वन-विभागाचा दौरा घडवून आणलाच. शिवाय सतत तीन दिवस जातीने हजर राहून कार्यकर्त्यांशी आमने–सामने रोख–ठोक चर्चा केली. अगदी 'जगल म्हणजे काय – फक्त झाडे की, झाडासकट जगलामध्ये राहाणारा यच्चयावत जीवितमात्र' पासून ते 'आता करायचे ते सामाजिक वन–संवर्धन, मग पूर्वीचे वा इतर असामाजिक वन–संवर्धन समजायचे काय' पर्यंत सर्व मुद्द्यांवर ठोकाठोक झाली. अगदी खुल्लम् खुल्ला. मात्र अतिशय उमदेपणे. चर्चिलने म्हटल्याप्रमाणे–वृक्ष ही केवळ लष्करी अमलदाराच्या हातात सोपवण्यासारखी मामुली बाब नाही. त्याप्रमाणे नुसत्या वन-खात्याकडे सोपवण्यासारखी वन-संवर्धन ही मामुली बाब नाही. अर्थातच समाजकार्यासारखी गंभीर बाब नुसत्या समाजकार्यकर्त्यांकडे सोपवायला वन-अधिकाऱ्यांची तयारी नव्हती. अशी आमची एकमेकाची भूमिका. साहजिकच चर्चा खुल्लमखुल्ला झाली. अशा या प्रयत्नाचीच स्वाभाविक परिणती ही मोहीम होती.

'मोहिमे'च्या गाडीला परिषदेकडून हिरवी झंडी मिळाली खरी आणि नेहमीप्रमाणे आमची गाडी सुसाट सुटायला पाहिजे होती. 'इंद्रावती मोहिमे'चा तसा अनुभव होता. द्रुतगतीने ती पूर्ण झाली होती; पण उत्तराखंड–मोहिमेची गत विलंबितच लागली. गाडी ठेसनातूनच बाहेर पडेना. मी अनंत उपद्व्यापात अडकलो होतो. (बेकारोको फुरसद कहाँ !) आणि मुख्य वादा पैशाचा होता. हिमालयात इतक्या दूर वेळ आणि पैसा खर्च करून जायचं म्हणजे मोहीम किमान दोन–तीन आठवड्याची तरी पाहिजे आणि गढवाल–कुमाऊँ एवढ्या व्यापक प्रदेशातले वास्तव-दर्शन घडावे म्हणजे पथकही मोठे पाहिजे. एक तर परत–परत तिथे जाणे मुष्कील होते आणि महत्त्वाची गोष्ट या निमित्ताने महाराष्ट्रातील पन्नास वनवासी–आदिवासी कार्यकर्ते एकत्र रहाणार होते, बघणार होते, बोलणार होते; पण या सगळ्या भानगडीसाठी किमान पन्नास हजार खर्च येणार होता ! परिषदेकडे पन्नास दमड्याही नव्हत्या आणि वैयक्तिक वर्गणी वसूल करावी तर आमच्या अनेक कार्यकर्त्यांची दोन वेळा पोटभर

जेवणाची मारामार ! म्हणजे आमची गाडी नुसती हवेतच शंटिंग करत होती !

## देर है, अंधेर नही

भिक्षां देहीला सुरुवात केली. अगदी दिल्लीपासून गल्लीपर्यंतच्या अनेक मान्यवर संस्थाकडे. मजेमजेचे अनुभव आले. काही जणांकडे पैसा होता; पण इच्छा नव्हती. काही जणांकडे पैसा आणि इच्छा दोन्ही होते; पण इतक्या लोकांना इतक्या दूर घेऊन जाण्यापेक्षा त्यानी आपापल्या भागात निलगिरी–सुबाभळीची चार–दोन झाडं लावावी असा त्यांचा भोळा–भाबडा सल्ला होता. काही जण वन–संवर्धनावरील 'सेमिनार'साठी पाहिजे तेवढा पैसा द्यायला तयार होते; पण सेमिनारच्या कुंपणाबाहेर उडी मारणे त्यांना पसंत नव्हते. पर्यावरणाचा उद्‌घोष करणारी एक नावाजलेली संस्था तर आमच्या अध्यक्षांना पत्र लिहायच्याऐवजी सचिवांना पत्र का लिहिले म्हणून रुसून बसली. आता राहता राहिले आपले मायबाप सरकार ! पण 'इद्रावतीमोहिमे' वेळचा अनुभव काही विशेष उत्साहवर्धक नव्हता. आदिवासीच्या प्रश्नात रस असलेल्याना आदिवासीचे जीवन अगदी जवळून घडावे म्हणून ओरिसा–मध्य प्रदेश–महाराष्ट्राच्या आदिवासी भागातून वहाणाऱ्या इंद्रावतीनदीच्या काठाने आम्ही परिभ्रमण करणार होतो. पार मंत्र्यापर्यंत वशिला लावून भरघोस मदतीचे आश्वासनही मिळवले होते; पण 'ओरिसा, मध्य प्रदेश, महाराष्ट्राच्या वन–विभागातून वहाणारी इंद्रावतीनदी' असं लाख वेळा स्पष्टीकरण दिल्यानंतरही 'इंद्रावती' की 'इंद्रायणी' यामध्ये फायली गटांगळ्या खात राहिल्या. तोपर्यंत आमची सदेह वैकुंठाची तयारी झाली होती ! अखेर मोहीम संपल्यावर दोन महिन्यांनी चुकीच्या नावाने, चुकीच्या पद्धतीने आणि तेही थातुर–मातुर अनुदान आले. म्हणजे माणूस आजारी पडला म्हणून औषधाला जावे तर त्याच्या श्राद्धदिनी अॅस्प्रोची अखंड गोळी मिळावी त्यातला प्रकार ! पण करणार काय ? मजबूरीका नाम महात्मा गांधी !

केंद्र सरकारच्या शिक्षण–खात्याची अशा प्रकारच्या अभ्यास कम् साहस वा साहस कम् अभ्यास मोहिमांना मदत करण्याची योजना आहे. अर्ज मात्र राज्य सरकारच्या युवक–कल्याण विभागामार्फत करावा लागतो. पुण्यातील संबधित कार्यालयातून योग्य माहिती आणून ११ जून १९८० ला रीतसर फॉर्म वगैरे भरून दिला. 'पंधरा दिवसात तुमच्या केसचा निकाल लागेल !' असे छातीठोकपणे तिथल्या अधिकाऱ्याने सांगितले. सरकारी यंत्रणेत अगदी माणसाचाही 'निकाल' इतक्या झटपट आणि निकाली लागणे अशक्यच याची कल्पना होती. त्यातून आमची केस पुणे–मुबई–दिल्ली शिखर गाठत जाणार म्हणजे गेला बाजार दोन महिने तरी मनाची तयारी होती. फक्त सप्टेंबरचा मुहूर्त गाठायचा होता. कारण उत्तराखडात जायला सोयीचे महिने दोनच–ऑगस्ट–सप्टेंबर वा मार्च–एप्रिल ! अलीकडे–पलीकडे मोसमाचा नाही तर यात्रेकरूंचा त्रास. जून संपला जुलै आला–गेला. 'कम् सप्टेंबर' ओसरला; पण कृपावत सरकारचा मेघ बरसण्याची काही लक्षणं दिसेनात ! पुण्यात कार्यालयामध्ये चौकशी केली तर 'केस'ची मुबईला पाठवणी केल्याचे उत्तर मिळायचे आणि सचिवालयात विचारावे तर फाइल आली नाही म्हणून कानावर हात ठेवले जायचे ! आता आमची ही हिमालय मोहीम खंडाळयाच्या घाटातच 'निकाली' व्हायची धटका आली ! एक दिवस अगदी खनपटीलाच बसलो तेव्हा पत्ता लागला की, कसल्या तरी मामुली स्पष्टीकरणासाठी (फोनवरूनही जे अर्ध्या सेकदात मिळवता आले असते !) फाइल पुण्यातच पडून आहे ! अखेर एकदाची फाइल मुठा–मुळेतून बाहेर पडली. आम्ही जरा नि:श्वास टाकीपर्यंत सचिवालयाच्या महासागरात आमची 'मोहीम' (Expedition) की 'पदयात्रा' (Trek) या भोवऱ्यात सापडली. 'नाव किनार लगाव' म्हणून आम्ही दिसेल त्या प्रभुजी आणि बाबूजीला साकडे घालायला सुरुवात केली. अखेर सचिवलयातली माझी मैत्रिण अरुणा बागची आमच्या आर्त हाकेला धावून आली. आमच्या केसची दिल्लीला पाठवणी झाली !

आता महाराष्ट्राच्या राजधानीतल्या मुंबईत ही हालत मग देशाच्या राजधानीतल्या दिल्लीत काय असेल ! पण दिल्ली आणि दिल्लीकरांची जमातच मोठी विलक्षण ! आलेल्या फायलीशी आणि भेटलेल्या माणसाची ती कधीच उर्मटपणे (जाज्वल्य मराठी बाण्याने) वागत नाही. मात्र 'तुसी फिक्र मत करो अभी काम बन जाएगा !'

---

**काही जणांकडे पैसा होता; पण इच्छा नव्हती. काही जणांकडे पैसा आणि इच्छा दोन्ही होते; पण....काही जण वन–संवर्धनावरील 'सेमिनार'साठी पाहिजे तेवढा पैसा द्यायला तयार होते; पण सेमिनारच्या कुंपणाबाहेर उडी मारायला तयार नव्हते !**

---

असं मिठ्ठास तुपात घोळवत महिनोन्महिने काम करीत नाहीत. यात दुष्टपणाचा भाग नाही, एकेकाचा स्वभावच ! आता उर्मट माणसाशी निदान तात्त्विक भांडता तरी येतं; पण असल्या मिठ्ठासपणापुढे आपला तर पार फालुदा होतो ! धड अविश्वास दाखवता येत नाही की धड विसंबून रहाता येत नाही. महिनोन्महिने याच संभ्रमात गेले. आम्ही नित्य–नेमाने स्मरण–पत्र नाही तर स्मरण–यात्रा करायचो आणि नित्य–नेमाने 'पुढे व्हा, अनुदान पाठोपाठ पाठवतोच' असा आशीर्वाद मिळायचा. शेवटी उत्तराखंडाची अभ्यास–मोहीम नाही तरी म्हातारपणात बद्रीनारायणाची यात्रा घडायच्या वेळेपर्यंत तरी मंजुरी येईल अशी आम्ही मनाची समजूत काढत होतो आणि आम्ही असे गाफील असतानाच दिल्लीश्वराचे पत्र आले 'मोहिमेला अंशत: अनुदान मंजूर झाले आहे. (त्यातीलही अंशत:च भाग प्रथम मिळेल) अमुक–अमुक कागद–पत्र ताबडतोब पाठवा !' चलो की फरक पैदा है ! दिल्ली दरबार मे देर है, मगर अंधेर नही ! ¤

मोहिमेच्या अनुदानाचे मंजुरी-पत्र डिसेंबरमध्ये हाती पडले तरी संबंधित करारनामे वगैरे ताबडतोब पाठवावयाचे होते आणि मुख्य

म्हणजे अनुदान सरकारी अर्थ-वर्ष पूर्ण व्हायच्या आत म्हणजे मार्चअखेर २-३ महिनेच बाकी होते. म्हणजे अक्षरशः रात्र थोडी सोंगं फार अशी स्थिती आली ! पण आमची मित्रमंडळी विशेषतः 'मंडळी' आमच्या या नसत्या उठाठेवीना सरावलेली होती. त्यांच्या भरवशावर किल्ला लढवायचा ठरवला !

अनुदानाच्या आघाडीवर थोडी निश्चितता लाभल्यावर आता मुख्य कामगिरी होती मोहिमेतले साथीदार निवडण्याची. 'इंद्रावती-मोहिमे'चा थोडा-फार अनुभव गाठीला असला तरी दोन्ही मोहिमाच्या उद्दिष्टांमध्ये मूलतः फरक होता. 'इंद्रावती-मोहिमे'-द्वारा आम्हाला लोकांचे आदिवासींच्या प्रश्नांकडे लक्ष वळवायचे होते व ज्यांना या प्रश्नात आस्था होती त्याना आदिवासी-जीवन जवळून दाखवायचे होते. उत्तराखंड-मोहिमेतून आम्हाला आदिवासी-वनवासी भागात अगोदरच कार्यरत असणाऱ्या कार्यकर्त्यांचे पर्यावरण, निसर्ग-संतुलन व मानवी जीवनसंबंधाकडे लक्ष वेधायचे होते. सहाजिकच साथीदार मुख्यतः सामाजिक संस्था-संघटनातील कार्यकर्ते रहाणार होते व त्यांच्या जोडीला इतर पर्यावरण-प्रेमी असणार होते.

मोहिमेतील साथीदार अशा या संस्था-संघटनातून येणार होते. प्रत्येक संस्था-संघटनानी दोन किंवा तीन कार्यकर्ते पाठवावे व त्यामधील एक आदिवासी कार्यकर्ता / कार्यकर्ती असावी असं आम्ही सुचवलं होतं. निवड अर्थातच संघटनानी करायची होती. मोहिमेसाठी दरडोई कमीत कमी पाचशे रुपये खर्च येणार होता आणि अनुदानातून काही खर्च भागला तरी प्रत्येकाने कमसे कम दीडशे रुपये वर्गणी भरावी अशी अपेक्षा होती.

## जोरदार प्रतिसाद

सामाजिक कार्यकर्त्यांबरोबरच आम्हाला इतर पर्यावरणप्रेमी-अभ्यासक मोहिमेसाठी निवडायचे होते. उद्देश दोन-एक तर कार्यकर्त्यांच्या प्रत्यक्ष कार्य-अनुभवाला काही शास्त्र-सिद्धांताची जोड मिळावी आणि दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे निसर्गसंतुलन, वन-संवर्धनासारख्या व्यापक विषयात ग्रामीण-आदिवासी-शहरी भागातील लोकांची सांगड घातली जावी. उल्हास राजज्ञ या कार्यकर्त्या मित्राने याबाबत एकदा फार सुंदर लिहिले होते-'आदिवासी भागात काम करताना आणि शहरी भागात त्याविषयी चर्चा करताना अनेकदा जाणवायचं की, 'माणूस'पणाची जाण आणि आच असलेले काही लोक सोडले तर बाकीच्या लोकाचे अनुभव-विश्व, हितसंबंध इतके वेगवेगळे आहेत की, या दोघात काही समान धागाच गुफता येत नाही. वन-संवर्धनाचा प्रश्न हाती घेतल्यापासून मात्र आम्ही शहरी बाबाला बजावून सांगतो, 'निसर्ग-संतुलन बिघडले तर वनवासी-आदिवासी बरबाद होतीलच; पण तुझीही कबर खणली जाईल. स्वतःच्या स्वार्थासाठी तरी जागा हो !'

मोहिमेसाठी वर्तमानपत्रातून केलेल्या आवाहनालाही जोरदार प्रतिसाद मिळाला. महाराष्ट्राच्या काना-कोपऱ्यातून, समाजाच्या सर्व थरांतून. बगाराम तुळपुळ्यांसारख्या अनुभवी कार्यकर्त्यांपासून ते हडपसरला मटणशॉप चालविणाऱ्या अब्दुल शेखपर्यंत नानाविध पत्रं आली. अगदी बोटभर कार्डावर गिरवलेल्या अक्षर-ओळखीपासून निसर्ग-बंधावर लिहिलेल्या प्रकांड निबंधापर्यंत ! वय-शिक्षण-अनुभव आदीबाबत आम्ही माहिती मागवली होती. ही माहिती असायची, आणखी खूप काही असायचे. अशी पत्रं वाचणं हा एक विलक्षण अनुभव असतो. काही पत्रं मुद्देसूद असतात आणि फक्त मुद्देसूदच असतात. काही आपल्याशी बोलतात तर काही स्वतःशीच बोलत असतात. कुणाला अनुभव असतो. अधिकार असतो. अनुभवाचा अधिकार असतो. आम्हाला 'निवडणारे' तुम्ही कोण चे आक्रमण शब्दाशब्दातून व्यक्त होत असते. तर काही अनुभवी अधिकारी असून आर्जवी असतात. काही पत्रातून विचारलेल्या मुद्द्यांचा सागाडा पार गायब असतो; पण काही तरी सांगण्याचे-करण्याचे पंचप्राण शब्दाशब्दातून दरवळत असतात. अशा या पत्रांतूनच काही वेळा नकळत ऋणानुबंध फुलत जातात आणि काही वेळानं उमललेल्या कळीसारखे मिटलेही जातात !

संघटनाकडून आलेली नावं सोडून निवड करताना अनुभव-पात्रतेबरोबरच साडेचारशे रुपये वर्गणी भरू शकणाऱ्या उमेदवारांचा अग्रक्रमाने विचार करायचा होता. कारण अगोदरच फाटक्या थैलीत आणखी भर घालण्यात अर्थ नव्हता आणि एक घटक होता महिलांच्या निवडीचा. मोहिमेत महिला असाव्या की नसाव्या असा सवालच नव्हता. किंबहुना 'चिपको' आंदोलनात महिलांचा जास्त सहभाग असल्याने त्यांच्याशी संवाद-संपर्क साधायला पथकामध्ये महिलांचा समावेश अपेक्षित होताच. संघटनांकडून महिला-कार्यकर्त्यांची नावंही आली होती; पण ती पुरेशी नव्हती. पथक पुढे पाच गटांमध्ये विभागले जाणार होते. म्हणजे प्रत्येक गटाबरोबर दोन या हिशेबाने महिलांची संख्या किमान दहा तरी हवी होती. जाहीर आवाहन करताना आम्ही जरा साशंकच होतो. किल्ले रायगड-राजगड वा कुलु-मनाली सफरीच्या वाटा रुळलेल्या असतात; पण या अनोख्या मोहिमेत कोण सहभागी होणार आणि तेही मार्च-एप्रिलच्या ऐन परीक्षेच्या मोसमात ? पण 'इंद्रावती'-प्रमाणे याही वेळेस काही बहाद्दर निघाल्या. उत्तराखंड मोहीमच कशाला, हिमालयातील इतर मोहिमांचा अनुभवही असाच आहे. आपण मात्र तोंडाने व्हेलोतिना तेरेस्कोवाचे कौतुक करत मुळीच्या 'जाती'ला पदराखाली किती झाकणार देव जाणे !

साथीदाराच्या निवडीबरोबरच आणखी एक महत्त्वाचे काम पार पाडायचे होते-मोहिमाच्या भागातील-तयारीवर शेवटचा हात फिरवण्याचे. अशा मोक्याच्या वेळी मदतीला धावला आमचा आलापल्लीचा दोस्त शेखर ! शेखर मूळचा बंगलोरचा. उत्तम औषध-व्यवसाय असलेला. घरचा सुख-संपन्न. खूप हिंडला-फिरलेला. सर्व शौक-मौज केलेला. एक दिवस उठला आणि सरळ भमरागडच्या लोकबिरादरी प्रकल्पामध्ये दाखल झाला. विरक्ती म्हणून नाहीं तर खऱ्या-खुऱ्या जीवनावर आसक्ती म्हणून. मुलुख नवीन. माणसं नवीन. भाषा नवीन; पण आदिवासींमधील एक झाला. आपल्याला रुचतील आणि पटतील असे प्रयोग शेखर करत आहे. सर्व प्रतिकूल परिस्थितीत. जिगरीने !

शेखर आला आणि आम्ही निर्धास्त झालो. माणसं तीन प्रकारे काम करतात. काही डोक्याने, काही अंतःकरणापासून आणि काही-जण दोन्ही मिळून ! (क्रमशः)

# ग्रेलिंग क्रिसेंट येथील दुर्घटना

## मूळ लेखक : जॉन क्रिसे । अनुवाद : श्रीकांत लागू

तो छोकरा चिडलेले, आरडाओरडीचे आवाज ऐकत निपचित पडून राहिला. एका हातानं कॉटची कड घट्ट पकडून ठेवली आहे. भ्यायला होता. आपल्या आई-बाबांना या प्रकारे भाडताना त्यानं कधी ऐकलं नव्हतं.

भाडणं, हो जरूर होत होती; पण हे असलं कधीच नाही. तसंच आईचं रात्रीचं त्याच्याशी वागणंही चमत्कारिकच होतं. त्याला झोपवण्याआधी आईनं कमालीच्या त्रयस्थपणे एक चकार शब्द न बोलता त्याला आंघोळ घातली होती आणि त्रासिक चेहऱ्यानं त्याला झोपवलं होतं. हे असं पूर्वी कधीच घडलं नव्हतं.

सात वर्षांचा तर होता तो. अगदी बाल्यावस्था उपभोगत होता.

त्याला शेजारच्या खोलीतून ते भांडणाचे आवाज येत होते. एकदा बाबा ओरडायचे तर पाठोपाठ आईचं किंचाळणं. एकदाच तिनं उच्चारलेले शब्द त्याला कळण्यासारखे होते. बाकी सर्व वेळ न कळणारा आरडा-ओरडाच जास्त होता. त्यात बाबाचा राकट, घसा खरडलेला आवाजच जास्त होता.

एरवी इतकी शांत असलेली माणसं इतका आरडा-ओरड करू शकतात याचा त्याला अचंबा वाटत होता.

छोकरा झोप लागावी, निदान हा भीतिदायक आवाज थांबावा, अंधार संपून लवकर उजेड यावा अशी प्रार्थना करत होता. कुणी तरी एकानं दार उघडून बाहेर यावं म्हणजे तरी सुटका होईल; पण तसलं काहीही चिन्ह बराच वेळ दिसलं नाही.

अखेर एकदाचे आवाज थांबले. पोरान आपला श्वास रोखून धरला. त्याला पुन्हा ते आवाज ऐकायचे नव्हते आणि खरंच ते पुन्हा आले नाहीत. आवाज ऐकू आला फक्त दरवाजा धाडकन् लागल्याचा. पाठोपाठ आवाज आला तो आईच्या रडण्याचा.

हुंदके देऊन रडण्याचा.

पोराला झोपेनं हळुवार हात फिरवत आपल्या ताब्यात घेतलं. पोरगा विरोध करणं शक्यच नव्हतं. अंधारातील थरार संपला, दरवाजा उघडला जाण्याची अतृप्त इच्छा हळूहळू विरून गेली.

सर्वसाधारणपणे त्या घरात दिवसाची सुरुवात छोकऱ्याच्या उठण्यानं होत असे. आजची सकाळही काही वेगळी नव्हती. वसंताची खूण पटवणारे सोनेरी किरण बाहेर पसरले. स्वच्छ आणि डोळे न दिपवणारे. बाहेरच्या बागेत त्या प्रकाशानं सुखद मजा आणली होती. त्याची खेळायची हिरवळ, लाल साखळघाचा झोपाळा, एका बाजूला असलेला फुलांचा गच्च डवरलेला गालीचा. पार तिकडच्या टोकाला असलेली भाजीबाग, सगळं कसं कोवळ्या उन्हात न्हाऊन निघालं होतं.

आपल्या खिडकीजवळ असलेल्या कॉटवरून तो हे सगळं दृश्य छान् अनुभवत होता. फिरता-फिरता त्याची नजर खोलीत कालच तोडून आणलेल्या डॅफोडिल्सच्या फुलांवर गेली आणि अचानक तो खिन्न झाला. कसली तरी कटू आठवण जागी व्हावी तसा स्वत:शीच थोडा धुसफुसला आणि टेबलावरच्या घड्याळाकडे त्याची नजर गेली. पद्धत अशी होती की, साडेसहा वाजता घड्याळानं हात जोडले की, त्यानं उठायचं आणि गडबड न करता वागडायचं. सात वाजेपर्यंत आई-बाबापैकी कुणीच उठलं नसेल तर त्यांना उठवायला परवानगी होती.

घड्याळाचे काटे पाहून तो चक्रावलाच. त्याला वेळ नक्की ठरवताच येईना; पण साडेसहा आणि सात या वेळा त्याच्या डोक्यात अगदी पक्क्या होत्या.

घड्याळाचे काटे तर त्या वेळेच्या जवळपास नव्हते. त्यानं तो निराश झाला. त्यानं उशाशीच ठेवलेलं आपलं प्राण्यांचं पुस्तक घेतलं. पानं उलटून नेहमीच्या उत्सुकतेनं चित्रं पहात, भू, भू करत शब्दोच्चार करू लागला, प्राण्याच्या चित्रांवर बोट फिरवत, अडखळत, त्यांची नावं उच्चारू लागला. अचानक त्याचं लक्ष पुन्हा घड्याळाकडं गेलं.

घड्याळाचे काटे मगाशी होते तसेच होते.

नक्कीच काही तरी घोटाळा आहे. त्यानं घड्याळ नीट निरखून पाहिलं. काही तरी वेगळाच चमकदार विचार मनात आल्यासारखं डोकं उचललं. चेहऱ्यावर हसू फुटलं, डोळे विस्फारले. ओठांची मजेशीर हालचाल करत एकदम उद्गारला. 'अरेच्या, हे तर बंद पडलंय !'

तो कॉटवरनं उतरला आणि खिडकीपाशी गेला. आपला घसरलेला लेंगा उघड्या पोटावर ओढत त्यानं खिडकीच्या काचेला नाक लावलं. स्टार्लिंग, चिमण्या वगैरे इत्यादी पक्ष्यांच्या भुरभुराटानं त्याचं लक्ष वेधून घेतलं. एक स्टार्लिंग झाडीच्या खाचेतून एक किडा ओढत होता त्याकडे तो निरखून पाहू लागला. तेवढ्यात काचेच्या आतल्या बाजूनं त्याच्या चेहऱ्याभोवती एक माशी गुंजी घालू लागली. त्यानं त्याचं लक्ष विचलित झालं. हात उगारला की, ती माशी उडायची. त्याला तो खेळच झाला. मजेत खिदळू लागला.

अकस्मात तो गरकन् मागे वळला आणि घड्याळाकडं पाहिलं. पक्षी, माशी आणि खिदळणं सगळं विसरला. झपकन् दरवाज्याकडं गेला. हळूच दरवाजा उघडून शेजारच्या बैठकीच्या खोलीत शिरला.

सगळ्या ओळखीच्या वस्तू जिथल्या तिथं होत्या.

भिंतीवरच्या मोठ्या घड्याळाकडं पाहिलं आणि सहाजिकच स्तिमित झाला. कारण काटे साडेसात वाजल्याचं दर्शवत होते. शातपणे खेळायची मुदत केव्हाच टळून गेली होती. इतके वाजले तरी

आई किंवा बाबा दिसले नव्हते. आता त्यांना उठवणं भागच होतं.

तो त्यांच्या खोलीजवळ गेला आणि दार उघडलं. आत अगदी शांतता होती.

त्याची आई कॉटवर उताणी झोपली होती. डोळे मिटलेले होते. चादर सर्व अंगभर अगदी हनुवटीपर्यंत ओढलेली होती. हात चादरीतून खाली झाकलेले होते. त्या खोलीत इतरही गोष्टीत वेगळेपण होते; पण त्या अजाण बालकाच्या नजरेला त्या खटकल्या नाहीत. एक गोष्ट मात्र जाणवली. त्याचे बाबा आईशेजारी नव्हते !

तो कॉटजवळ गेला आणि आईला हाक मारली. 'ममी !'

ती हललीच नाही, त्यानं हाक मारली, मग पुन्हा,...पुन्हा 'ममी,' 'ममी !' त्यानं तिच्या चेहऱ्याला स्पर्श केला. थंडगार.थंडगार चेहरा. चेहरा इतका थंड का याचं त्याला आश्चर्य वाटण्यापलीकडं तो भांबावला. तो हाका मारीतच राहीला, ममी, ममी, ममी !

त्याचा काहीच उपयोग नव्हता. आता काय करायचं ते काहीच न सुचून तो दिङ्मूढ होऊन हाका मारायचा थांबला.

स्कॉटलंड यार्डच्या चीफ इन्स्पेक्टर रॉजर मूर यांच्या दृष्टीनं ती सकाळ नेहमीसारखीच एक उगवली होती. तसं काम खूप होतं. म्हणजे सी. आय. डी. खात्याच्या इतर विभागात असतं तसंच खूप. आलेला प्रत्येक अहवाल, चौकशी, सूचना सगळं अत्यंत अलिप्तपणे पहायचं. नुकतंच त्यानं सरकारी वकिलाला देण्यासाठी एका महत्त्वाच्या केसचं काम पुरं करत आणलं होतं. त्याचे कागदपत्र पहाताना मनात विचार येत होता, यानंतर आता कोणतं खटलं येणार आपल्याकडे ?

तेवढयात एक निरोप्या आला. इतर चार अधिकाऱ्यांच्या जोडीनं वापरत असलेल्या त्या खोलीत आत्ता तरी तो एकटाच होता.

'कोर्टलॅण्डसाहेब आपल्याशी काही बोलू इच्छितात.'

'आलोच !' रॉजर ताडकन् उठला आणि तडक सुप. कोर्टलॅण्डच्या ऑफिसकडे निघाला. आली बहुधा काही तरी कामगिरी, तो मनाशी पुटपुटला.

खरंच आली होती.

◻

'फार साधी सरळ केस दिसतेय. साठीजवळ आलेले, बलदंड शरीराचे कोर्टलॅण्ड. चाळिशीच्या रॉजरला म्हणाले. 'पुटनी विभागात एक बाई गळा घोटल्यामुळं मेलेली आढळली. दूधवाला आला तेव्हा एका छोकऱ्यानं दार उघडलं आणि म्हणाला 'आई उठत नाहीये !' सकाळचे दहा वाजले होते, त्यामुळं दूधवाल्याला कुतूहल वाटलं म्हणून पहायला गेला तेव्हा कळल. छोकरा आत्ता शेजाऱ्याकडे आहे. मृत बाईचं आडनाव आहे, पिरो. इटालियन वाटतंय त्यांचा पत्ता आहे २९ ग्रेलिंग क्रिसेंट..त्या गल्लीतलं शेवटचं घर किंवा बंगला आहे. अर्थात तू गेलास की सगळी माहिती कळेलच. तू एक नंबर विभागाकडे जा. ते तुला सगळी मदत करतीलच. माझ्याकडून काही हवं असल्यास मला कळव !'

'थँक्स' रॉजरनं सॅल्यूट ठोकला आणि बाहेर पडला. आपल्या ऑफिसमधून आपली बॅग घेतली आणि गाडीकडे गेला.

साधारण अकरा वाजून गेले होते.

सुमारे तासाभरानं तो बंगल्याजवळ पोहोचला. पोचताना साधारणपणे खुनाच्या भानगडीत मुलाचा संबंध असतो तेव्हा ज्या थोडयाफार गैरसमजुती असतात, त्या त्याच्याही मनात होत्या. सगळया पोलिसांच्या त्या तशा नेहमीच घोटाळत असतात; पण खुद्द त्याची मुलं लहानच होती. हे एक आणि दुसरं म्हणजे त्याच्या स्कॉटलंड यार्डमधल्या सुरुवातीच्या दिवसांत त्यानं एका मुलाला अतिशय भीषण पद्धतीनं एका गुन्ह्यात गोवलेलं पाहिलं होतं. या दोन कारणांमुळे तो या वेळी जास्त संवेदनाक्षम झाला होता.

विभागीय अधिकाऱ्यावरून त्याला त्या पिरो मुलाबद्दल अधिक माहिती मिळाली होती. मोठ्या तत्परतेनं त्यांनी ती माहिती पुरवली होती. नवरा–बायकोचं कडाक्याचं भांडण, खून आणि फरारी–अगदी याच शब्दात जरी नाही, त्यांचा सगळयांचा एकच सूर होता. केस अत्यत साधी, सोपी आणि सरळ होती.

रॉजरनं कोर्टलॅण्डसाहेबाना फोन करून पिरोला त्याच्या ऑफिसमध्ये गाठण्यासंबंधी विनंती केली. तो एका जनरल मर्चंट कंपनीमध्ये हिशेबनीस होता.

बंगल्याचं स्वरूप काही फारसं आकर्षक नव्हतं. चार भिंती, चौरस खिडक्या. असं वाटत होतं की, त्या खिडक्या लालसर बदामी विटांमध्ये कोरून काढल्या आहेत. बदामी फरशी आणि तसलाच मळकट बदामी रंग. एखाद्या पडीक जमिनीवर तो बंगला कोंवल्यासारखा दिसत होता. सगळयात जवळची घरं चांगली उंचीपुरी, पन्नास वर्षांची जुनी, गचाळ आणि बुरसटलेली वाटत होती.

पुढच्या बागेनं मात्र बंगल्याला वेगळाच डौल दिला होता. मध्यावर सुरेख हिरवळ, एखाद्या चागल्या स्थितीतल्या बिलियर्ड टेबलाची आठवण करून देत होती. बाजूला वर्तुळरचनेत वेगवेगळया प्रकारचे फुलांचे ताटवे पूर्ण बहरात आले होते. त्यात डॅफोडिल्स अॅझालेस, पॉलीएनथस वगैरे. आणखीही काही प्रकार दिमाखात डुलत होते.

तो आवारात शिरला तेव्हा आत दोन पोलीसगाडया, दोन गणवेषधारी पोलीस आणि साधारण वीसएक शेजारी–पाजारी उभे होते. त्या सगळयाना मानेनंच हॅलो केलं आणि आत शिरला. आतमध्ये विभागीय कार्यालयाचे डिटेक्टिव श्री. मॉस यांनी त्याचं स्वागत केलं. तो त्यांचा मित्रच होता. जरा वयस्क पण अत्यंत सावध डिटेक्टिव:

मॉसनं विचारलं, 'पिरोचा पत्ता लागला का ?' पाठोपाठ मंद स्मित केलं. त्याला बहुधा म्हणायचं होतं, ओ स्कॉटलंड यार्डवाले मुंगीच्या गतीनं काय चालता ?

'तुम्हाला तो इतका हवाय ?' रॉजर

'पाहिजे म्हणजे काय, हवाच !' मॉस

'खून करत असताना तो दिसला ?' रॉजर

'जवळपास तसंच' मॉस

'कोणी पाहिलं ?' रॉजर

'शेजारची बाई. त्याच्याकडे सध्या तो छोकरा आहे. आजवर प्रथमच एखादी बाई न भिता पोलिसांच्या समोर उभी आहे. काल रात्री नऊच्या सुमाराला ती कुत्र्याला हिंडवायला बाहेर पडली होती. या बंगल्यावरून जाताना पिरो पती–पत्नीचं कडाक्याचं भांडण तिच्या कानावर आलं. हा प्रकार तिनं पूर्वी कधीच अनुभवला नव्हता.

पृष्ठ २१ वर

मुलाखत : निकोलस टिण्डल

# डळमळित कुटुंब? मॅरेज कौन्सिलर्स!

लग्नं स्वर्गात जमवली जातात खरी; पण मोडायची झाली, तर मात्र ती पृथ्वीवरच मोडतात; पण आपल्या समाजात-देशात लग्नं फारशी मोडत नाहीत. याचा अर्थ प्रत्येक जोडपं आणि त्यांचं कुटुंब सुखी असतंच असं नाही. पण आपल्या कुटुंबव्यवस्थेतलं स्त्रीचं अर्थाजन न करणारं तथाकथित दुय्यम स्थान आणि पैसे कमावण्याचं पुरुषाच झालेलं चंग, शहरातनं दिसणारी बदलती कुटुबव्यवस्था, यामुळे कौटुंबिक सुखावर परिणाम होतो हे समजायला कोणतीही पुस्तकं वाचायला लागतात असं वाटत नाही; पण पुढारलेल्या पाश्चात्य समाजाकडे बोट दाखवून आपल्या उच्च संस्कारांमुळेच आपली कुटुंबव्यवस्था टिकून आहे, नाही तर तिकडे पहा कसे धडाधड घटस्फोट होताहेत ते, अशी नाकं मुरडली जातात. घटस्फोटांची संख्या वाढली आहे यात शंकाच नाही. एकटया चिमुकल्या ब्रिटनच्या बेटावर एक लाख साठ हजार घटस्फोट दरवर्षी होतात; पण हीच कुटुंबव्यवस्था सावरण्याकरता वितुष्ट आलेल्या जोडप्यांमध्ये प्रेमाचे संबंध फिरून रुजवण्याकरता पुढारलेल्या राष्ट्रांमध्ये कौटुंबिक सामंजस्य केंद्रं-मॅरेज कौन्सिलर्स याची तितकीच भक्कम यंत्रणा आहे.

इंग्लंडमधल्या एका अशाच नॅशनल मॅरेज गाइडन्स कौन्सिलचे डायरेक्टर निकोलस टिण्डल यांना भेटण्याचा अवसर मिळाला. गेली तीस-चाळीस वर्षं मॅरेज कौन्सिलिंगमध्ये ते काम करताहेत. इंग्लंडमधल्या कोसळत्या कुटुबव्यवस्थेच्या त्यांच्या अभ्यासावरून आपल्यालाही काही शिकण्यासारखं आहे. मुंबईसारख्या गजबजत्या शहरात तर त्यांनी सांगितलेले अनुभव फारसे परके वाटत नाहीत.

इंग्लंडमध्ये कुटुंबव्यवस्था ही मिश्र स्वरूपाची आहे. म्हणजे एक लाख साठ हजार घटस्फोटित माणसं फिरून लग्न करत असतात. त्यामुळे एका कुटुबात खरोखरच तुझी मुलं, माझी मुलं आणि आपली मुलं असं दृश्य दिसतं; पण त्याच वेळी ही मुलं आपल्या आजी-आजोबांपासून, आत्या-मावशा-काका-मामापासून दूर झालेली असतात. त्याना गुतागुतीच्या नातेसंबंधाची कल्पनाच येऊ शकत नाही. त्याचप्रमाणे एकदा घटस्फोट झालेल्या माणसाच्या दुसऱ्या किंवा तिसऱ्या लग्नापासून असणाऱ्या अपेक्षाही जबरदस्त असतात. परत एकदा श्रीगणेशापासून सुरुवात करायची मनानं तयारी केलेली असते; पण आधीच्या लग्नाची नाव घटस्फोटानं फुटलेली असेल, तर अशा फुटक्या नावेतूनच आपले काटेरी कंगोरे घेऊनच दुसऱ्या लग्नात सुखी व्हायचं असतं, हे पहिल्या लग्नापेक्षाही कठिण असतं. असच दुसऱ्यांदा केलेल्या लग्नातलं दुखणं घेऊनच अधिक माणसं येत असतात.

विभक्त कुटुबातल्या कौटुंबिक सवयीही बदललेल्या आहेत. पूर्वी दिवाणखान्यातल्या शेकोटीपाशी उबेला बसून सगळे ब्रिटिश कुटुंब जेवणानंतर गप्पा मारीत असे; पण दूरदर्शन आल्यानंतर सर्व माणसं या इडियट बॉक्ससमोर बसून फक्त पहातात तेही एकेकटयानं, एकमेकाशी न बोलता. शेकोटीची ऊब जाऊन यान्त्रिक हीटर आले, आता सर्वांनी आपापले पसंतीचे चॅनल लावून बसावं, एकत्र बसण्याची काही गरजच उरली नाही. इंग्लंडमधल्या सुखी जोडप्यांना जेव्हा विचारलं की तुम्ही एकमेकांशी किती वेळ बोलता, तेव्हा सहा मिनिटांपेक्षा अधिक वेळ ते बोलत नाहीत! स्त्री-मुक्तीचाही परिणाम कुटुबावर झाला आहे पूर्वी भरल्या संसारातून एखाद्या पुरुषानं उठून जाणं-बाहेर पडणं हा सर्वसाधारण अनुभव होता. आता स्त्रिया अशा रीतीनं बाहेर पडू लागल्या आहेत. मागं तान्हं मूल ठेवूनसुद्धा!

अपुऱ्या वेळामुळं म्हणा किंवा संघर्षमय जीवनामुळं म्हणा, माणसाना आपली दुःख, कुचंबणा एकमेकाकडे, कुटुंबातल्या व्यक्तीकडे व्यक्त करायला जमत नाही. प्रत्येक व्यक्ती स्वतंत्र असल्यामुळं दुसऱ्याच्या दुःखाचा बोजा काय आहे हे ऐकून घ्यायलाही तयार नसते. अशी दुःखी नवरा-बायको एकमेकांपासून दूर जातात, ती मनानी आणि मग एकमेकाना काही सांगण्यासारखं उरत नाही आणि सांगायचं असलं तरी ते कसं सांगायचं हे उमजत नाही. मनाची ही कोंडी तोडायला एखाद्या तिऱ्हाईत माणसाचाच आधार घेणं श्रेयस्कर ठरतं. मॅरेज-कौन्सिलर नेमकं हेच करतो.

टिण्डल याच्या 'नॅशनल मॅरेज गायडन्स कौन्सिल'च्या इंग्लंडमध्ये पाचशे शाखा आहेत आणि वर्षाला जवळजवळ ३५००० कुटुबाना ते सल्ला देतात. ६० ते ७०% यशही त्याना मिळत. केन्द्राचा सल्ला घेतल्यानंतरही घटस्फोटाची पाळी आली, तर घटस्फोट सुकर करण्याचा, कडवटपणा कमी करण्याचा प्रयत्न ते करतात. त्याच्याकडे काम करणारे केवळ प्रशिक्षित सामाजिक कार्यकर्ते आहेत असं नाही. काही स्वयंसेवीही आहेत. अशा प्रकारे डुबती नौका वाचवणाऱ्या खलाशालाही आपलं कौशल्य पणाला लावावं लागतं. स्वतःचा मानसिक तोल ढळू न देता, मुख्य म्हणजे नवरा-बायकोपैकी कुणाचीही बाजू अधिक चूक किंवा अधिक बरोबर हे न ठरवता अलिप्तपणे काम करावं लागतं आणि हे काम करायला मनाची परिपक्वता, भावनाविवश न होण्याची हातोटी लागते. संवेदनाशील असूनही आशावादी दृष्टिकोन असावा लागतो. हट्टीपणा, दुराग्रह, आपलंच खरं करून दाखवायची जिद्द असून भागत नाही. मन अगदी लवचिक असावं लागतं.

सल्ला देण्याची आणि घेण्याची पद्धत काय? — सल्ला घेऊ इच्छिणारा, केन्द्रामध्ये स्वतः होऊन येतो. सल्ला द्यायला शक्यतो कोणीही कौन्सिलर कुणाच्या घरी जात नाही. असं का? कारण सल्ला घेण्याच्या प्रक्रियेत केन्द्राचा पत्ता शोधून, वेळ ठरवून, जागा हुडकून काढण्याची कृती, हा देखील प्रक्रियेचा महत्त्वाचा भाग असतो. इतपत स्वयंस्फूर्तीनं धडपड करण्याची, जमवून घेण्याची तरी उमेद शिल्लक आहे, याचा तो पुरावा असतो.

ब्रिटिश माणसं अजूनही आपल्या घराला किल्ला समजतात. त्यामुळं अशा प्रकारे सल्ला द्यायला त्याच घरात जाणे हे सोपं नसतं. सेंटरच्या कार्यालयात त्या व्यक्तीला एकाच सल्लागाराची नेमणूक करण्यात येते. साधारणपणे ५० ते ६० मिनिटं वेळ देण्यात येतो. आठवड्यातून गरजेप्रमाणे एक–दोन वेळेला अशी भेट होते; पण सल्ला देतात म्हणजे नेमकं करतात तरी काय? अर्थात याचं उत्तर प्रत्येक केसमध्ये वेगवेगळं असतं. टिण्डल यांनी या संदर्भात एक मार्मिक केस सांगितली. एक मध्यमवयीन जोडपं त्यांच्याकडे आपलं गाऱ्हाणं घेऊन आलं. त्यांची पहिली अडचण अशी की, घरातल्या पाळलेल्या भल्या मोठ्या कुत्र्याला रोज व्यायाम करायला कोणी बाहेर घेऊन जायचं? एकमेकांच्या अंगावर जबाबदारी टाकायची, आपली सुटका करून घ्यायची आणि आपलीच बाजू बरोबर आहे हे सिद्ध करायला कुत्रा हे फक्त हत्यार होतं. खरं म्हणजे या दोघाचे आई–वडील त्या दोघांवर आपला हक्क सांगून त्यांच्याकडून कामं करवून घेत होते. प्रत्येक गोष्ट आपापल्या आई–वडिलांना विचारून करायची असल्यामुळं बारीकसारीक गोष्टीतही गुतागुत निर्माण झाली. हे सारं त्या दोघानीच भडाभडा बोलून कौन्सिलरपुढं मांडलं. अनेक दिवसांचं ओझं कमी झालं आणि त्या दोघाना आपसूकच जाणीव झाली की, केवळ कुत्रा फिरविण्याचीच नाही, तर कुटुंबाचीही जबाबदारी त्या दोघांची आहे. घरातल्या कामाबद्दलचे निर्णय त्यांचे त्यांनीच घ्यायचे आहेत. हे जोडपं परत जेव्हा आलं, तेव्हा कुत्र्याचा विषय निघालाच नाही! तो प्रश्न सुटला होता. मनातल्या सगळ्या व्यथा मोकळेपणानं कोणापुढं–एका तटस्थ व्यक्तीपुढं मांडल्यामुळं एक नवी दृष्टी मिळाली होती, नवी जाणीव झाली होती.

हा प्रकार चक्क जादूसारखा वाटत असला, तरी प्रत्यक्षात असं घडू शकतं; पण मॅरेज कौंसिलरकडे जायचं धाडस योग्य वेळी झालं तर गोष्टी पुष्कळ सोप्या असतात. टिण्डल यांच्या मते माणसं जेव्हा ' आठवतं का तुला १७ जून १९६३ ला? बुधवार होता तो. संध्याकाळी ६। वाजता यायचं कबूल केलं होतंस; पण एक तास वाट पाहूनही आला नाहीस......आणि तू तरी आलीस का २३ डिसेंबरला? ' अशा प्रकारे जुने जमाखर्च काढतात त्या वेळी लग्नात फक्त कडवटपणाच राहिलेला असतो. इथे प्रश्न दोन व्यक्तींच्या आत्मप्रौढीचा असतो. त्यामधली लग्न ही सामायिक गोष्ट संपलेली असते. अशा अवस्थेला जेव्हा एखादं जोडपं येतं, तेव्हा आमच्या मदतीतून काही उत्पन्न होतंच असं नाही. अखेर मानवी प्रयत्नांनाही मर्यादा आहे आणि या मर्यादा जाणून घेऊनच कौन्सिलर काम करत असतो. अनेकदा एखाद्या व्यक्तीची दर्दभरी कहाणी ऐकून आता याला काय उत्तर द्यावं असा प्रश्नही त्याला पडतो. ( याच्या १/३ प्रश्न जरी माझ्या वाट्याला आले असते, तर मी दहा वर्षांपूर्वीच आत्महत्या करून मोकळा झालो असतो, असंही त्याला कधी वाटतं! ) पण ती व्यक्ती मात्र म्हणते, बरं वाटलं बुवा/बाई! आणि समाधानानं निघूनही जाते. इथे सल्ला नाही, फक्त समंजसपणे भोगलेला वाटून घेतलेला अनुभव आहे. आपल्या बरोबर आपल्या दुःखात कोणी तरी सहभागी आहे या जाणिवेनंच त्या व्यक्तीचं दुःख हलकं झालं.

अर्थात भारतात अजूनही एकत्र कुटुंबपद्धती दिसते. अशा कुटुंबातून जबाबदारीची विभागणी झाली, तरी कुचबणा कमी झालेली नसते. केवळ घरातल्या स्त्रियाच नाहीत, तर तथाकथित कर्ते पुरुष देखील क्षुल्लक कारणावरून भांडतच असतात. वर-वर सुखी वाटणाऱ्या कुटुंबव्यवस्थेतही मॅरेज-कौन्सिलरला–कौटुंबिक सल्लागाराला निश्चित स्थान आहे. दुर्दैवानं मुंबईसारख्या शहरातही अशी केन्द्रं विरळाच दिसतात आणि असलीच तर ती सार्वजनिक रुग्णालयांच्या आवारात म्हणजे थपर्यंत पोचणंही कठिणच. सहज जिउपलब्ध होऊ शकतील आणि जिथे जावंसं वाटेल अशी कौटुंबिक सामंजस्यकेन्द्रं आणि मॅरेज-कौन्सिलर्स यांची भारतातही नितांत गरज आहे–अगदी परदेशातल्याइतकीच!

–ललिता बर्वे

---


**NEW TITLES RECEIVED**

१. दीपशिखा–( कादंबरी )–पद्मिनीराजे पटवर्धन
२. तांबडफुटी–( कादंबरी )–गो. नी. दाडेकर
३. रक्तरेखा–( कादंबरी )–शशी भागवत
४. वाटेवरल्या सावल्या–( आत्मचरित्र )–वि. वा. शिरवाडकर
५. ठुमरी–( आत्मकथनपर लेख )–उमाकान्त ठोमरे
६. ब्लॅक इज ब्युटिफुल–( प्रवासवर्णन )–सुधा गोखले

1. Images of The World–( National Geographic Book Crystal Clear Photographs with information )
2. The Treasury of Dogs–( Rare Photographs & reliable information )–Octopus Books.
3. The Prodigal Daughter–( Bestseller )–Jeffrey Archer
4. Side Effects–( Bestseller–Humour )–Woody Allen.
5. Fever–( Bestseller–Medical Novel )–Robin Cook.

**The Phoenix Library**
727, opp. Sadashiv Post, Pune–30.

# बुद्धिप्रामाण्यवादी ' मोहीम '

प्रा. व. वि. अकोलकर

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यानी बुद्धिवादाची समर्पक व्याख्या केली आहे. ' आपल्या जाणिवेत जे जे येते त्याच्या खरे–खोटेपणाची तपासणी म्हणजे बुद्धिवाद. ' ' अंधश्रद्धेची ' देखील स्पष्ट व सर्वमान्य व्याख्या करावयास हवी. मी अशी व्याख्या करतो : ' प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष अशा कोणत्याच पुराव्याचा अभाव असताना एखादी समजूत बाळगणे. म्हणजे अंधश्रद्धा. ' पुराव्याचा अभाव आणि पुराव्याचे अल्पत्व या दोन गोष्टी एकच नव्हेत हे मात्र नेहमी लक्षात ठेवले पाहिजे. पुरावा पुरेसा नाही असे जेव्हा वाटत असेल त्या वेळी ती समजूत (belief) यथार्थ की अयथार्थ याबाबत मत बनवणे पुढे ढकलणे (सस्पेन्शन ऑफ जजमेंट) हेच युक्त असते.

समाजामध्ये काही अंधश्रद्धा आढळतात ही गोष्ट निर्विवाद आहे. त्यापैकी काही अंधश्रद्धापायी अनाचार व अत्याचार घडून येत असतात; काही अंधश्रद्धांचा फायदा मतलबी व व्यापारी वृत्तीची माणसे घेत असतात आणि काही अंधश्रद्धा प्रयत्नवादास पायबंदरूप ठरतात हेही खरे. म्हणूनच, समाजाचे प्रबोधन करणे, सामान्य जनतेस विचारप्रवृत्त करणे, लोकांना प्रवृत्तिशील आणि अभ्युदयेच्छु बनवणे ह्या उदात्त उद्दिष्टाने प्रेरित होऊन अनेकांनी आजवर मोलाची समाजसेवा केली आहे व आजही अनेकजण करीत आहेत. अमेरिकेत प्रा. पॉल कुर्टझ यांच्या अध्यक्षतेखाली क. सा. ई. क्ले. पॅ.–' कमिटी फॉर सायंटिफिक इन्वेस्टिगेशन ऑफ क्लेम्स ऑफ द पॅरानॉर्मल '– हा गट आणि आपल्याकडील बुद्धिप्रामाण्यवादीमंच अशा प्रकारचे कार्य करीत आहेत.

आता कोणत्याही समजुतीची यथार्थता–अयथार्थता अनुभवाच्या कसोटीवरच तपासली जात असते. अनुभवास येणाऱ्या घटनांची कार्यकारणभावात्मक उपपत्ती व त्यांची व्यवस्था लावणे हेच बुद्धीचे कार्य होय व त्या कार्यातूनच विज्ञान जन्मास येत असते आणि विज्ञानाचे क्षितिजही वाढत जात असते. अनुभवास येणाऱ्या घटना नाकारणे हे विज्ञानाचे कार्य नसून त्या घटनांचे स्पष्टीकरण देणे हे विज्ञानाचे कार्य होय असे अनेक वैज्ञानिकांनी म्हटलेले आहे. अनुभव आणि अनुभवाची उपपत्ती लावणारी तर्कबुद्धि यावर विज्ञान आधारलेले असते म्हणून एखादी समजूत किंवा कल्पना वैध की अवैध (इनव्हॅलिड) हे ठरवण्याचे दोन निकष प्रा. कुर्टझ यानी स्वीकारले आहेत : (१) *निरीक्षणात्मक अशा प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष पुराव्याचा* आधार नसलेली कल्पना अवैध ( अग्राह्य ) होय; ( २ ) त्या त्या *(विज्ञानक्षेत्राच्या) चौकटीत सुप्रस्थापित झालेल्या कल्पनांच्या विरुद्ध* असलेली कल्पना अवैध होय. ह्या दोन निकषांच्या जोडीस प्रा. कुर्टझ यांनी फलप्रामाण्यवादी (प्रॅग्मॅटिक) दृष्टीचाही काही अंशी स्वीकार केला आहे व म्हटले आहे की, *त्या त्या* कल्पनेचा वा समजुतीचा लोकांच्या वागण्यावर होणारा परिणामदेखील लक्षात घ्यायला हवा. (संदर्भ : जर्नल ऑफ अमेरिकन सोसायटी फॉर सायकिकल रीसर्च, ऑक्टोबर १९७८). हे निकष स्वीकारून, बर्म्यूडा ट्रँगल, पिरॅमिड आकाराचे सामर्थ्य, फलज्योतिष, उडत्या तबकड्या, चेटूक–करणी, भूतचेष्टा (पोल्टर गाईस्ट), वस्तूचे स्थलांतरण, मनाची प्रभावक शक्ती, अनागत–ज्ञान (प्री कॉग्निशन), मरणोत्तर अस्तित्व, पुनर्जन्म इत्यादि कल्पनांचे अन्वेषणात्मक परीक्षण करण्याचा पॉल कुर्टझ याच्या कमिटीचा प्रयत्न असतो. प्रा. कुर्टझ यांची स्वतःची भूमिका आणि वृत्ती अत्यंत समंजसपणाची व खऱ्या बुद्धिवादाला धरूनच आहे. " Where we do not have sufficients evidence, we ought, if possible, to suspend judgment" ...." The scientific attitude does not foreclose on a priori grounds any examination's of claims for the paranormal...'

आपल्याकडील काही बुद्धिप्रामाण्यवादी प्रचारकाचा अशा खुद्द अन्वेषणाकडे किंवा इतरानी केलेल्या अन्वेषणाचा वा प्रयोगनिष्ठ संशोधनाचा मुळामध्ये परिचय करून घेण्याकडे कल नसतो. भ्रामक समजुती, भयावर अधिष्ठित असलेला व अनाचाराची जोपासना करणारा धर्म, वैषम्य आणि नैघृण्य खपवून घेणारा ईश्वर, समाजातील दांभिकता, बुवाबाजी, ' चमत्कार ' म्हणून केले जाणारे फसवणुकीचे प्रकार इत्यादीवर हल्ला चढवणे हेच पुष्कळशा बुद्धिप्रामाण्यवाद्याचे उद्दिष्ट दिसते. ' ईश्वर नाही, पुनर्जन्म नाही, आत्मा नाही ही जी (बुद्धिवादाची) नकारात्मक अंगे ' श्री श्री. वा. किर्लोस्करानी सांगितली आहेत त्याच्यावरच कित्येक बुद्धिप्रामाण्यवाद्यांचा प्रामुख्याने भर असलेला दिसतो.

ह्या संदर्भात बुद्धिप्रामाण्यवादी मरहूम डॉ. अब्राहम कोवूर याची भूमिका आणि काही महाराष्ट्रीय बुद्धिप्रामाण्यवादी प्रचारकाची भूमिका या दोहोमधील फरकही जाणवतो. डॉ. कोवूरानी म्हटले :

' ईश्वर, आस्तिक्यवाद वगैरेच्या विरुद्धही माझा प्रचार नसतो. नास्तिकतेचा प्रचार हेही माझे उद्दिष्ट नाही. मी स्वतः ईश्वराचे अस्तित्व मानीत नाही; परंतु आस्तिकवादाच्या विरुद्ध किंवा नास्तिकवादाच्या बाजूने प्रचार करण्याचा माझा हेतू नाही...मी किंवा माझ्यासारखे रॅशनॅलिस्ट *आपली मते व विचार आजन्म कधीच* बदलणार नाहीं असे नाही. कारण,आपली अनेक मते व कल्पना यात नवीन ज्ञानामुळे *व विज्ञानाच्या प्रगतीमुळे बदल करावा लागतो.* ' ( ' किर्लोस्कर ' फेब्रु. ७७ मुलाखत ). महाराष्ट्रातील एका बुद्धि*प्रामाण्यवाद्याने मात्र त्यांच्या* २२–१०–८२ रोजीच्या टिळक स्मारक मंदिरातील भाषणात, ' शाळेमध्ये नास्तिकता शिकवू दिली जात *नाही ' याबद्दल क्रोधमिश्रित खंत व्यक्त केली. त्याना व त्यांच्या*सारख्या रॅशनॅलिस्टांना प्रश्न असा की, शिक्षणाचे उद्दिष्ट तुम्ही *काय मानता ?* स्वतःच्या बुद्धीने निर्णय करण्यास मुलाना प्रोत्साहन देणे की, विशिष्ट मताची दीक्षा देणे (इंडॉक्ट्रिनेशन) ?

बुद्धिवादी चळवळीविषयी लोकांना आस्था नसल्याची व तिजविषयी गैरसमज असल्याची खंत व्यक्त करण्यात येत असते; परंतु

ह्या वस्तुस्थितीस या 'मोहिमे'चा नकारात्मक अंगावरील भर, प्रचारकांचे तर्कदुष्ट युक्तिवाद आणि काहीजणाची बोलण्या–लिहिण्याची पातळी इत्यादी गोष्टी कारणीभूत असण्याची शक्यता आहे. म्हणूनच मी २२–१०–८२ रोजी त्यांच्या उद्घाटनाच्या भाषणानंतर तर्कतीर्थांना म्हणालो : 'काही बुद्धिप्रामाण्यवादी ज्या तऱ्हेने लिहितात–बोलतात त्यामुळे बुद्धिप्रामाण्यवादाची प्रतिमा काळवंडते.'

## परामानसशास्त्र आणि बुद्धिप्रामाण्यवाद

अमेरिकेत प्रा. कुर्टझ् यानी जाहीरपणे म्हटले आहे की, 'परामानसशास्त्रावर सरसकटपणे हल्ला चढविणे हा (आमच्या) समितीचा इरादा नाही. परासामान्य–पॅरानॉर्मल–घटनांचे प्रयोगाधारे परीक्षण करणाऱ्या, परामानसशास्त्रज्ञाच्या प्रत्येक प्रयत्नाचे आम्ही स्वागतच करतो.' आपल्याकडील काही रॅशनॅलिस्ट मात्र टेलेपथी, क्लेअरवॉयन्स, प्रीकॉग्निशन वगैरे असणे शक्यच नाही असा पुकारा करताना आढळतात. काही दिवसांपूर्वी एक जणाने भाषणात लोकाना सांगितले की, 'मला स्वतःला अतीद्रियज्ञानाचा अनुभव आलेला नाही. माझा त्यावर विश्वास नाही!' श्रोत्यांनीही विश्वास ठेवू नये या अपेक्षेनेच त्यांनी हे सागितले; परंतु ज्या प्रकारची घटना स्वतः अनुभवलेली नाही त्या प्रकारची घटना घडणेच शक्य नसते असे म्हणणे सयुक्तिक ठरत नाही. समजा, एखाद्याने जर म्हटले की, 'मनाची विकृत अवस्था–स्वप्न म्हणा किंवा उन्माद म्हणा–माझ्या अनुभवास आलेली नाही (म्हणून) माझा त्यावर विश्वास नाही,' तर अशा वक्तव्याची किंमत लोक काय करतील बरे?

कोणी एकाने सभेमध्ये विजयी मुद्रेने असा प्रश्न फेकला की, 'ज्याना अतीद्रियज्ञान व सामर्थ्य होते असे मानले जाते त्या व्यक्तीना अखेरीस मरण आलेच ना?' आता, अतीद्रियज्ञान असणे म्हणजे देहदेखील अविनाशी असणे हे तर्कदुष्ट समीकरण गृहीत धरून आपण प्रश्न फेकतो आहोत हे त्या प्रचारकाच्या लक्षातच आले नाही.

काही बुद्धिप्रामाण्यवादी परामानसशास्त्राच्या संदर्भात बोलता-लिहिताना प्रा. जी. आर. प्राइस, प्रा. सी. इ. एम. हान्सेल आणि जादूगार जेम्स रँडी यासारख्यांनी घेतलेले ओक्षेप लोकांना ऐकवीत असतात. प्रा. प्राइसनी डॉ. जे. बी. ऱ्हाइन यांच्या प्रयोगांबाबत १९५५ च्या Science या नियतकालिकाच्या अकात लबाडीचा आरोप ध्वनित केला होता. प्रा. हान्सेल यांनी भौतिक विज्ञान व त्याच्या गृहीतांची चौकट यांच्याशी बाधिलकी अंगीकारली व त्या पूर्व-ग्रहामुळे, जे परामानसशास्त्रीय प्रयोग निर्णायक गणले गेले आहेत त्याच्याबाबतीतसुद्धा 'काही तरी लबाडी' असलीच पाहिजे असे केवळ शकेखोरीचे तुणतुणे वारंवार वाजवले आहे. जेम्स रँडी यांनी यूरी गेलर व टेड सिरिऑस याच्याकडून काही तरी लबाडीच होत असली पाहिजे असे म्हटले आहे; परंतु या गोष्टी श्रोत्या–वाचकापुढे ठेवणारे बुद्धिप्रामाण्यवादी पुढील तीन गोष्टी लोकाना सांगत नाहीत: (१) प्रा. जी. आर. प्राइस यांनी १९७२ साली Science याच नियतकालिकात Apology to Dr Rhine प्रसिद्ध केली आहे. (२) प्रा. हान्सेल लबाडी असू शकेल हे म्हणत आले आहेत; पण लबाडी आहे किंवा होती हे सिद्ध करू शकले नाहीत. शिवाय त्यांनी घेतलेल्या सर्व आक्षेपांचे खंडन तज्ज्ञानी केलेले आहे. (३) रँडी यांना डॉ. यूल आइझ्नेनवुड यांनी आव्हान दिले होते की, टेड सिरिऑसच्या सायकिक फोटोग्राफीच्या प्रयोगात जी नियंत्रित परिस्थिती ठेवलेली होती त्याबरहुकूम परिस्थितीत रँडी यांनी कॅमेऱ्यातील फिलमवर प्रतिमा आणवून दाखवाव्यात; परंतु रँडीनी हे आव्हान स्वीकारले नाही.

पुष्कळदा, बुद्धिप्रामाण्यवादी मंडळी जादूगारांच्या प्रयोगांचा हवाला देऊन बोलत असतात; परंतु ते समाधानकारक नव्हे. एखाद्या तथाकथित अ-सामान्य प्रकारात–चमत्कारात–जादूगारांच्याच युक्त्या आहेत हे त्यांनी स्वतः प्रत्यक्ष उघडकीस आणून दिले पाहिजे. उदा. कोणा बाबांनी तळहात पालथे धरून 'काढून' दिलेली विभूती म्हणजे मर्क्युरी क्लोराइडच असते हे दाखवून द्यावयास हवे. काही भक्तांच्या घरातील बाबाच्या चित्रावरील काचेवरील विभूतीचे थर $NH_4CL$ मुळे किंवा ऑक्झॅलिक अॅसिड व धातू यांच्या संपर्कातूनच निर्माण झालेले आहेत हे त्यांनी दाखवून दिले पाहिजे. तोच प्रकार असणार एवढेच म्हणत राहाणे पुरेसे नव्हे. याच संदर्भात आणखी असे की, जर जादुगाराचे म्हणणे प्रमाण मानावयाचे असेल तर जादुगार पी. सी. सरकार, एम. एस्सी. (मानसशास्त्र) याचेही मत विचारात घ्यावे लागेल. पुण्यास अशोक हॉटेलमध्ये १४–२–७९ रोजी मी व श्री. घुं. ह. बेडेकर यानी घेतलेल्या व वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या त्याच्या मुलाखतीत श्री. सरकार म्हणाले : I believe in certain powers in human beings of which we do not know... The talk about siddhis is not mere bunkum... I do belive in the possibility of psycho kinesis...'

बुद्धिप्रामाण्यवादी मंचाने आयोजिलेल्या मेळाव्यात जनतेची उपस्थिती कमी असली तर त्याचे कारण लोकाना 'सत्य समजले तर काय घ्या?' अशी भीती वाटत असावी असे बुद्धिप्रामाण्यवाद्यांना वाटते. २२–१०–८२ रोजी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री टिळक स्मारक मंदिरात विनोदाने तसे म्हणालेही होते आता, मनोविश्लेषणच करायचे झाल्यास अतीद्रियज्ञानादी मानसिक क्षमताचे अस्तित्व नाकारणाऱ्याचेही करता येईल. प्रख्यात मनोविश्लेषणतज्ज्ञ डॉ. यूल आयझेन बुड यानी असे सूचित केलेही आहे की, माणूस स्वतःच्या अंतरंगाच्या काळचा बाजूस भीत असतो व म्हणून अतीद्रियज्ञान व विचारांचा प्रभाव या कल्पनाना तो प्रतिकार करीत असावा. म्हणजे असे की, टेलेपथी, क्लेअर व्हायन्स व सायकोकायनेसिस हे प्रकार जर खरोखरीच असतील तर स्वत.चे वाईट विचार व दुष्कृत्ये एखाद्यास समजण्याचा, तसेच स्वतःच्या दुष्ट व हिंस्र इच्छा इतराच्यावर परिणाम घडवून आणीत असण्याचा संभव आहे अशी भीती माणसास वाटत असावी. डॉ. आयझेन बुडचे हे मत मी तर्कतीर्थांजवळ बोलून दाखवले. तेव्हा ते म्हणाले, 'खरोखरच माणसाची मूलभूत भावना भय ही आहे आणि तिच्यामुळे माणूस कशावर विश्वास ठेवावा व कशावर ठेवू नये हे ठरवीत असतो.'

## पूर्वजन्म–पुनर्जन्म

समाजात सर्वांना समान संधी देण्याचे प्रयत्न शतकानुशतके न होण्यास 'पूर्वजन्म', 'पूर्वसंचित' व 'पुनर्जन्म' ही कल्पनात्रयीदेखील अंशतः कारणीभूत ठरली ही गोष्ट खरी आहे. तथापी म्हणून ह्या कल्पना

अ-यथार्थ आहेत असा युक्तिवाद करणे म्हणजे केवळ फल-प्रामाण्यवाद अंगीकारणे होय; (परंतु फलप्रामाण्य हा निकष जितका नास्तिवादाचे समर्थन करण्यासाठी वापरता येतो तितकाच अस्तिवादाच्या बाजूनेही वापरता येण्यासारखा आहे.) वरील कल्पना म्हणजे समाजातील आर्थिक, शैक्षणिक वगैरे विषमता टिकवून धरण्यासाठी म्हणून स्वार्थी माणसांनी निर्माण केलेल्या व पसरविलेल्या खोटया कल्पना होत असे सिद्ध होत नाही. गौतमबुद्धाचा भवचक्र–सिद्धांत, गीतेतील बहु-जन्म-सिद्धांत, यांचे मूळ गौतमबुद्धांना, श्रीकृष्णांना व अनेक योग्यांना 'संस्कारसाक्षात्करणा'मुळे झालेल्या 'पूर्वजातिस्मरणात' असण्याची शक्यता नाकारता येत नाही. पूर्वजन्मस्मरणाची शेकडो उदाहरणे गेल्या काही दशकांत प्रसिद्ध झालेली आहेत व त्यांचे कसोशीपूर्वक अन्वेषणही झालेले आहे. अशी उदाहरणे म्हणजे बनवाबनवीचा प्रकार असतो असे म्हणून कोणी ती धुडकावून लावू पाहील तर त्याला लोक असे विचारतील की, 'मी अमक्याअमक्यांचे अपत्य' म्हणून तुम्ही सांगता तेव्हा किंवा इतर कोणी त्यास पुष्टी देते तेव्हा तोही सारा बनवाबनवीचाच मामला असू शकेल काय?

पूर्वजन्म–पुनर्जन्म असंभव आहे हे लोकांच्या गळी उतरवण्याच्या प्रयत्नात 'भस्मीभूतस्य देहस्य पुनरागमनं कुतः' ह्या चार्वाक-प्रश्नाचा पुनरुच्चार करण्यात येत असतो; परंतु पुनर्जन्म–सिद्धांतात असे कोठे तरी म्हटलेले आहे काय की भस्म झालेला जो देह तो पुनः परत येत असतो? ◻

काही काही बुद्धिप्रामाण्यवाद्यांच्या आणखी काही गोष्टीही खटकतात. अमुक गोष्टीवर स्वतःचा विश्वास नाही हे लोकांना सांगण्याचे स्वातंत्र्य ते घेतात; परंतु श्री. विजय तेंडुलकरांसारख्यांनी स्वतःचा गूढविद्येवर व अतींद्रिय–अनुभवावर विश्वास असल्याचे जर स्पष्टपणे सांगितले तर त्यांच्यावर मात्र 'आयुध' उगारले जाते व त्यांनी स्वतःचा विश्वास स्वतःपाशी ठेवावा असे त्यांना बजावण्यात येते! हा प्रकार पाहून लोक अर्थातच म्हणतील की, नास्तिवाद्यांनी स्वतःचा अविश्वास स्वतःपाशीच ठेवावा, तसेच एखाद्या प्रतीकामध्ये–उदा ॐ मध्ये–त्याला स्वतःला जे काय दिसते ते त्याने स्वतःजवळच ठेवावे! फार तर मनोवैद्यास सांगावे.

खटकणारी आणखी एक गोष्ट म्हणजे लिहिण्या–बोलण्याची पातळी. तिकडे अमेरिकेत 'ह्यूमॅनिस्ट' नियतकालिकात लिहिणाऱ्या एकाने म्हटले आहे की, 'वाचकवर्ग सामान्य जनता असते आणि मने वळवणे व उपहास करणे हा हेतू असतो त्या वेळी असे (सदभिरुचीस सोडून) जर लिहिले तर त्यात काय गैर आहे?' आपल्याकडील काही बुद्धिप्रामाण्यवादी जेव्हा सदभिरुचीस सोडून लिहितात–बोलतात तेव्हा लोकांच्या मनात प्रश्न उभा राहातो की, त्यांचे लिहिणे–बोलणे त्यांच्या व्यक्तित्वगुणांचे द्योतक आहे की, विदेशी अनुकरण आहे?

प्रा. पॉल कुर्टझ यांनी म्हटले आहे की, 'आमच्या ('ह्यूमॅनिस्ट') नियतकालिकात जे जे प्रसिद्ध झाले आहे त्या सर्वांशी मी नक्कीच सहमत नाही.' इकडे डॉ. अब्राहाम कोवूट यांनीही म्हटले की, 'आजही सर्व बुद्धिप्रामाण्यवादी एक सुरात बोलतात, त्यांची संपूर्ण एकवाक्यता असते असे नाही. किंबहुना, स्वतःच्या बुद्धीला प्रमाण मानणे ही कसोटी मानली तर काही वेगळी मते, विचार, कल्पना हे आलेच.' (पहा. 'किर्लोस्कर', फेब्रु. १९७७). तर मग बुद्धिप्रामाण्यवादाचा प्रचार करताना बुद्धिप्रामाण्यवाद्यांनी आपापसात कोणकोणत्या मुद्द्यांवर आणि कोणकोणते मतभेद आहेत हेही जनतेस सांगावयास हवे. हे कर्तव्य त्यांनी केले म्हणजे साहजिकच लोक स्वतः विचार करू लागतील आणि म्हणू लागतील की, आपणही आपल्या स्वतःच्या अनुभवांचा पुरावा विचारात घ्यावा, इतर यथार्थ वक्त्यांचे (–'आप्तांचे'–) अनुभवही जाणून घ्यावेत, विश्वासार्ह अशा प्रयोगांच्या आधारे निघालेले निष्कर्षही पहावेत, एकंदर विज्ञानाची क्षितिजे वाढत आहेत ही गोष्टही नजरेसमोर ठेवावी आणि आपापले मत आपापल्या बुद्धीने बनवावे. मला वाटते की, प्रत्येक प्रामाणिक बुद्धिप्रामाण्यवादी लोकांची ही प्रतिक्रिया स्वागतार्हच मानील. ◻

---

## पुस्तके

# अस्तित्वाचा बनावट शोध

दीनानाथ मनोहर यांची 'सीमान्त' ही लघु कादंबरी मानवी अस्तित्वाचा शोध घेते. त्यासाठी आभा नावाच्या एका मनस्वी तरुणीची गोष्ट सांगते.

आभा गेली चार वर्षे मुंबईला एका सुसज्ज मेंटल हॉस्पिटलमध्ये सायकोथेरापीची डॉक्टर म्हणून काम करत आहे. तिच्यापुढे सध्या एक पेच आहे. रवीने तिला लग्नाची मागणी घातली आहे. त्याला तावडतोब तिचा निर्णय हवा आहे. त्याला 'हो' म्हणावे की 'नाही' या संभ्रमात तिचे मन ढवळले गेले आहे. तिच्या सबंध अस्तित्वाचा अर्थ सीमित करू पाहणारा हा घोर निर्णय करताना ती कचरत आहे. तिला आजवरच्या आयुष्यात आलेला अनुभव व ती सध्या चिकित्सा करत असलेल्या सीमाचे उदाहरण तिला लग्नास नकार देण्याच्या मनःस्थितीत आणून सोडतात.

आभा स्वतंत्र बाण्याची मुलगी आहे. तिच्या कुटुंबात वडिलांचे पुरुषी वर्चस्व सहन न झाल्यामुळे ती घराच्या बाहेर पडून हिंमतीने एकटेपणी जगत आहे. यापूर्वी ती नर्मदानदीवरील बांधकामाच्या योजनेतील नोकरीनिमित्त रानावनात निर्भयपणे राहिली होती, आपल्या दवाखान्याची मर्यादा ओलांडून कामगारात सहानुभूतीने मिसळली होती व तिथे अन्यायाचा प्रतिकार करताना नोकरी घालवून बसली होती. सृष्टीचे भव्य निरामय रूप पाहताना 'आपण उंच उंच होत आहोत, पसरत विस्तारत चाललो आहोत, सर्व विश्व व्यापत चाललो आहोत.' असे वाटण्याइतकी तिची संवेदना विश्वाला होती; पण तरीही तिला तिच्या स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाचे भान होते; ते तिला टिकवायचे होते.

आणि भोवतीचे जग तिच्या स्वतंत्र अस्तित्वाला छेद देऊ पहात होते. तिचे स्वतंत्र अस्तित्व हिरावून घेऊन तिला प्रचलित व्यवस्थेत जिरवून टाकू पहात होते. या व्यवस्थेला गरीब बिचाऱ्या सैनीबाईवर

झालेल्या बलात्काराची बोच नव्हती. ही व्यवस्था आपल्या अस्मितेची जाग येऊन चळवळ करणाऱ्या कामगारांवर निर्दयपणे गोळ्या झाडत होती. लग्न या व्यवस्थेचेच एक हत्यार होते. या लग्नामुळेच आभाच्या सालस व पतिपरायण आईला घरात दुसरी बाई आणणाऱ्या आभाच्या वडिलांजवळ किंमत नव्हती. स्वच्छंदतेचे बाळकडू प्यालेल्या सीमाचा लग्नानेच चोळामोळा केला होता. आपले व्यक्तित्व मिटवून टाकणारे लग्न आभाला नकोसे वाटत होते. रवि तिला आवडत होता; त्याचे प्रणयसुख तिने अनुभवले होते. लग्न न करताच ती त्याच्याबरोबर राहायला तयार होती; पण विधिपूर्वक विवाह हा त्याचा हट्ट होता. त्याला नकार देण्याशिवाय तिला गत्यंतर नव्हते आणि हा निर्णय अत्यंत वेदनामय होता.

ही गोष्ट सांगताना लेखकाने फार घोळ घातला आहे. पहिला घोळ म्हणजे सीमाचे उपकथानक. आभाच्या गोष्टीला गति नाही, फक्त वैचारिक चिंतन आहे. म्हणून काही घटनात्मक कथा बनवण्यासाठी सीमाच्या कथेची जोड देणे आवश्यक वाटले असावे. आभाच्या स्वभावाचित्राला उठाव देण्यासाठी व प्रतिपाद्य विचाराला बळकट करण्यासाठीही सीमाचा उपयोग करण्याचा लेखकाचा हेतू असावा; पण या दोन कथांचे प्रमाण लेखकाला साधले नाही व त्यांचा परस्पर मेळही नीट घालता आला नाही. सीमाची कथा आभाच्या गोष्टीत नाकापेक्षा मोती जड होते.

कादंबरीची सुरुवात मुळी सीमाच्या कथेने होते आणि पहिली ४३ पाने ती सीमाचीच गोष्ट राहते. नंतरची ७० पाने ती सीमाचा आडोसा घेऊन आभाची गोष्ट होते. लेखकाने एका कथेवरून दुसऱ्या कथेवर उडी मारली, असे होते.

सीमा कामावरून घरी परत जात असताना दादर रेल्वेस्टेशनच्या पुलावर 'असंख्य पायाची ओगळ अळी' अशा गर्दीत ती तुडवली जाते. नंतर ती भेटते आभा नोकरीस असलेल्या मनोरुग्णाच्या इस्पितळात. ती शुद्धीवर आली तरी पुन्हा किंकाळी मारून बेशुद्ध होते. शुद्धीवर येण्यास तिचे मन तयार नाही. कारण तिची वास्तवता तिला असह्य झाली आहे. ती 'परत या जगात यायचे नाकारते आहे.' आभाचा तिच्याशी आंतरिक धागा जुळतो व ती सीमाच्या वास्तवांचा मानसशास्त्रीय शोध घेऊ लागते. मग तिचा बाप, नवरा, सासू, नणंद यांच्याशी ती विचारपूस करते, सीमाची रोजनिशी व बापाला लिहिलेली पत्रे वाचते. त्यातून प्रकट होते की, सीमाला बाळपणापासून तिच्या बापाने स्वच्छंद व स्वाभिमानाने जगायला शिकवले होते. पुढे लग्न झाल्यावर तिचा कोंडमारा होऊ लागला. सासरी ढोंगी सभ्यता होती. काही वर्षांनी तिने या परिस्थितीशी जुळवून घेतले असे वरकरणी दिसत होते; पण आतल्या आत तिचे स्वतंत्र व्यक्तित्व धुमसत होते. स्वातंत्र्याची कदर असलेल्या आभाला मनोमन वाटत होते की, सीमाने परत शुद्धीवर येऊच नये. कारण शुद्धीवर येणे म्हणजे मन मारून परिस्थितीशी जुळवून घेणे, पण सीमा शेवटी शुद्धीवर आली आणि तिने नवऱ्याशी जुळवून घेतले.

दुसरा घोळ कादंबरीच्या वैचारिक बैठकीचा. अस्तित्ववादाचे तत्त्वज्ञान मांडण्यासाठी ही सीमा—आभाची जोडकथा लेखकाने जुळवली आहे. पाश्चिमात्य जगातील विचार-प्रवाह तिकडे शिळे झाल्यावर एक-दोन पिढ्यांनी भारतात येतात तशी सध्या अस्तित्ववादाची लाट मराठी साहित्यात उसळली आहे; पण बाहेरचा विचार आपल्या देशातील जीवन—सरणीत कितपत मिसळू शकतो याचा विचार बहुधा कोणी करत नाही, तसा या कादंबरीतही केलेला नाही. अस्तित्ववादी भूमिका माडण्यासाठी ओढून-ताणून ही कथा रचलेली आहे. त्यामुळे ती कृत्रिम झाली आहे. कथेची जुळणी तुटक राहिली आहे.

पात्रांची व प्रसंगांची कृत्रिमता या कथेत फार जाणवते. दादर स्टेशनातील गर्दीत कोणी धडधाकट माणूस तुडवले गेल्याचे ऐकिवात नाही; पण चालता चालता सीमा चेंगरली जाते आणि तिला शुद्धीवर आणण्यासाठी मनोरुग्णाच्या इस्पितळात ठेवले जाते. आभावर मनापासून प्रेम करणारा, लग्नापूर्वीच तिचा सहवास भोगणारा व नव्या विचाराची जाण असलेला रवि आभाजवळ विधिपूर्वक लग्न करण्याचा हट्ट का धरतो व तिचा निर्णय त्याला इतक्या तातडीने का हवा आहे, याला कुठे उत्तर नाही. सृष्टीच्या सान्निध्यात आपण विस्तारत आहोत, विरघळत आहोत, हा अनुभव जसा एका प्रसंगी आभाला येतो तसाच तो दुसऱ्या एका प्रसंगी रवीला येतो. आभाच्या अनुभवाचे वर्णन रसाळ वाटते तर रवीच्या अनुभवाचे मचूळ. 'अस्तित्वाला सीमांची चौकट,' स्वातंत्र्य व एकाकीपणा, 'एका अस्तित्वाने दुसऱ्या अस्तित्वाच्या सहाय्याने स्वतःच्या अस्तित्वाचा शोध' घेणे, आपल्या समोरचे पर्याय, अस्तित्वाचे तकलादूपण, 'तो भयानक एकांत, ती भीति, ती तडफड' वगैरे अस्तित्ववादाची ठराविक परिभाषा, कथेशी एकजीव न होता वारंवार पेरली जाते.

अस्तित्ववादी विचाराच्या नशेत लेखकाने कथेच्या वास्तवाकडे व जिवतपणाकडे जितके दुर्लक्ष केले आहे त्याहून अधिक कथेच्या लेखनाकडे केले आहे. अनेक ठिकाणी चागली वर्णने असूनही भाषेला काही घाटच दिसत नाही. विरामचिन्हांना तर काही धरबंधच नाही. अनास्तित्व, आसूया, 'अधिकार शाबूत (साबित) करायचा नव्हता,' असे चुकीचे शब्द—प्रयोग अनेक ठिकाणी आले आहेत. इतकेच नव्हे तर 'आभा, आभा, माझी आवडती', 'मेंदूतील बाळ,' 'कायमसाठी' असे इंग्रजी वळणाचे शब्दप्रयोगही अनेकदा सापडतात. हे शब्दच केवळ इंग्रजी भाषेच्या प्रभावातून जन्मले नसावेत, सबंध कादंबरीचीच प्रेरणा इंग्रजीतून असावी, अशी शंका येते.

—मा. कृ. पारधी

**सीमान्त**

लेखक : दीनानाथ मनोहर

ग्रंथाली प्रकाशन,

पृष्ठसंख्या : ११२

किंमत : १२ रुपये.

फिनिक्स निवड

# क्रेडिटवर घेतलेली पुस्तके

क्रेडिटवर माल घेतला की, जास्त माल घेतला जातो. एका परीनं क्रेडिट न मिळालेलं बरं. कारण एकदा का क्रेडिट मिळालं की क्रेडिट (किंवा देणं) मारुतीच्या शेपटासारखं वाढत जातं. मग मात्र गंमत होते. धरलं तर चावतं व सोडलं तर पळतं असं काही तरी होऊन बसतं. आमच्या ग्रंथालयात साधारण दहा एक वर्षांपूर्वी एका नामांकित बँकेचे अधिकारी यायचे. त्यांनी मला आग्रह करून त्यांच्या बँकेतून कॅश क्रेडिट घ्यायला लावलं. झालं. आपण फायनान्शियली व्हायेबल आहोत किंवा आपली फायनान्शियल व्हायेबिलिटी झाली त्याबद्दल एक थोडीशी का होईना; पण आनंदाची झलक येऊन गेली. सर्व डॉक्युमेंटस् वगैरेवर सह्या झाल्या. सह्यांचेच डोंगर उभारले गेले. फक्त माझ्याच समोरच्या पार्टीची औषधालाही मला सही मिळाली नाही ! सर्व काही संपल्यावर बँकेचा अधिकारी सरळ व भारदस्त चेहरा ठेवून म्हणाला, 'सोडा आता तुम्ही चेक पंधरा हजारापर्यंत' आणि मी भराभर चेक सोडत गेलो !

आम्हाला म्हणजे अगदी लहान वयात नोकरी पदरी पडली होती. २६–२७ वर्षांपूर्वी पुण्याला आलो त्या वेळेला फुलटाइम स्टेनो सेल्फ कॉरस्पॉन्डन्ट, फायलिंग, डिस्पॅच क्लार्क अशा काही नोकऱ्या पूर्ण वेळ ५०–१०० रुपयांत केल्या. एकदा एका मारवाड्याच्या पेढीवर कामाला होतो. बँकेत पैसे भरण्यासाठी त्यांनी भलं मोठं बुकच बाइंड केलं होतं ! जवळजवळ रोजच चेकचा भरणा असे. चेकचे आकडे पण चार आकडी असत ! शेठजी केव्हा केव्हा बँकेत चेक भरायलाही पाठवत. पैसे भरायचे ते भले मोठे बाइंड केलेले पुस्तक बघून मला आतल्या आत कालवाकालव होत असे. अतिश्रीमंतीमधून अतिगरिबी आल्यामुळे असे झाले असेल कदाचित. चार्ली चॅप्लिनला (का कुणाला तरी) गरिबीतून गेल्यामुळे हातात पैशाची नोट घेतली की कससंच व्हायचं. अगदी अखेरपर्यंत. हे वाचण्याच्या आधीच मला पण तसं काही तरी होत असे. त्या वेळी विचार येत असे, 'या ढेरपोटया शेठजीकडे किती पैसे झाले असतील ? सर्व काउंटरफाइलस्‌ची बेरीज करायची का ?' पण ते काही जमत नसे.

आता आम्हीसुद्धा चेक भरण्यासाठी एक पुस्तकच बाइंड करून ठेवलं आहे. या जगात हे असे रोल्स फार विचित्र प्रकाराने रिव्हर्स होत असतात. आमचा कर्मचारी आता बँकेत गेला की, मला वाटते त्याला सुद्धा माझ्यासारखेच वाटत असेल ! 'धंद्यात किती जबाबदाऱ्या, किती अवधाने, किती क्लृप्त्या, किती बारकाव्यांचा विचार करावा लागतो हे या लोकांना कसे कळणार ?' असंच वाटायला लागतं; पण वर्गकलहाने ग्रासलेल्या कर्मचाऱ्याला हे कधीच कळणार नाही आणि मालक–नोकर संघर्ष सुरूच रहातो.

अर्थात आमचे चेक तीन आकडी असतात; पण त्यामुळे वर्गकलह काही आम्हाला सोडीत नाही.

सवय होणे याला सेकंड नेचर म्हणतात. काही काही बंगले बांधणाऱ्यांची काय अवस्था होते बघा ! बंगला बांधायचा म्हणून तुफान बचतीची सुरुवात होते. फाटके बूट घाल, कपडे शिवून वापर, रद्दीची आवक सेव्हिंगमध्ये टाक अशा अनेक प्रकारांनी दिवसरात्र पैसे मोजून निदान काही बंगले किंवा फ्लॅट्स् घेतलेले असतात आणि एकदा बंगला बांधून झाला तरी ही इतक्या वर्षांची सेव्हिंगची हॅबिट अशी काही सेकंड नेचर झालेली असते की यंव !

आता सेव्हिंगची दुसरी बाजू क्रेडिट याचेही असेच होते. लोन घेण्याची सवय मला त्या बँक–अधिकाऱ्याने लावून दिली. इकडून घे, तिकडून घेऊन इकडे दे, तिकडून देऊन थोडं थोडं दोन्हीकडे दे असा खेळ करायला लागलो. अर्थात सुखवस्तू लोकांना हे विक्षिप्त वाटेल; पण यातले जे दर्दी असतील त्यांनाच यातली कॉमेडी आणि ट्रॅजेडी कळेल. ज्यांनी डिकन्सची David Copperfield वाचले असेल व ज्यांना आतील मि. मिकॉबरचं पात्र आठवत असेल त्यांना तर असल्या प्रकारात अजिबात विक्षिप्तपणा वाटणार नाही. डिकन्सचे वडील नेहमी मिकॉबरसारखे उधळे व कर्जात जाणारे होते हे इंग्रजी साहित्य वाचणारांना माहीत आहेच. मिकॉबर म्हणजेच डिकन्सचे वडील. शेवटी जितक्या विल–पॉवरने मी सिगारेट सोडली तितक्याच विल–पॉवरने कॅश–क्रेडिटमधून बाहेर पडलो !

आपण बऱ्याच दिवसांपासून पुस्तके खरीदलेली नसतात. पहिला घास घेतल्यानंतर जशी भूक एकदम तेवते तसंच पहिलं पुस्तक घेतल्यानंतर चटपट दुसरी १५–२० खरेदी करतो. चवदार खाण्याने क्षुधा तीक्ष्ण होत जाते त्याप्रमाणे पुस्तकाच्या दुकानात जर पहिली तीन–चार पुस्तके छान मिळाली तर मग आपण ठरवल्यापेक्षा जास्त पुस्तके विकत घेऊन बसतो आणि पुस्तकाच्या दुकानात सोबत सॉफ्ट म्युझिकची संगत असेल तर मग दुधात साखरच ! सुज्ञ पुस्तकविक्रेत्यांना हे माहीत असते व आपल्या दुकानचे वातावरण ते त्यानुसार ठेवतात.

अशाच एका दुकानातून परवा पुष्कळ पुस्तके मिळाली.

पहिलं म्हणजे 'ओरिजिन'. हे 'लस्ट फॉर लाइफ'वाले आर्यविंग स्टोन यांनी लिहिले आहे. इंग्रजीत चरित्रात्मक कादंबऱ्या लिहिण्यात या लेखकाचा हात कुणीही धरू शकलेलं नाही.

अलीकडे इंग्रजी नॉन-फिक्शन वाचणारा वर्ग वाढतच आहे, हे ठीकच आहे. एकदा श्री. कृ. श. हिंगवे यांनी 'महाराष्ट्र टाइम्स'-मध्ये असे लिहिले होते की, फिक्शन आणि नॉन-फिक्शन वाचणाऱ्यांचं 'फिनिक्स'मधलं प्रमाण अनुक्रमे ६० : ४० असे आहे. आता तर आमच्याकडे नॉन-फिक्शन वाचणाऱ्यांचं प्रमाण आणखीनच वाढलं असेल !

परंतु एक नॉन-फिक्शन वाचणाऱ्यांचा थोडा गट असा आहे की, तो फिक्शन वाचणाऱ्यांकडे वरचष्मा ठेवून बघतो; परंतु कित्येकदा कादंबऱ्यातसुद्धा उत्कृष्ट माहिती असते. आर्यविंग स्टोनसारखे कादंबऱ्यांतून माहिती देणारे इतर अनेक इंग्रजी लेखक आहेत.

त्यांची सर्वांत नवीन कादंबरी 'ओरिजिन'.

ही 'ओरिजिन ऑफ द स्पेसिज'वाले चार्लस् डार्विन यांच्यावर आधारित आहे. ही कादंबरी इतकी रसमय व इतकी माहितीपूर्ण आहे की, इंग्रजी पुस्तकं वाचणाऱ्यांनी ती अवश्य वाचावी. चुकवू नये असं काहीपेक्षाही ती वरचढ आहे ! चार्लस् डार्विन घरातून पळून जातो कसा, बंडखोर होतो कसा, त्याचा 'बिगल'मधील प्रवास, गलपागॉस बेटावर त्यांचं क्रांतिकारक संशोधन वगैरे कादंबरीचे अनेक पैलू कौशल्याने हाताळले आहेत. कादंबरी ठोकळेबाज असूनही अजिबात कंटाळवाणी नाही !

'द पॅरिस रिव्ह्यू' हे मासिक १९५३-मध्ये काही तरुण अमेरिकनांनी सुरू केले. १९७८पर्यंत ते जिवंत होते. अजूनही असेल ! असल्या प्रकारच्या मासिकाने २५ वर्षं जिवंत रहाणे हे एक आश्चर्यच आहे. या मासिकाचा मुख्य रोख नॉन-फिक्शन प्रसिद्ध करण्यात नसतो. नव–नवे 'क्रिएटिव्ह' साहित्य इथे प्रकाशित केले जाते. याच मासिकात सॅम्युएल बेकेट व फिलिप रॉय यांच्यासारख्यांच्या कथा प्रथम प्रकाशित केल्या गेल्या होत्या. या मासिकाच्या यशाचे हे एक रहस्य सहज असू शकेल; परंतु लिखाण कसे करावे या विषयावर अनेक नामांकित इंग्रजी लेखकांच्या मुलाखती या नियतकालिकाने घेतल्या. या मुलाखतींना सामान्य वाचकाने भरपूर दाद दिली. हे मासिक टिकून रहाण्याचे हेही एक कारण आहे.

मासिकाच्या मजकुराला वाचकाने दाद दिली की, मग त्या मजकुराचे पुस्तक निघायला वेळ लागत नाही. म्हणून पेंग्विनने आता पाच खंडात या मुलाखती प्रसिद्ध केल्या आहेत. त्याचे टायटल ठेवले आहे **Writers At Work/The Paris Review Interviews.** पाच खंडांपैकी 'फिनिक्स'-मध्ये दुसरा, चौथा आणि पाचवा असे तीन खंड दाखल झाले आहेत. बाकीचे दोन खंड मला तरी अजून कुठल्या दुकानांत दिसले नाहीत. या तीन खंडांत लॉरेन्स डरेल, जे. एस. पॅरेलमन, बोरीस पास्टरनॅक, मेरी मॅकार्थी, कॅथरिन एन. पोर्टर, राल्फ एलिसन, रॉबर्ट फ्रॉस्ट, हेन्री मिलर, एझरा पाउंड, हेमिंग्वे, अल्डूस हक्सले, टी. एस. इलियट, डब्ल्यू. एच. ऑडेन, रॉबर्ट ग्रेव्हज, व्हालिडमिर नावाकॉव्ह, ख्रिस्तोफर इशरवुड, जॉर्ज लुई बॉर्जेस, जॉर्ज डॉस पॅसॉस, एन्थनी बर्जेस, जॉन शिव्हर, जोसेफ हेलर, पब्लो नेरुडा, आयझेक बॅशेविस सिंगर, पी. जी. वुडहाउस वगैरे अनेक नामांकित लेखकांच्या मुलाखती आहेत. ना. सी. फडके यानी 'प्रतिभाविलास' व 'लघुकथा : तंत्र आणि मंत्र' ही पुस्तके लिहून मराठी लिखाणात एक भरीव प्रकारचं कार्य केलं. तसंच या पाच खंडात प्रत्येक लेखकाने Craft of writing या विषयावर लिहिले आहे. वरवर पाहता त्याच्या मुलाखतीत आवरण भेदून गाभ्याकडे जाण्याचे थोडेच प्रकार आहेत असे वाटेल; परंतु या फसल्या आवरणाने वाचकाची दिशाभूल होण्याचा संभव आहे. सर्व बारीक होमिओपाथिक बारकाव्यामुळे कंटाळा येण्याचीही शक्यता आहे. इथे 'बिट्वीन् द लाइन्स' बरंच वाचायला हवं. प्रत्येक लेखकाच्या आधी त्या त्या लेखकाचा परिचय, त्याचे कॅरिकॅचर व त्याच्या मॅन्युस्क्रिप्टमधील थोडा भाग दिलेला असतो. ट्रिव्हिया (trivia) भेदून खोल पहाण्याची कुवत असणाऱ्याना हे पुस्तक आवडेल. प्रत्येक लेखकाने तर हे इंग्रजी 'तत्र आणि मंत्र' वाचायलाच हवे. आपण 'त्यांचं' वाचू शकतो. (प्रयत्न केला तर) पण तेवढ्याच प्रमाणात 'ते' आपलं वाचू शकत नाहीत. हा तोटा 'त्यांचा' आहे. कारण चांगलं लिखाण करण्यासाठी वर्षानुवर्षे चांगलं वाचन करायला लागतं. कोणत्याही लेखकाला भाषेवर, तंत्रावर व अभिव्यक्तीवर पकड येण्यासाठी एक तर कित्येक वर्षे तरी लागतात किंवा अनुभव घेण्याची एक प्रकारची विशिष्ट इंटेन्सिटी लागते. अनुभवाची इटेन्सिटी असली की भाषा मागे भरकटत येते. मला शक्य झाल्यास यातील अनेक लेखकाचे परिचय 'फिनिक्स निवड' आणि मी टिकून राहिलो तर करून देईन.

आता १९८४ जवळ येत चालले आहे. त्यासाठी बर्नार्ड क्रिकचे जॉर्ज ऑरवेलचे चरित्र आत्तापासूनच लायब्ररीत टाकलंय. याच पुस्तकावर श्री. गोविंद तळवळकर यांनी 'टाइम्स ऑफ इंडिया' मध्ये (२५ जुलै १९८२) परिचय करून दिला होता. 'महाराष्ट्र टाइम्स' मधून 'टाइम्स ऑफ इंडिया' मध्ये प्रवेश करायला व्हेस्टीब्यूल असतेच ! या पुस्तकावर बरंच काही लिहिण्यासारखं आहे.

काही महिन्यांपूर्वी मुंबईमध्ये भरलेली Transpersonal Conference बहुतेकाना आठवत असेलच. या परिषदेतील फिजॉफ काप्रा यांचे भाषण माझ्या विशेष स्मरणात राहिले होते. त्याचे नवीन विचार फॅंटसीच्या कड्यावर नेऊन सोडणारे आहेत. परिषदेनंतर इतक्या महिन्यांनी त्यांचं पुस्तक (The Tao of Physics) बाजारात आलं. अलीकडे जिमखान्यावरच्या पॉप्युलर बुक स्टॉलमध्ये छान छान इंग्रजी पुस्तके मिळतात. तिथेच हे मिळाले. त्यामुळे मुंबईच्या खेपा कमी होतात. तिथे सॉफ्ट म्युझिकचा हायफाय स्टीरिओही आहे. पुस्तकांच्या वाढीव किंमतीवर हा एक antidote आहे. पॉप्युलरचे श्री. गाडगीळ यांच्या या उपक्रमाबद्दल धन्यवाद ! असले संगीत लोकांना जाड-जूड चेक्स लिहायला उद्युक्त करते. हा एक मेन बेनिफिट समजावा का स्पीन–ऑफ बेनिफिट समजावा हे पुढे बघू ! सहज विचार आला. काही वर्षांपूर्वीचे पुना कॉफी हाउसमधील काउंटरवर बसणारे गाडगीळ कुठे व आताच्या पॉप्युलरमध्ये बसणारे गाडगीळ कुठे ! त्यानी असाच डायनेमिझम ठेवून 'पॉप्युलर' एअर कंडिशन्ड करून टाकावे' पुण्यात पुस्तकांच्या विश्वात कोण पहिलं एअर कंडिशन्ड करेल याविषयी कधीकधी चर्चा होत असते. याबाबतीत माझा फर्स्ट होण्याचा विचार आहे; पण लास्ट जरी आलो तरी फर्स्टइतकेच समाधान मिळेल !

ज्यांनी डॉ. एरिक बर्नचे 'गेम्स पीपल प्ले' वाचले आहे त्याना आर. डी. लॅंगचे 'Knots' हे पुस्तक आवडेल. म्हणून हेही 'फिनिक्स' मध्ये टाकले आहे. लोक एकमेकाशी कसे वागतात याचा गुंता उकलण्याचा इथे प्रयत्न केला आहे. मध्यमवर्गीयांचा बुरखा फाडणारी ही दोन पुस्तके आहेत. तसं पाहिलं तर मानसशास्त्राचे नियम मध्यमवर्गीयांना काय किंवा इतराना काय सारखेच लागू असतात; परंतु मध्यमवर्गीयांचा ढोंगीपणा, रिफ्रेशन व डिसेन्सी इतर कोणत्याच वर्गात नाही.

इवान इलीचसारखा मूर्तिभंजक झाला नसेल ! प्रस्थापितांविरुद्ध 'टाइम्स ऑफ इंडिया' मधील शामलाल जसे डावे-उजवे (आता) अमिताभी गुद्दे मारतात तसेच लुकडे इवान इलीच अख्ख्या समाजाला बेशुद्ध करायला बघतात. त्यांचे 'लिमिटस टू मेडिसिन' 'डिस्कूलिंग सोसायटी' वगैरे फिनिक्स-मध्ये आधीच असल्याने 'सेलिब्रेशन ऑफ अवेअरनेस' हे दाखल करणे भागच होते !

कलर लायब्ररी इंटरनॅशनल यांची १७ देशांवरची व शहरांवरची १७ पुस्तके घेतली आहेत. यातले फोटो पहाणे म्हणजे एक आगळाच अनुभव. त्यांचे 'इंडिया' हे पुस्तक अधिक पानाचे, अधिक उचीचे म्हणून अर्थात अधिक किमतीचे आहे. या पुस्तकात इतकी देवळे आहेत की, भारतीय संस्कृतीचा ऱ्हास इतकी देवळे बांधल्यामुळे झाला की काय असे वाटते.

—जे. एन्. पोंडा

## ग्रेलिंग क्रिन्सेंट येथील दुर्घटना

पृष्ठ १२ वरून

'मी तिच्याशी नंतर बोलेनच; पण त्या छोकऱ्याचं म्हणणं काय आहे?' रॉजर

मॉस आपले रुंद खांदे उंचावत सांगू लागला–

'त्याला तर बिचाऱ्याला काही आकलनच होत नाहीये. त्याला वाटतय आपली आई अजून निजनच आहे. त्या पोराचं भवितव्य काही खरं दिसत नाही. माहितीचे कुणीही नातेवाईक नाहीत. पिरो स्वत: जन्मानं इटालियन आहे–आणि जवळच्या शेजाऱ्यांना त्याची पूर्वपीठिका काहीच माहीत नाही. मयत स्त्रीनं शेजारणीला एकदाच केव्हा तरी सांगितलं होतं की काही वर्षांपूर्वी तिचे आई–वडील वारले होते आणि ती त्यांची एकुलती एक मुलगी होती.'

'काही दस्तऐवज मिळाला का?' रॉजर.

'थोडेसे कागद मिळालेत; पण त्याबद्दल आवर्जून बोलावं असं काहीही नाही. मला वाटतं ते फार सामान्य जोडपं होतं. फर्निचर हप्तेबंदीनं आणलेलं आहे आणि अतिशय नेमानं हप्ते भरले जातात. दोघांचे आई-लेकाचे जन्मदाखले आहेत. पिरोचं नागरिकत्व ग्रहण केल्याचा कागद, सौ. पिरोच्या आईवडिलांचे मृत्यु-दाखले आहेत. सौ. पिरोचं लग्नाआधीचं नाव मार्जेण्ट, एव्हलिन इथेल मार्जेण्ट. वय सत्तावीस.'

रॉजरचा थंडपणा पाहून मॉस बुचकळ्यात पडला. खुनाच्या खोलीत जिथं इतर अधिकारी तपासकामात मग्न होते त्या खोलीत जाण्याची उत्सुकता रॉजरनं दाखवली नाही. त्यानं रॉजरला भिंतीवरचा एक फोटो दाखवला. 'फॅमिली-फोटो दिसतोय. यंदाच काढला असावा असं वाटतंय.तो छोकरा बरोबर या फोटोतल्यासारखा दिसतो.'

ते सेपिया रंगातलं छायाचित्र स्टुडिओत काढलेलं होतं. तिघंही जण जरा कृत्रिमपणे पोज देऊन बसले होते. ती दिसायला आकर्षक होती. त्याच्याजवळ पुरुषी सौंदर्य होतं. ती जितकी इंग्लिश दिसत होती तितकाच तो दक्षिण युरोपीय दिसत होता.

आश्चर्याची गोष्ट म्हणजे तो छोकरा मात्र दोघांपैकी कुणासारखाच दिसत नव्हता. साधा गोल चेहरा, आई किंवा बाप यांच्या तुलनेनं, बरंच मोठं डोकं, मोठ्या डोळ्यात कुतूहल भरलेलं, खूप बारीक हात. पाय मात्र कोणाचेच दिसत नव्हते.

'तुम्ही मगाशी त्या मुलाचा जन्मदाखला पाहिला म्हणालात?' रॉजर.

'हो.'

'सगळं काही रीतसर आहे.'

'तुम्हीच प्रत्यक्ष पहा ना.'

त्यावर लिहिलं होतं, बाप–अँथनी पिरो, आई–एव्हलिन इथेल. तारीख–

'त्याच्या लग्नाची तारीख काय आहे?' रॉजरनं विचारलं. मॉसनं तोही दाखला त्याच्या हातात दिला. 'थँक्स. लग्न ७ फेब्रुवारी १९५० आणि मुलाचा जन्म १ ऑक्टो १९५०.'

'प्रेमप्रकरणातून लग्न झालं असावं. लग्नाचे पाश पडताना तिला दिवस गेले आहेत हे बिचाऱ्यांना खचितच कळलं नसणार!

'नाही! मला वाटतं जरा घराचा फेरफटका करू या!' रॉजर अजूनही बेडरूममध्ये जायला मागत नव्हता.

इतर सगळ्या खोल्यातून ते फिरले. सगळीकडे नीटनेटकेपणा. सकाळची धूळ सोडली तर घरातील लोकांचा प्रेमाचा हात सर्व वस्तूवर फिरलेला कळत होता. या घरात फक्त सुख आणि समाधान यानाच आश्रय असल्याचं जाणवत होतं.

शेवटी एकदाचं रॉजरनं बेडरूमचं दार उघडलं.

मृत्यूनंतरही सौ. पिरोचा चेहरा प्रसन्नच दिसत होता. फक्त गळ्याजवळ आवळल्याच्या काळ्या–निळ्या खुणा दिसत होत्या. पोलीस-सर्जन तिथं त्याचीच वाट पहात उभे होते. डॉ. सर्जन आणि इतर लोक-फोटोग्राफर, बोटाच्या ठशांचा तज्ज्ञ–या सगळ्यांना रॉजर चांगलाच ओळखत होता.

'हॅलो हँडसम!' डॉक्टर.

'हॅलो. काय म्हणताय, काय सापडलं?' रॉजर.

'पोस्ट मॉर्टेम झाला म्हणजे मी अधिक सांगू शकेन. तोपर्यंत मी म्हणेन...

'किती वाजता मेली असावी?'

'साधारण रात्री आठ ते मध्यरात्र एवढ्या काळात!' डॉक्टर ओठ दुमडत म्हणाले.

'फार सावधपणे सांगताय!' रॉजर कोरडेपणानं म्हणाला. त्यानं तिचा फिकट अविचलित चेहरा पुन्हा एकदा न्याहाळला. मेलेल्या माणसांचे चेहरे–तरुण असोत वा म्हातारे–पहायला तो सरावला होता. तरीसुद्धा पिरोबाईचा चेहरा पाहून विलक्षण अनुकंपा त्याच्या मनात निर्माण झाली. त्या चेहऱ्यामध्ये तिनं भोगलेल्या आयुष्याचा आनंद मिसळा म्हणजे पहा कसा सौंदर्याचा एक आगळा नमुना तयार होईल, असाच विचार त्याच्या मनात डोकावला.

'इतर काही जखमा?' रॉजर.

'माझ्या तरी काही लक्षात आलेल्या नाहीत.'

'प्रकृती बाकी कशी होती?'

'उत्तम.'

'दुसऱ्या बाळंतपणाच्या काही खुणा?'

'नाही बुवा, तुमची तरी कमालच आहे. हे कुठून शिरलं तुमच्या डोक्यात?' डॉक्टर गांगरून म्हणाले.

'जा बाहेरच्या बाहेरच्या खोलीतला ग्रुपफोटो बघा आणि घराच्या इतर भागातही चक्कर टाका आणि मग बघा काही प्रकाश पडतोय का? मग तिला घेऊन जा, फोटोबिटो काढून झाले ना?'– त्यानं फोटोग्राफरला विचारलं.

'होय साहेब!'

'हाताचे ठसे मिळाले का काही?' रॉजरनं तिथल्या एका टंगाळ्या, पिवळ्या कातडीच्या माणसाला विचारलं.

'तीन ठसे मिळाले साहेब. एक तिचा, दुसरा बहुधा पुरुषाचा आणि तिसरा मुलाचा.

**थोडेसे कागद मिळालेत; पण त्याबद्दल आवर्जून बोलावं असं काहीही नाही....**

'आणखी काही ?'

'नाही, काही नाही.'

'घरात जबरदस्तीनं प्रवेश किंवा तत्सम काही ?'

'मी, दारं खिडक्या तपासल्यात, तसं काही दिसत नाही.' मॉसनं खुलासा केला.

'थँक्स'

'मला काही कळत नाही की हे का व्हावं.' मॉस अचानक बोलू लागला. 'घरातल्या नीटनेटकेपणाकडे नजर टाकली की अचंबा वाटतो. असं काय झालं असेल की नवरा घरी येतो, बायकोचा खून करतो आणि पोराला एकटं टाकून फरारी होतो !'

'अगदी बरोबर आहे तुमचा अंदाज आणि म्हणून आपल्याला जसा पिरो हवाय तितक्याच आग्रहानं त्या खुनाचा हेतूही स्पष्ट व्हायला हवाय. काही तरी कारणानं हा उद्रेक झालाय आणि ते कारणच या खुनामागचा हेतू आहे !'

रॉजर विचार करत खिडकीतून मागची बाग पहात उभा होता. उन्हाची तिरीप त्याच्या चेहऱ्यावर आली होती. पुढच्या बागेपेक्षा मागची बाग जरा विस्कटलेली होती. रॉजरच्या मनात हे सगळं आणि आतापर्यंत ऐकलेल्या घटना, पुरावा यांची डोक्यात जुळणी चालू होती. त्याला हेही जाणवलं होतं की मॉस, डॉक्टर, फोटोग्राफर ठसेतज्ज्ञ सगळे त्याचा रुबाबदार चेहरा न्याहाळत होते. या दुर्घटनेचा काही तरी वैयक्तिक आघात झाल्यासारखा तो दिसत होता बहुधा.

तेवढ्यात त्याला बागेच्या पलीकडे हालचाल दिसली. पाठोपाठ एक बाई 'टोनी, टोनी' अशा हाका मारताना दिसली.

त्या बाईला जरा उशीरच झाला होता. एक छोकरा, लाल जर्सी घातलेला, लाकडी कुंपणावर चढायलासुद्धा लागला होता. सहा-सहा इंचावर ठोकलेल्या मजबूत फळ्यांचं कुंपण होतं. प्रसन्न चेहऱ्याची, चांगली उंचीपुरी बाई घाईघाईत तिथवर पोचली. 'टोनी, नको वर चढूस, पडशील !'

'नाही, मी पडणार नाही !' छोकऱ्यानं स्वच्छ सांगितलं. त्याच वेळी रॉजर फ्रेंच खिडकीचं दार उघडून बागेत आला.

त्या बाईला जे जमलं नाही ते रॉजरच्या प्रवेशानं झालं. तो छोकरा अर्धवट थांबला. उन्हामध्ये त्या छोकऱ्याचे रेशमी केस चमकत होते. गोऱ्यागोमट्या चेहऱ्यावर आश्चर्य झळकत होतं. एक पाय कुंपणाच्या एका बाजूला लोंबकळत्या अवस्थेत. दोन्ही छोट्या हातांनी कुंपण घट्ट धरून तोल सावरला होता.

शेजारीण त्याच्याजवळ पोचलीसुद्धा.

'तो माणूस कोण आहे ?' छोकऱ्यानं विचारणा केली. 'डॉक्टर आहे का ?'—

'टोनी, कृपा करून खाली उतर ना !'

'आईला उठवायला डॉक्टर आलेत का ?'

म्हणजे त्यांनी पोराला अजूनही खरं काय ते सांगितलेलं नाही.

रॉजरला फार तीव्रतेनं वाटलं की, त्या पोराला खरं काय ते लवकर सांगावं. हा खोटा कनवाळूपणा उपयोगाचा नाही. कदाचित ते पोर ही बातमी इतक्या शांतपणे पचवेल की ते पाहून कच्च्या दिलाची माणसं आश्चर्याचा धक्का सहन करू शकणार नाहीत. सात वर्षं म्हणजे इतकं अजाण वय आहे की, या प्रकारची बातमी कसलीही दुःख खूण न दाखवता पचवू शकेल !

'डॉक्टर आले ना की मी तुला नक्की सांगेन' त्या बाईनं आश्वासन दिलं. 'पण आत्ता आत चल !'

बाई चांगली होती. पन्नाशीची असावी. केसावर पांढऱ्या छटा आल्या होत्या. गर्द निळा पोशाख अंगावर होता. एका हातानं पोराचा खांदा घट्ट पकडून ठेवला होता. तो पोरगा मागे वळला आणि खाली उतरला.

'माफ करा; पण मी काही डॉक्टर नाही !' रॉजरनं खुलासा केला.

तेवढ्यात मॉसनं हाक मारली.

'मला आत्ता जायला हवं. बाय बाय !'

'बाय बाय !'

रॉजर वळला आणि आतमध्ये मॉसकडे गेला.

'काय झालं ?'

'आम्हाला आत्ताच बिनतारी संदेश आलाय. किलिंग आणि किलिंग कंपनीनं स्कॉटलंड यार्डला कळवलंय की, पिरो सकाळपासून कामावर आलेलाच नाही !'

'ठीक आहे. मी बोलतो यार्डबरोबर.'

रॉजर झटकन् वळला, काही तरी निर्णय घेतल्यासारखा. पिरोबाईचं प्रेत स्ट्रेचरवरनं बाहेर नेलं जात होतं ते पहायलासुद्धा तो थांबला नाही. बाहेरची गर्दी वाढली होती. आजूबाजूच्या घरांच्या खिडक्यांतून अनेक नजरा या घराकडे लागल्या होत्या.

रॉजर गाडीत शिरला आणि रेडिओ चालू केला. यार्ड कंट्रोल-रूमशी संपर्क साधताच म्हणाला, 'कोर्टलॅण्डसाहेबांना द्या !'

तेवढ्यात एक छोटा गाडा आवारात शिरली. मध्येच थांबली. आतून दोघेजण उतरले. वार्ताहर होते. एकाकडे कॅमेरा होता. रॉजर त्यांच्याकडे निरखून पहात होता.

'काय भानगड आहे मि. वेस्ट ?' कोर्टलॅण्डनी विचारलं.

'मला इथं बरंच 'खोद' काम करावं लागणार आहे. बरीच माणसं हवीत त्यासाठी.आजूबाजूच्या सगळ्या शेजाऱ्यांना विचारायला हवंय. मि. पिरो नक्की किती वाजता घराबाहेर पडला, तसंच त्याच्या मानसिक अवस्थेबद्दल ऑफिसातही चौकशी करायला हवीय. त्याच्या बायकोला लग्नाआधी कुणी मित्र होता का याची माहिती काढणं आवश्यक आहे. त्यातून एखादी ठिणगी उडालीय का तेही जाणून घेणं जरुरीचं आहे. मग, काय करता येईल ?'

'तुला हवी तेवढी माणसं घे; पण काम संपताच त्यांना मोकळं कर. ठीक आहे ?'

'थँक्स !'—रॉजर.

थोड्याच वेळात हालचाल सुरू झाली. विभागीय कार्यालय आणि यार्ड इथून गुप्तहेराचा ताफा निघाला. आजूबाजूच्या यच्चयावत सर्व शेजाऱ्यांच्या जाबजबान्या घेतल्या गेल्या.

ज्या बाईंच्याकडे तो छोकरा होता, त्यांच्याकडे चौकशीसाठी रॉजर स्वत: गेला. त्यांनी सांगितलेली माहिती मॉसने आधी सांगितलेल्या माहितीशी तंतोतंत जुळणारी होती. या बाईंचं नाव फ्रॉस्ट. ती खूप शांत, कर्तबगार आणि स्पष्टवक्ती वाटत होती.

'मी मुलाला आनंदाने आणखी काही दिवस सांभाळू शकेन; पण

पुढं त्याचं काय होणार ? कारण त्याच्या आईनं मला सांगितलं होतं की, तिला कोणीही जवळचं नातेवाईक नाहीये म्हणून !'

'आणि तिच्या नवऱ्याचे कोणी नातेवाईक ?'

'तिच्या माहितीत तरी कोणी नव्हतं.'

'मिसेस फ्रॉस्ट, मला एक सांगा, त्यांची नेहमी भांडणं होत असत ?' रॉजरनं अचानक विचारलं.

'इतकं संतुष्ट जोडपं मी पाहिलेलं नाही. साधा करडा स्वरसुद्धा मी कधी ऐकला नव्हता. हे सगळं विश्वास न बसण्याइतकं खरं होतं. दोघांची टोनीवर प्रेमाची पखरण घालण्याची स्पर्धा होती !'

'अलीकडे काही वेगळं घडल्याचं आठवतंय ?'

अत्यंत समंजस असलेल्या फ्रॉस्टबाईंना या प्रश्नाचं उत्तर कसं द्यावं हेच कळेना. अर्थात रॉजरला तिला पढवायची गरज भासली नाही.

'एक गोष्ट सोडली तर तसं विशेष काहीच नाही. त्या गोष्टीचा उल्लेख करणं मला तर क्रूरपणाच वाटतो. काल सकाळी तिच्याकडे एक जण भेटायला आला होता. टोनी अर्थातच त्या वेळी शाळेत गेला होता. एका छोटया गाडीतून एक माणूस आला आणि घरात शिरलेला मी पाहिला' फ्रॉस्टबाई आवंढा गिळण्यासाठी थाबल्या; पण लगेच रॉजरला संभ्रमात न ठेवता पुढं सांगू लागल्या, 'तुम्हाला कदाचित वाटेल, मी वाह्यातपणा करतेय्; पण खरं सांगायचं तर मला आश्चर्य वाटलं. तो मनुष्य जवळपास दोन तास घरी होता. मिसेस् पिरो टोनीला शाळेतून आणायला निघाल्या तेव्हा तो तरुण मनुष्य बाहेर पडला.'

फ्रॉस्टबाईनं त्या माणसाला पूर्वी कधीही पाहिलेलं नव्हतं. त्याच्याबद्दल प्रकर्षानं काही सांगता येईल असंही काही नव्हतं. तो गोरा आणि चांगला उंच होता यापलीकडे काहीच नाही. या खून-प्रकरणाशी त्याचा काही संबंध हे सांगणंही फार अवघड होतं.

रॉजर तिथनं निघाला. अजूनही मुलाशी बोलायचं टाळलं होतं. मॉसबरोबर काही बोलून फे-चर्च स्ट्रीटवर असलेल्या किलिंग अँन्ड किलिंग कंपनीच्या ऑफिसकडे आपला मोर्चा वळवला. ऑफिस एका काळपट रंगाच्या इमारतीत तिसऱ्या मजल्यावर होतं. लिफ्ट-चालकाला एकच हात होता.

पिरो अजूनही ऑफिसात आला नव्हता.

काल पिरो नेहमीसारखाच शांत होता. कसलीही चलबिचल जाणवली नव्हती. कामाच्या बाबतीत तर तो आदर्श होता. झकास सुखी माणूस होता. पगारही चांगला मिळायचा. खास असे कोणी मित्र मात्र नव्हते बहुतेक तो आपला आपल्याशीच असे. मालकानं पिरोबद्दल निःसंदिग्ध शब्दात ग्वाही दिली., पुढं असंही म्हणाला की, वाटल्यास इतर कर्मचाऱ्यांकडेही चौकशी करा !

एकूण तेरा लोक तिथं काम करत होते. त्यांपैकी दोघाना पिरो-बद्दल इतरांपेक्षा जरा विशेष माहिती असल्याचं दिसत होतं. रॉजरच्या मनात पिरोबद्दलचं चित्र जास्त स्पष्ट झालं. पिरो जेवणासाठी सँण्डविचेस आणत असे. सध्याकाळी ऑफिस सुटल्यावर तडक घर गाठत असे. त्याचं आपल्या बायकोवर आणि मुलावर अत्यंत गाढ प्रेम होतं.

त्यानं आपल्या बायकोला मारलं असेल यावर विश्वास बसणार नाही. केवळ अशक्य !

'तुमच्यापैकी कुणाला, त्याची बायको लग्नाआधी कुठे काम करत असे ठाऊक आहे का ?'

'हो तर, खालच्याच मजल्यावर स्पेन्सर कंपनीत ती पूर्वी काम करत असे !'

रॉजर त्या ऑफिसमध्ये गेला. त्या कंपनीचा मालक कुणीएक स्पेन्सर नावाचा, सौम्य चेहऱ्याचा, गोल डोक्याचा मनुष्य होता. सर्व प्रकारच्या विम्याचं काम करून पैसे मिळवत असे. त्याला एव्हलिन मार्जेण्ट आठवली होती का ? तर ! छान, सुरेख आणि कामात अतिशय तत्पर मुलगी होती ती. छे, छे तिच्यापासून कसलाच त्रास नव्हता तिच्या इटालियन मित्रावर ती मोहरून प्रेम करत असे. आता इतर मित्र म्हणाल, तर त्यात काय वावगं आहे म्हणतो मी. म्हणजे लग्नाआधी एखाद-दोन मित्र असले तर बिघडलं कुठं ! तशी पद्धतच आहे आणि शहाणपणाचीही आहे असं वाटतं. कारण त्या तरुण वयात मुलींना आपल्या मनाचा कल नक्की कुठे आहे हे कुठे कळत असतं ?'

'मिस्टर स्पेन्सर, मिसेस पिरोची लग्नाआधी काही भानगड होती का ?' रॉजरनं जरा कडकपणेच विचारलं. कारण चेहऱ्यावरचं सौम्यपण कदाचित बुरखासुद्धा असू शकेल. या माणसाचा गोल चेहरा आणि गोल डोकं यानी रॉजरच्या मनात कुठे तरी पाल चुक-चुकली. डॉ. सर्जन यानीसुद्धा तो फोटो पाहिला असेल तर वेगळं अनुमान काढणं शक्य आहे.

'खरं सांगायचं इन्स्पेक्टरसाहेब, तर एक भानगड होती; पण एवढं नक्की सांगतो की, त्यात तसं वावगं काहीच नव्हतं. म्हणजे निदान असली भानगड त्यातून निघण्याची शक्यताच नाही.

'कोणाबरोबर होती मिस्टर स्पेन्सर ?'

'माझ्या मुलाबरोबर होती. इन्स्पेक्टर !'

'तुमच्याजवळ इथं त्याचा एखादा फोटो आहे का ?'

'तुम्ही कशासाठी एवढी खोदून चौकशी करताय ? मला काही कळत नाहीये. माझा मुलगा. .....'

स्पेन्सरनं आपलं वाक्य पुरं केलंच नाही. चेहऱ्यावरचा भोळा भाव लुप्त झाला. शेजारच्या जुनाट टेबलाचा एक खण खस्सकन उघडला आणि आतून बरेचसे फोटो काढले. एक बाई व मुलगा, एक बाई व तरुण. एक बाई आणि तिशीतला पुरुष वगैरे.

'ही माझी पत्नी आणि माझा मुलगा. वेगवेगळ्या वयातले फोटो आहेत हे.'

चेहऱ्यावरची रेषही हलू न देता रॉजरने फोटो चाळले. काही वेळ तो गप्प राहिला; पण आपल्याला पुढं काय विचारायचंय याबद्दल त्याचा निर्णय पक्का झाला होता. कारण इतक्या वर्षांनंतरही स्पेन्सरच्या मुलाची चेहऱ्याची गोल ठेवण जराही बदलली नव्हती

**मिस्टर स्पेन्सर, मिसेस पिरोची लग्नाआधी काही भानगड होती का ?**

आणि त्याच्या लहानपणीच्या फोटोमध्ये तर टोनी पिरोशी कमालीचं साम्य दिसत होतं.

'थँक्स मि. स्पेन्सर.' शेवटी एकदाचा रॉजर उद्गारला, 'आता तुमचा मुलगा कुठे आहे ते सांगू शकाल?'

'तो थोड्याच वेळात इथं येईलसुद्धा!' स्पेन्सर म्हणाला. हे म्हणताना आपल्या लालबुंद गोल चेहऱ्यावरची अस्वस्थता, विषाद त्याला लपवता आला नाही 'तो माझ्या धंद्यातला भागीदार आहे; पण इन्स्पेक्टर, तुम्हाला त्याला कशासाठी भेटायचंय?'

'मला हे जाणून घ्यायचय की, अलीकडे तो मिसेस पिरोना केव्हा भेटला होता का?'

स्पेन्सर हताश, निराश झाला. तो म्हणाला, 'ते मी सागतो ना! हो, तो भेटला होता. इन्स्पेक्टरसाहेब, ती एक लंबी कहाणी आहे. अस्वस्थ करणारी आहे. आकस्मिकरीत्या त्यानं मिसेस पिरो आणि तिच्या मुलाला अलीकडे कुठं तरी पाहिलं आणि तेव्हापासून तो कमालीचा अस्वस्थ झाला. बेचैन आहे. दोघातलं साम्य.......'

'साम्य?'

'इन्स्पेक्टर, तुम्हाला जगाचा खूप अनुभव आहे. उगाच वेड पाघरून पेडगावला जाण्यात काही अर्थ नाही हे मला कळतंय. मिसेस पिरो आणि माझा मुलगा याचे लग्नाआधी फार घनिष्ठ संबंध होते. तिथं पिरोशी झालेलं लग्न हा माझ्या मुलाला फार मोठा धक्का होता. तिचा मुलगा हा त्याच्यापासून झालेला असेल हे त्याच्या स्वप्नातसुद्धा आलं नव्हतं; पण जेव्हा अलीकडेच त्या मुलाला त्यानं पाहिलं तेव्हा तो हादरलाच!'

'सहाजिकच त्याला आपल्या मुलाला भेटण्याची उत्सुकता लागली. मिसेस पिरोच्या संसाराला कुठंही तडा जाणार नाही याची काळजी तो घेणार होता; पण केवळ रक्तामासाच्या पलीकडे संबंध असलेलं आपलं मूल पहाण्याची तीव्र इच्छा दाबून ठेवणं अशक्य होतं. काल संध्याकाळभर तो माझ्याशी याबद्दलच बोलत होता. मी त्याला सल्ला द्यायचा प्रयत्न केला की, हे सगळं डोक्यातून काढून टाक; पण, पण मला पक्की खात्री आहे, तसं होणं अशक्य आहे. एका प्रचंड शोकान्तिकेच्या फेऱ्यात तो सापडला. शोकान्तिकाच, दुसरा शब्दच नाही!'

'त्या अचानक झालेल्या दृष्टीभेटीनंतर तो मिसेस पिरोना भेटला होता का?'

'होय, कालच सकाळी तो भेटायला गेला होता; पण कशाला, तोच तुम्हाला सागेल ना!'

चार्लस स्पेन्सर तेवढ्यात आत शिरला. त्याला पहाताक्षणीच मिसेस पिरोचा मुलगा आणि चार्लस याच्यातलं विलक्षण साम्य अत्यंत स्पष्ट झालं.

'मेली?' काही क्षणांनंतर चार्लसचा आवाज घुमला 'एव्हलीन मेली?' एकदा रॉजरकडे मग बापाकडे असं आलटून-पालटून पहात अत्यंत अविश्वासानं म्हणाला. 'पण कशी?'

तेच ठरवायचा प्रयत्न मी करतोय. मि. स्पेन्सर!'

'कमालच झाली. माझा विश्वासच बसत नाही. ती-तिनं मला कसलाही सुगावा लागू दिला नाही.' आपल्या लाल चेहऱ्यावर आपल्या पद्धतीनं आश्चर्य दाखवत होता.

'सुगावा? कशाचा सुगावा स्पेन्सर?'

'ती स्वतःच काही बरं-वाईट करून घेईल याचा. मला माझ्या मुलाचा पत्ता लागल्यावर त्याची भेट, त्याची ओढ टाळणं मला अशक्य आहे यावर तिचं एकमत झालं होतं. हे म्हणजे भयानकच झालं हे:...

-'मिसेस पिरोचा खून झालाय.'

'अरे बाप रे!' चार्लस धपापात म्हणाला. ती ओझरतं असं म्हणाली होती की, नवऱ्याला जर कळलं तर तो तिला ठारच मारील!'

रॉजर संध्याकाळी सहा वाजता कोर्टलॅण्डच्या ऑफिसात गेला.

'पिरोचा अजूनही ठावठिकाणा लागलेला नाही. तेव्हा त्याचा शोध घेण्यासाठी देशभर संदेश पाठवायची व्यवस्था करता येईल का?' रॉजर.

'हो येईल की, पण मला सांग कसली काळजी पडलीय तुला?'

'मला तो – म्हणजे त्यानं स्वतःचा नाश करून घेण्याच्या आधी हवाय्. कारण तसं होऊ शकेल. या केसबाबत माझं अजिबात समाधान नाहीये. मुळाशी काही तरी सडतंय्!'

'तुझा माणूस तुला मिळाल्याशिवाय तुला समाधान होणार नाही मला माहीत आहे.' असं म्हणत कोर्टलॅण्डनी फोन उचलला आणि पिरोला हुडकून काढण्यासाठी देशभर संदेश देण्याची व्यवस्था केली.

'बरं, आतापर्यंत काय काय प्रगती झाली?'

साधारण वीसएक मिनिटांत रॉजरनं आपल्या शोधकार्याचा साराश सागितला. कोर्टलॅण्ड लक्षपूर्वक ऐकत होते. मग म्हणाले, 'सगळ्या गोष्टी जुळत आल्या की! तुला आढळलं की दोन शेजाऱ्यानी स्पेन्सरला सकाळी तिच्याकडे येताना पाहिलंय्, तिघानी रात्रीचं कडाक्याचं भांडण ऐकलंय्, दोघानी पिरोला रात्री सव्वा-नऊनंतर बाहेर पडताना पाहिलंय, त्या वेळेबद्दल काही शंका आहे का?'

'नाही. कारण टेलिव्हिजनवरच्या एका विशिष्ट कार्यक्रमानंतर एक जोडपं आपल्या कुत्र्याला घेऊन हवा खायला नेमक त्यांच्या घरावरून जात होतं.'

'मला तर अगदी सरळ दिसतंय्. आता पिरो अमुक ठिकाणी दिसल्याचे काही संदेश आले पण ते खोटे ठरले. तो क्वचितच कुठे जात असे. घरकोंबडघा होता. त्याची थोडी पूर्वपीठिकाही आपल्याला मिळालीय्' असं म्हणत कोर्टलॅण्डनी काही कागद रॉजरकडे सरकवले.

रॉजरनं ते चाळायला सुरुवात केली.

पिरोचे आईवडील. युद्धाच्या जरासंच आधी इंग्लंडमध्ये स्थायिक झाले होते. ते वारले तेव्हा पिरो सोळा वर्षांचा होता आणि तेव्हापासून आपलं सगळं आयुष्य इंग्लंडमध्येच घालवलं होतं. त्या कुटुंबाच्या परिचयाच्या माणसांची यादी होती. त्यानी दिलेल्या माहितीवरून हीच गोष्ट स्पष्ट होत होती की, पिरो अत्यंत विश्वासू मनुष्य होता. युद्धकाळात त्यानं नागरी संरक्षण विभागात कामही केलं होतं.

'त्यांना ओळखणाऱ्या मंडळींनी त्यांच्याशी फारसा संपर्क ठेवलेला दिसत नाही.' कोर्टलॅण्ड म्हणाले, 'शिवाय त्याच्याबद्दलची म्हणून जी काही माहिती आहे ती बहुतेक सर्व त्याच्या लग्नानंतरची आहे.'

'हूं! खरंय तुम्ही म्हणताय ते.' रॉजरनं मान्य केलं.' आपल्याला माहीत आहे तो एक मनाचा समतोल असलेला. घरावर नितात प्रेम

असलेला, कसलाही बाहेरख्याली पण नाही, अनुरूप बायको, एकूण अतिशय समाधानी असलेला नवरा, अचानक एका रात्री घरात आरडाओरडा करताना, भांडताना ऐकायला येतो, आयुष्यात पहिल्यांदाच ! त्याच सकाळी बायकोचा प्रियकर येऊन गेलेला आहे आणि आपल्यालाही आता कळलंय. तो मुलगा त्या प्रियकरापासून झालेला आहे. तेव्हा....

'जर मिसेस पिरोनी आपल्या नवऱ्याला सगळं सांगायचं ठरवलं असलं तर–तर काय काय घडलं असेल याचा सहज उलगडा होतो.' कोर्टलॅण्ड मध्येच बोलले. 'हे निमित्त पिरोसारख्या शांत माणसाला पायातून हादरवायला पुरेसं आहे. अशा वेळी माणूस कुठल्याही थराला जाऊन पोहोचतो. आपण त्याला लवकरच पकडू आणि मग—'

'मला आशा आहे की एखाद्या नदीमध्ये तरंगणारं त्याच प्रेत आपल्याला बघावं लागू नये!' रॉजर गभीरपणे म्हणाला. "मी विचार करतोय की, अशा परिस्थितीत सापडलेला माणूस काय करील ?' घर दुभंगलंय; आयुष्यालाच तडा गेलाय, अशा वेळेला ?' रॉजर एकदम दूर झाला. हातावर हात उलटा आपटत म्हणाला, 'त्यांनी आपला मधुचंद्र कुठं साजरा केला ते कळलं तर बरं होईल.'

'बहुतकरून मार्गेट इथं.' कोर्टलॅण्डनी आपला अदाज दिला.

'मिसेस फ्रॉस्टना कदाचित माहीत असेल.' रॉजरचं समाधान होत नव्हतं. विभागीय लोकांना तिला विचारायला सागतो.' कोर्टलॅण्डच्या चेहऱ्यावर त्याच्या अधीरपणामुळं उमटलेलं स्मित त्याला कळत होतं, पण त्याची त्याला पर्वा नव्हती. त्याला उत्तर हवं होतं आणि थोड्याच वेळात त्याला ते मिळालंही. पिरो दांपत्यानं आपला मधुचंद्र बोर्नमाउथला साजरा केला होता.

जणू काय या सगळ्या प्रकरणाला छेद देण्यासाठीच की काय त्याच संध्याकाळी पिरो बोर्नमाउथलाच तिथल्या खडकांवर फिरताना सापडला.

'चागला जिवंत सापडलाय!' कोर्टलॅण्ड उल्हसित होऊन म्हणाले.

'हे फार चागलं झाल.' रॉजर म्हणाला; 'पण आपल्याला का अडकवलय् हे त्याला सागितलंय् का ?'

'नाही.'

'तो तिथं केव्हा गेलाय् असं तो म्हणतो ?'

'काल रात्री शेवटच्या मेलनं. दहा बेचाळीसला वॉटर्लूहून सुटते ती. तो रात्री स्टेशनवर हिंडताना दिसला होता. साधारण वीसएक मिनटं रेंगाळला होता. मग वॉटर्लूकडे – मेल पकडण्यासाठी – जाणाऱ्या गाडीत चढला होता.'

'असं आहे काय ? मी त्याला भेटायला गेलो तर चालेल मला वाटतं !'

'जा, पण तो तुला शेंडी लावणार नाही याची काळजी घे !'

रॉजरला वाटलं होतं त्यापेक्षा पिरो ठेंगणा होता; पण दिसायला मात्र फोटोपेक्षा चांगला होता. बेताच्या उंचीचा, बाधेसूद शरीराचा, गडद केसांचा आणि हलक्या निळ्या डोळ्यांचा हा माणूस कुणाचंही लक्ष सहज वेधून घेईल. रॉजर आणि बोर्नमाउथचा एक डिटेक्टिव यांनी खोलीत प्रवेश केला तेव्हा पिरोनं खुर्चीतून उडीच मारली. ओठ घट्ट दाबून धरलेले आणि हाताच्या मुठी वळलेल्या; पण बोलला मात्र काहीच नाही.

'गुड इव्हिनिंग, मी चीफ इन्स्पेक्टर रॉजर वेस्ट स्कॉटलंड यार्डमधून आलोय. मला तुमच्याकडून काही प्रश्नाची उत्तरं हवीयत.'

'मला वाटतं प्रश्नाची उत्तरं तुम्ही देण्याची वेळ आलीय.' पिरो आग्रहानं म्हणाला. 'मला इथं का डांबून ठेवलंय, गुन्हेगारासारखं का वागवताय ?' मला उत्तर मिळायलाच हवं !' पिरो रागानं फणफणत म्हणाला.

ही फार चलाखी तर नाही ना !

त्याच्या इंग्लिशला उच्चाराचं एक विशिष्ट वळण होतं आणि तो जाणीवपूर्वक वापरत असावा असं वाटत होतं. त्याला सर्व घटनेवर विचार करायला भरपूर वेळ मिळाला होता. तेव्हा सगळ्या प्रकाराच्या उलटतपासणीसाठी उत्तर तयार करणं सहज शक्य होतं त्याचा बेसावध क्षण पकडणं हा सगळ्यात चांगला मार्ग होता.

धक्कातंत्र वापरणं एवढाच उपाय होता आणि रॉजरनं तो अत्यंत कठोरपणे, झटक्यात वापरला.

'अँथनी पिरो, तुम्हाला तुमच्या पत्नीच्या खुनासाठी अटक करणं हे माझं कर्तव्य. काल रात्री दहाच्या सुमारास तुमच्या पत्नीचा, मिसेस एव्हलिन पिरोचा खून झालाय आणि यापुढं तुम्ही जे बोलाल ते लिहून घेतलं जाईल ! कदाचित तुमच्याविरुद्ध पुरावा म्हणून वापरलं जाईल !' रॉजरनं दणका दिला.

आरोप ऐकत असताना पहिल्या क्षणाला पिरो एकदम उसळला; पण मग हळूहळू त्याचा आविर्भाव शरीर गळून गेल्यासारखं झालं. मग अचानक एक वेगळीच चमक त्याच्या डोळ्यात दिसू लागली.




## पाच हजारांपेक्षा जास्त स्त्री-पुरुषांची वजने कमी करण्याचा एक नवा उच्चांक

शास्त्रोक्त पद्धतीने व खात्रीशीर वजन कमी करून ते टिकविण्याचा उच्चाक फक्त "फिगरेल" करते. "फिगरेल" प्रोफेशनल कोर्सेसमुळे आज किती तरी ब्युटिशिअन्सनी स्वत.ची पार्लर्स काढली आहेत. आपणही एक कुशल ब्युटिशियन होऊ शकता. वधू नटविण्याचे कामात तर फिगरेलचा नावलौकिक आहेच.


आता फिगरेलच्या तीन शाखा आहेत.

■ **फिगरेल** — **मदाने एन्टरप्राईज**
जंगली महाराज रोड, पुणे
फोन : ५७०९०, ५३७९१

■ **फिगरेल** — **पारिजात डिपार्टमेंटल स्टोअर**
टिळक रोड, पुणे
फोन : ३१८२२

■ **फिगरेल** — डेक्कन जिमखाना क्लब समोर
पुणे–४ फोन : ५२३५९

# ४ लाख ६३ हजार वाचकांची एकमुखी प्रशंसा




चौथी
डिलक्स
आवृत्ती

लेखक : वि. ग. कानिटकर

॥ पृष्ठसंख्या ५४० ॥ मोठा डबल क्राऊन आकार ॥

॥ भरपूर छायाचित्रे ॥

॥ मूळ किं. १४० रु. ॥ सवलतीत ९५ रु. ॥

चौथ्या डिलक्स आवृत्तीचे खास आकर्षण

## माइन काम्फ

या हिटलरच्या दुर्मिळ आत्मचरित्राची सचित्र ओळख

**राजहंस प्रकाशन**

१०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०.

त्याला ही चमक जाणीवपूर्वक दाखवायची होती का ? या क्षणाला तोंड द्यायची तयारी त्यानं आधीच केली होती का ?

त्याच्या पुढच्या प्रतिक्रियेनं रॉजर आणि डिटेक्टिव गोंधळून गेले. पिरो हल्ला करावा तसा धावून आला. रॉजरचं मनगट गच्च आवळलं.

'खोटं, खोटं बोलताय तुम्ही, ती मेलेली नाही. थापा मारताय तुम्ही !' त्याचं शरीर थरथरू लागलं. दात करकचले, रॉजरच्या मनगटात त्याची बोटं खोल रुतली.

'ती मेलीय हे तुला चांगलं ठाऊक आहे.' रॉजरनं अत्यंत थंडपणे म्हणताना डिटेक्टिवला मागे होण्याविषयी खुणावलं.

'नाही', पिरो विवळला. 'नाही ती मेली नाहीये. मरणं शक्य नाही. मी तिला माझ्यापासून दूर ढकलली; पण तेवढंच. मला वाटत होतं मी तिचा दुस्वास करतोय, पण म्हणून मेली ...'

त्यानंतर सावरायला आणि भानावर येऊन बोलायला एक तास लागला. तो जे काही बोलत होता त्यात तथ्य दिसत होतं. त्याच्या पत्नीनं त्याला मुलाबद्दल सांगितलं तेव्हा विस्फोट झाला. डोकंच कामातनं गेलं. त्या घुश्शात तुम्ही दोघं मरून का जात नाही असंही म्हटलं होतं. तिला घालून-पाडून बोलला होता. तिला ढकलूनही दिलं होतं आणि त्याच सणकीत घरही सोडलं होतं; पण —

'नाही हो, नाही, मी तिला मारली नाही.' त्याचा आवाज घोगरा झाला. 'मी इथं आलो तेव्हा मला जाणवलं की, ती माझं सर्वस्व आहे. तिच्याशिवाय मी जगूच शकणार नाही !'

'नाही, खरच तिच्याशिवाय मी जगणं अशक्य आहे.' मग तो अचानक थांबला. पूर्ण शांतता पसरली. जणू काही आपल्या नकारांचा काही उपयोग नाही. त्यानं काही घडणार नाहीये.

'ते मूल ?' रॉजर.

'तो माझा मुलगा नाही.' पिरो म्हणाला. 'मला आता मुलगाही नाही आणि बायकोही नाही !'

'पहा, तुला हवं होतं ते सगळं मिळालंय.' दुसऱ्या दिवशी दुपारी कोर्टलॅण्ड यार्डच्या ऑफिसमध्ये समर्थन करीत होते. 'हेतू, संधी, आणि तिला ढकलल्याची कबुली सगळं आहे. आता क्षणैक वेडाच्या भरात आपण नुसतं ढकललं नाही तर गळा आवळून प्राण घेतलाय, हे न आठवणं सहज शक्य आहे. आता अजूनही तुझं समाधान झालेलं नाही असं सांगू नकोस !'

'खरंय, माझं अजूनही समाधान झालेलं नाही. बायको मेल्याची बातमी पूर्णपणे डोक्यात शिरल्यावर तो ज्या प्रकारे गप्प झाला त्यावरून अजूनही कुठं तरी चुकतंय असंच वाटतय. तो एक अक्षरही त्यानंतर बोललेला नाही. कारण बोलून काहीही उपयोग होणार नाही अशी त्याची खात्री पटली असावी. तो दहा बेचाळीसची वॉटर्लूहून सुटणारी गाडी पकडून आला या गोष्टीला दुजोरा मिळालाय. त्या दोघानी मधुचंद्राच्या वेळी फिरलेल्या जागेवर पाऊलखुणा शोधत तो इथं आला. त्या दोघांनी इतका काळ एकमेकांवर इतकं भरभरून प्रेम केलंय की, हे असं घडायला नक्की कशा कशा घटना घडल्या ते जाणून घेतलंच पाहिजे.

'तो बोलला नाही, तर दुसरं कोण बोलणार ?' कोर्टलॅण्ड.

'तो छोकरा बोलेल.' रॉजर हळूच म्हणाला. 'त्याला भेटायचं मला शक्यतो टाळायचं होतं ! आता मात्र त्याला काही प्रश्न नाइलाजानं विचारावे लागणार !'

इवलासा टोनी पिरो. रॉजरच्या तोंडाकडं आपल्या अनिमिष डोळ्यांनी पहात होता. बंगल्याजवळ तो उभा होता आणि रॉजर बाजूलाच हातात सिगरेट घेऊन बसला होता. त्याला कळत होतं की, मिसेस फ्रॉस्टना हा प्रकार फारसा आवडलेला नाही.

अत्यंत चांगल्या सवयी असलेला टोनी अत्यंत नम्रपणे म्हणाला, 'गुड मॉर्निंग, सर.' आणि रॉजर काही बोलेपर्यंत थांबला — 'तुला माहीत आहे मी कोण आहे ते.'

'हो, तुम्ही पोलिस आहात.'

'मी इथं का आलोय माहीत आहे तुला ?'

'आत्यानं सांगितलं की, तुम्हाला मला काही प्रश्न विचारायचेत.'

'बरोबर आहे, फार महत्त्वाचे प्रश्न आहेत ते ?'

'मला माहीत आहे, माझी ममी आजारी असल्याबद्दलचे आहेत. हो ना ?'

'हो, ती खरंच खूप आजारी आहे ?'

'डॉक्टर म्हणाले की ती आता मरणार आहे' टोनीनं न चाचरता जाहीर केलं, 'आणि म्हणाले की 'तिला काहीसुद्धा त्रास होणार नाही !'

'नाहीच होणार तिला त्रास !' रॉजरनं छोकऱ्याला आश्वासन दिलं, 'तू काल रात्री तिला भेटायला गेला होतास ?'

'नाही ! मी इकडे राहिलो होतो ना, मिसेस फ्रॉस्टकडे.'

'तिला शेवटचं केव्हा पाहिलंस ?'

'चिक्कार वेळ झाला.'

'तिला नक्की केव्हा भेटलास ती वेळ नीट आठवते ?'

'हो, म्हणजे काय ? नक्कीच ?'

'टोनी, सांग बरं, केव्हा भेटला होतास ?'

'काल रात्री नाही; पण त्याच्या आदल्या रात्री नक्की !'

'तू कुठे होतास ?'

'माझ्या बेडरूममध्ये.'

रॉजरनं आपले डोळे आश्चर्यानं विस्फारले. 'म्हणजे एक अख्खी बेडरूम तुझ्या एकट्यासाठी आहे ?'

'हो, आहेच मुळी !' टोनीचे डोळे लकाकले. तो पटकन वळला आणि बोट दाखवून म्हणाला, 'ती पहा तिकडे आहे.'

'मला बघायला आवडेल.' रॉजर उठत म्हणाला, 'दाखवशील मला ?'

'हो, चला !' टोनी उत्साहानं म्हणाला. 'मस्त मोठ्ठी खोली आहे. डॅडींनी माझ्या वाढदिवसासाठी खास तयार केली आहे.'

तो तुरुतुरु गेला आणि पटकन आपल्या खोलीचं दार उघडलं. रॉबिनहुडची चिन्हं भिंतीवर, कॉटवर, खेळण्यात सगळीकडे होती.

**'नाही हो, नाही, मी तिला मारली नाही.'—त्याचा आवाज घोगरा झाला.**

तो कंबरेवर हात ठेवून रॉजर केव्हा एकदा खूष होऊन बोलतो याची वाट पाहू लागला.

'वा! झकास!' रॉजर उद्‌गारला, 'अरे, हा तर रॉबिनहुड! बघ बघ, अरे एखाद्या वेळेस त्या धनुष्यातून बाण सुटेल हं!'

'हॅट्! ते तर नुसतं चित्र आहे.' टोनीनं दिलासा दिला.

'खरंच रे खरंच,' रॉजर म्हणाला. खोलीत पुन्हा एकवार नजर फिरवली. 'ममी गुडनाइट करायला आली होती का? म्हणजे त्या रात्री?'

'हो.'

'म्हणजे नेहमी येत असे तशीच?'

'होय.'

'ती तेव्हा आजारी होती का?'

'नव्हती. आजारी-विजारी नव्हती; पण नेहमीसारखी खुषीतही नव्हती.'

'फारच वाईट; पण तुला कसं कळलं?'

'कारण ती रडत होती.'

'खूप रडत होती का?'

'नाही. थोडीशीच रडत होती आणि आपलं रडणं माझ्यापासून लपवायचा प्रयत्न करत होती.'

'ती नेहमी अशी रडत असे का?'

'फार क्वचित केव्हा तरी!'

'त्यातल्या त्यात साधारणपणे केव्हा रडायची?'

'डॅडी आजारी होते तेव्हा. एकदा ख्रिसमसच्या वेळी डॅडीसाठी डॉक्टरना बोलवावं लागलं तेव्हा.'

'डॅडी चांगले असताना कधी रडली होती का?'

'छे! छे! कधीच नाही!'

'छान. पण काय रे त्या रात्री आई रडली तेव्हा डॅडी घरी होते का?'

'नाही. डॅडी तेव्हा घरात नव्हते.'

'ते घरी आल्याचं तुला ऐकू आलं होतं का?'

'हो. मग, मी त्यांची पावलं सहज ओळखतो. ममीसुद्धा ते आल्याचं ओळखते.'

'ते तुझ्याकडे येऊन तुला त्यांनी गुडनाइट केलं होतं का?'

'हो.'

'तेसुद्धा रडत होते का?'

'नो. डॅडी कधीच रडत नाहीत. ते तर पुरुष आहेत!' टोनी गर्वानं म्हणाला.

'हो रे हो! किती वेडा आहे मी; पण त्या रात्री ते खुशीत होते का?'

'माझ्याशी खुषीत होते बुवा!'

'नेहमीप्रमाणे?'

'हो, अगदी नेहमीप्रमाणे!'

'आईशी खुषीत बोलले का?'

'ऊं! सुरुवातीला होते.' टोनी विचार करून म्हणाला आणि एकदम धाडधाड बोलत राहिला. 'मग ते अचानक ममीवर ओरडले. एवढ्या मोठ्यानं की मी जागा झालो. मी बराच वेळ ते ऐकत राहिलो. डॅडी ओरडत राहिले आणि ममी रडत होती आणि मग तीही उलट त्यांच्यावर ओरडू लागली. मला ते मुळीच आवडलं नाही. म्हणून मग मी माझं डोकं उशी-चादरीत लपवलं!'

'चांगलं केलंस; पण तू डोकं बाहेर काढलंस तेव्हा भांडण चालू होतं का?'

'हो. भांडतच होते'

'दोघंही?'

'अं! नाही. फक्त डॅडीच ओरडत होते.'

'तू तेव्हा ममीचा आवाज ऐकलास का?'

'ती पुन्हा रडायला लागली होती.'

'खूप रडत होती का रे?'

'हो, भयंकर रडत होती!'

'डॅडी किती वेळ ओरडत होते?'

'नंतर फार वेळ नाही.' ते बाहेरच गेले मग.'

'तुला कसं कळलं?'

'त्यांनी धाडकन दार बंद केलेलं ऐकलं. मग बाहेर रस्त्यावर त्यांची पावलं ऐकायला आली. कधी नव्हे एवढे फास्ट चालत होते.'

'ते तेच होते का?'

'म्हणजे काय? तेच होते!'

'ममी नाही का गेली त्यांच्याबरोबर?'

'ती नुसती रडत होती. रडतच होती. टोनीला नुसत्या आठवणीनं भरून आलं होतं. मग थोड्या वेळानं शांत झालं! 'मला वाटलं ती झोपली असेल; पण ती आजारी झालीय हे काही कळलं नाही!'

'टोनी' रॉजरनं हळुवार विचारलं, 'मला जरा नीट विचार करून सांग की, डॅडी बाहेर गेल्यानंतरही आई रडत होती का?'

'हो ना. मग मघाशी काय सांगितलं?'

'खूप रडली का?'

'हो. अगदी खूप!'

'त्यानंतर ती तुझ्याजवळ आली होती का?'

'नाही. नव्हती आली.'

'नंतर काय झालं?'

'मी झोपून गेलो.' टोनी अत्यंत अलिप्तपणे बोलत होता 'आणि सकाळी ममीला उठवायला गेलो, ती उठेचना!'

'ठीक आहे.' रॉजरला आपल्या मनातली खळबळ टोनीपासून लपवून ठेवणं अवघड जात होतं. 'माझ्या प्रश्नांना फार छान उत्तरं दिलीस! हुषार आहेस. थँक्स. मी आता जातो; पण तुला पुन्हा नक्की भेटायला येईन. अच्छा!'

शेजारच्या खोलीत वही-पेन्सिल घेऊन बसलेल्या सार्जेण्टला विचारलं,

'सगळं लिहायला जमलं का?'

'अगदी प्रत्येक शब्दन् शब्द!'

'झक्क!' रॉजर झपाट्यानं बंगल्याबाहेर पडला. टांगा टाकत रस्त्यावर पोचला आणि तडक गाडीत बसला. आज त्या मानानं बघ्यांची गर्दी कमी होती. गाडीत बसल्या—बसल्या रेडिओचा खटका दाबला. संपर्क साधताच कोर्टलॅण्डशी जोड मागितली.

कोर्टलॅण्ड लगेचच रेडिओवर आले.

त्यांनी ताडकन विचारलं. ' भेटला का पिरोंचा छोकरा ?'

' हो. आजच बोलणं झालं. ' रॉजर म्हणाला, ' आणि आम्हाला कल्पनासुद्धा येणार नाही अशा खूप गोष्टी त्यानं सांगितल्या. आता मी जाऊन चार्लस् स्पेन्सरच्या काल रात्रीच्या सगळ्या हालचालीचा पुन्हा तपास करणार आहे. त्याच्या वडिलांनी त्याच्या काल रात्रीच्या ठावठिकाणाचा वेगळाच पुरावा तयार केलाय; पण तो मोडायला वेळ लागणार नाही. '

' ओय् अरे, काय चाललंय काय ?' कोर्टलॅण्डनी विचारणा केली.

' छोकरा सांगतो की, पिरो गेल्यानंतरही आई रडत होती. ' रॉजर म्हणाला. ' आणि जर ते खरं असेल तर तो गेला त्यानंतरही ती जिवंत होती. पिरो तसल्या रागाच्या भरात तिला ठार मारेल हे मी समजू शकतो; पण बाहेर जाऊन, शांत होऊन परत येईल आणि मग निर्ढावलेपणे तिला ठार मारील हे अशक्य आहे !'

' बाप रे, ' कोर्टलॅण्डनी रोखून धरलेला श्वास सोडला. ' आगे बढो, झपाट्यानं हालचाल करा !'

यार्ड आणि विभागीय लोक पुन्हा चौकशीला लागले आणि त्याचं फळ मिळायलाही फार वेळ लागला नाही.

चार्लस स्पेन्सरनं चेल्सामध्ये असलेलं आपल्या बापाचं घर खुनाच्या रात्री साडेनऊ वाजता सोडल होतं. पुरनी विभागातल्या बंगल्यावर वेळेवर पोचून मिसेस पिरोचा खून करायला भरपूर वेळ होता. त्याला बंगल्याजवळच्या एका रस्त्यावर त्या सुमाराला पहिल्याचं कुणी तरी निघालंच. तसंच त्या बंगल्याकडे चालत असलेलाही कुणी तरी पाहिल होतं त्याला प्रत्यक्ष बंगल्यात शिरलेलं कुणीही पाहिल नव्हतं; पण सुमारे तासाभरात आपल्या मोटारीतून परत फिरतानाही कुणी तरी पाहिलं होतं.

खुनाच्या तिसऱ्या दिवशी दुपारी फ्रेंच स्ट्रीटवरच्या ऑफिसमध्ये रॉजरनं चार्लस स्पेन्सरला गाठलं. आपल्या बापासारखं त्यानं आपलं निरपराधित्व सिद्ध करायचा प्रयत्न केला. प्रथम हळुवारपणे, मग थोडा अस्वस्थ होऊन; शेवटी भडकून. अखेरीस तो घाबरला. त्याचा गोल चेहरा लाल झाला. हाताच्या मुठींची रागानं उघडझाप होऊ लागली.

' मि स्पेन्सर तुम्ही मिसेस पिरोना भेटायला त्या रात्री का गेला होतात ? तिथं असताना काय काय घडलं ?' रॉजर कणखरपणे बोलत होता.

' हो, समजा मी त्यांना भेटलो असेन काही मिनिटं. हा काय गुन्हा आहे ? मी बघायला गेलो होतो की तिचं ठाकठीक आहे ना. मी निघालो तेव्हा ती छान होती. तिला भीती वाटत होती की, तिचा राक्षस नवरा निघून गेला होता; पण तो केव्हा परतेल आणि ठार मारेल. त्याप्रमाणे तो परत आला आणि तिचा गळा घोटला !'

' नाही, त्यानं तिला मारलेलं नाही !' रॉजर लख्ख बोलत होता. ' तो पुरनी स्टेशनवर चालत गेला. तिथं वीस मिनिटं थांबला. वॉट - र्लूला जाणारी गाडी पकडली आणि तिथून दहा-बेचाळीसच्या मेलनं बोर्नमाउथला गेला. तेव्हा त्याला बंगल्यावर परत जायला वेळच मिळालेला नाही. मि. स्पेन्सर, तुम्ही मिसेस पिरोला ठार का केलंत?'

' तुम्ही त्या छोकऱ्याला पुन्हा बोलतं केलंत ते बरं केलंत. ' दुसऱ्या दिवशी भेटल्या-भेटल्याच कोर्टलॅण्ड म्हणाले, ' पण आता खुनाच्या हेतूचं काय ? त्याचा काही माग लागतो का ?'

' तो तर आता स्पष्टच झालाय. ' रॉजर खुलासा करू लागला. ' चार्लस स्पेन्सर आपली प्रेयसी गटवल्याबद्दल पिरोवर खार खाऊन होताच. जेव्हा त्यानं मुलाला पाहिलं तेव्हा जुना द्वेष पुन्हा उफाळून आला. अर्थात मिसेस पिरो मारायचं त्याच्या मनात होतं की नाही आपल्याला कधी कळेल की नाही शंका आहे. तो तिथं कदाचित जुने संबंध पुन्हा प्रस्थापित करण्याच्या उद्देशानं गेला असावा; पण त्यामुळं पिरो चिडला असणार. त्याचा हेतू काहीही असो तो आता पुरता अडकलाय !'

' सगळ्यात वाईट गोष्ट म्हणजे आता या टोनीचं काय करायचं ?' कोर्टलॅण्ड काळजीयुक्त स्वरात म्हणाले.

' पिरो आज संध्याकाळी टोनीला भेटणार आहे. ' रॉजर म्हणाला, ' त्याच्यासारख्या सहृदय प्रेमळ माणसाला सहा वर्षं अशी सहजी-सहजा फेकून देता येणार नाहीत. सहा वर्षं कशाला, एखादं मूल तुम्हाला सहा आठवड्यात वेड लावू शकतं. मला खात्री आहे यातून चागलंच निघेल !'

' छान !' कोर्टलॅण्ड विषय आवरता घेत म्हणाले, ' चला गुरू, पेकहॅममधलं एक प्रकरण तुमची वाट पहातय...'

□

---


" एका वेगळ्या विषयावर भर देणारी ही कादंबरी. स्त्री-बुवाबाजीच्या प्रकारांमागचे मर्म उलगडून सागणारी. कुठलंही भाष्य न करता एक सत्यघटना जशीच्या तशी माडल्याने झपाटून टाकण्याचे चागलेच सामर्थ्य या कादंबरीला लाभलंय. त्याच त्या प्रेमाच्या त्रिकोणकथांपेक्षा एक महत्त्वाचा सामाजिक विचार लालित्यपूर्णतेने या नवोदित लेखकाने घडवलाय, त्यामुळे बुवाबाजीसारख्या गोष्टींबाबत वाचक अधिक जागरूक बनतील. "

**पुस्तक पंढरी / ऑगस्ट १९८२ अंक**
**बॉंबे बुक क्लब-ऑगस्ट निवड**

# सबला

लेखक : माधव शिरवळकर.

राजहंस प्रकाशन, पुणे ३०

मूल्य : रुपये बारा

# असं !!

अनेकदा झाडाच्या खोडाला कुठल्या ना कुठल्या कारणाने जखमा होतात, त्याच-प्रमाणे काही पक्षी व कीटकसुद्धा खोड पोखरण्याचा प्रयत्न करतात; परंतु अशा जखमांपासून झाडाचा बचाव व्हावा म्हणून निसर्गाने एक अजब युक्ती योजून ठेवलेली आहे.

जेव्हा झाडाला एखादी जखम होते तेव्हा त्या झाडाच्या जखमेतून एक प्रकारचा चिकट पदार्थ हळूहळू बाहेर स्रवू लागतो. वेगवेगळ्या प्रकारचे चिकट द्रावण बाहेर येते. उदाहर-नार्थ डिंक, खर किंवा राळ हे पदार्थ वाहून बाहेर येतात. कारण त्याच्यामध्ये अतिशय पातळ असे टर्पेंटाइन असते. झाडाच्या बाहेर आले की, ते पटकन उडून जाते व त्यामुळे जखमेवर एक चिकट गोळा तयार होतो. आता समजा एखादा कीटक या 'ओल्या जखमेवर' येऊन बसला तर तो या चिकट पदार्थाला जाम चिकटून बसतो. अनेकदा अशा चिकटलेल्या कीटकांना अजून ओल्या अस-लेल्या जखमेतून जो स्राव बाहेर येतो त्या स्रावामध्ये बुडून जावे लागते. त्यानंतर काही दिवसांनी हा चिकट पदार्थ एकदम टणक आणि पारदर्शक बनतो. त्यामुळे आज जगा-तले कित्येक नामशेष झालेले कीटक हे या कडक आणि पारदर्शक अवशेषाच्या रूपाने मिळवण्याचे उत्तम साधन झालेले आहे.

हा कडक बनलेला द्राव म्हणजेच खपली. ही खपली धरल्यावर हळूहळू झाडाची जखम बरी होते.

¤

आज जगात जी काही रंगत आहे ती रंगा-मुळेच आहे. रंगीत पक्षी, रंगीत फुले, फुलपाखरे त्यांच्या विशिष्ट रंगामुळेच खुलून दिसतात. समजा जगात फक्त काळा आणि पांढरा हेच दोन रंग असते, तर आपल्याला रुक्ष आणि भकास दिसले असते; पण हे रंग आपल्याला का व कसे दिसतात याचा आपण विचार कधी केलेला असेल असे मला वाटत नाही. रस्ता काळाच का दिसतो? पानं हिरवीच का दिसतात?

त्याचं उत्तर असं आहे, सूर्यप्रकाश सात रंगांनी बनलेला आहे. जेव्हा सूर्याची किरणं एखाद्या वस्तूवर पडतात तेव्हा ती किरणं कमीजास्त प्रमाणात परावर्तित होतात. उदा-हरणार्थ एक गुलाबाचे लाल रंगाचे फूल घ्या. या फुलावर प्रकाश पडतो व परावर्तित होतो; परंतु प्रकाश परावर्तित होताना त्याच्यातल्या सात रंगांपैकी फक्त लाल रंगच परावर्तित होतो व बाकीचे रंग हे शोषले जातात. त्याच-प्रमाणे एखादी वस्तू जर काळी दिसत असेल तर त्याचा अर्थ तिच्यामधून कोणताही प्रकाश परावर्तित होत नाही. सर्वच्या सर्व शोषला जातो.

अशा प्रकारे वेगवेगळ्या रंगांची संवेदना आपल्याला होते.

¤

फुलपाखरांमध्ये एकमेकांना आकर्षित कर-ण्याच्या अनेक तऱ्हा आहेत. त्यातली सर्वांत मजेदार म्हणजे, वासाच्या सहाय्याने आकर्षित करण्याचा प्रकार म्हणावा लागेल.

काही जातीच्या फुलपाखरांच्या मादया एक विशिष्ट प्रकारचा वास सतत सोडत असतात. हा वास इतका सूक्ष्म असतो की, तो मानवाला अजिबात येत नाही; पण नर मात्र कित्येक मैलावरून हा वास ओळखू शकतात. एकदा अकरा मैलावरून नर 'वास काढत' आल्याचे एका शास्त्रज्ञाने नमूद केलेले आहे.

मादीने सोडलेला गंध भयंकर उग्र असतो. त्यामुळे हवेत तो अतिशय कमी प्रमाणात असला तरी नर व्यवस्थित ओळखू शकतो. नराची ग्रहणशक्तीसुद्धा अतिशय संवेदनाक्षम असते. त्याच्या दोन्ही सोडांमुळे त्याला वास नेमका कुठून जास्त येतो आहे ते बरोबर समजते. समजा त्याची एक सोड काढून टाकली तर त्याला दिशा सापडणे अशक्य होऊन जाते.

एकदा एका प्रयोगात एका फुलपाखराची मादी एका जंगलात एका पिंजऱ्यात बंद करून ठेवली. तिने सोडलेल्या गंधामुळे तीन तासा-मध्ये शंभर मोठे नर आकर्षित झाल्याचे आढळून आले!

¤

भारतामध्ये अनेक नद्या किंवा तलावामध्ये एक हिरव्या रंगाची वनस्पती तरंगताना आपण अनेकदा पाहिली असेल. तिचे नाव सालव्हेनिया. हिचे वैशिष्टय म्हणजे तिची झपाट्याने होणारी वाढ. विषारी फवाऱ्यांचा-सुद्धा सालव्हेनियावर काहीही परिणाम होत नाही. त्यामुळेच तिचा नायनाट करणे हे एक क्लिष्ट व खर्चिक काम होऊन बसले आहे. या वनस्पतीचा दुसरा तोटा असा की, मासे-मारी करणे अगदी दुरापास्त होऊन जाते.

परंतु ऑस्ट्रेलियात नुकताच एक प्रयोग या वनस्पतीचा नायनाट करण्यासाठी कर-ण्यात आला. एक काळ्या रंगाचा छोटा पतंग (Moth) ही वनस्पती अतिशय झपा-ट्याने फस्त करतो असे काही शास्त्रज्ञांच्या लक्षात आले. त्यांनी या पतंगाची पैदास केली आणि एक दिवस आठशे पतंग एका तलावात सोडले. या तलावात कित्येक एकर पाण्याचा पृष्ठभाग या वनस्पतीमुळे झाकला गेला होता. एक वर्षानंतर हे संपूर्ण तळे एक-दम स्वच्छ झालेले होते; पण त्याच वेळी आणखी एक प्रश्न शास्त्रज्ञांना पडला. या एक वर्षाच्या अवधीमध्ये काळ्या पतंगांची संख्या भरमसाठ वाढली होती. आता जर का त्यांनी जवळपासच्या शेतकऱ्यांच्या शेतावर हल्ला केला असता तर 'भीक नको पण कुत्रा आवर' अशी अवस्था झाली असती, परतु सुदैवाने ही भिती फोल ठरली. हा काळा पतंग फक्त सालव्हेनियावरच जगू शकतो असे लक्षात आले. त्यामुळे वनस्पती संपल्यावर काही दिवसात हा कीटकसुद्धा भुकेमुळे नष्ट झाला!

¤

—अमृत पुरंदरे

## चित्रपट

# शोले, शान आणि शक्ती

दिलीपकुमार आणि अमिताभ बच्चन— दोघंही जण आपापल्या काळात अभिनयाच्या बाबतीत शेवटचा शब्द मानले गेलेले— आणि तरीही दोघंहीजण आतापर्यंत कधीच एकत्र न आलेले. त्यामुळं सगळ्यांच्या मनात खोलवर कुठे तरी एक उत्सुकता; पण हे दोन अभिनयसम्राट रमेश सिप्पींच्या 'शक्ती 'मध्ये समोरासमोर शड्डू ठोकून उभे राह्यले आणि लोकांच्या मनातली अपार उत्सुकता चाळवली गेली आणि 'शक्ती '-विषयीच्या चर्चेला तोंड फुटलं.

दिलीप श्रेष्ठ ठरेल का अमिताभ ?

दोघांपैकी कोण कुणाची छुट्टी करणार ? पैजा लागत होत्या. वाद रंगत होता. तशातच अमिताभला तो भयंकर अपघात झाला— अपघाताच्या उलटसुलट चर्चा. अमिताभच्याच भविष्याची शाश्वती नाही तर अमिताभच्या आगामी चित्रपटांचं भविष्य काय ? आगामी चित्रपटांपैकी एक 'शक्ती '; पण 'शक्ती ' युनिटच्या सुदैवानं 'शक्ती ' पूर्ण झाला होता. फक्त अमिताभचं 'शक्ती 'तलं एक गाणं काढून टाकून त्याच्याऐवजी दुसरं गाणं घालण्याचे प्लॅन्स रमेश सिप्पींच्या मनात खदखदत होते; पण त्यासाठी थांबायचं म्हटलं तर किती थांबावं लागेल याची खात्री देता येत नव्हती. त्यामुळं शेवटी तापल्या तव्यावर पोळी भाजून घ्यायचं ठरलं आणि 'शक्ती ' प्रदर्शित झाला.

पण 'शक्ती' प्रदर्शित व्हायच्या आदल्याच दिवशी मुशीब—रियाझ या निर्माता-द्वयीपैकी एकाला पळवून नेलं. पाच लाखांच्या बोलीवर पळवून नेणाऱ्यांनी निर्मात्याला सोडण्याची 'कृपा' दाखवली—सगळं काही फिल्मी स्टाइलमध्ये चाललेलं. त्यामुळं 'शक्ती ' च्या प्रसिद्धीला वेगळंच वळण मिळालं.

तशातच अमिताभच्या आजारपणाचा फायदा घेऊन आपल्यावर मात करणारे अमिताभचे सगळे प्रसंग दिलीपकुमारनं सफाईदारपणे 'एडिट' केल्याची बातमी सगळीकडे पसरली आणि 'शक्ती ' च्या चर्चेला नवा रंग भरला.

एकूण काय—या ना त्या कारणांनी 'शक्ती'-विषयीच्या चर्चा रंगत होत्या—आपोआप प्रसिद्धी मिळत होती—हवा निर्माण होत होती— याचा योग्य तो परिणाम बॉक्स-ऑफिसवर झाला आणि रमेश सिप्पींची ढेपाळलेली 'शान ' परत आली.

अर्थात 'शक्ती ' चा असा उदोउदो होत असताना 'शोले ' ची आठवण झाली. दिग्दर्शक म्हणून रमेश सिप्पींना एकदम टॉपवर नेऊन पोचवणारा हा चित्रपट. काही वर्षांपूर्वी 'शोले' पडद्यावर झळकला तेव्हा या चित्रपटानं असा काही जादूई परिणाम घडवून आणला होता की, 'शोले' शिवाय कुणाला काही सुचत नव्हतं. रेडिओवर आर. डी. चं 'मेहबूबा मेहबूबा ' यथेच्छ धुमाकूळ घालत असायचं तर रस्त्यातून चालायला लागलं तरी गल्लीबोळातून एखाद्या 'गब्बरसिंग 'ची 'अरी ओ सांबा ' अशी सणसणीत हाक ऐकू यायची. 'शोले ' नं तेव्हा निर्माण केलेले उत्पन्नाचे उच्चांक आतापर्यंत अगदी अबाधित राहिले होते; पण गेल्या वर्षी प्रचंड हीट ठरलेल्या 'एक दूजे के लिए ' नं 'शोले' चे हे उच्चांक काही भागात जरी मोडले असले तरी 'शोले ' चं अबाधित यश मात्र 'एक दूजे के लिए ' नं मिळवलेलं नाही.

'अंदाज ' आणि 'सीता और गीता ' असे अवघे दोनच चित्रपट खात्यावर जमा असताना 'शोले' सारख्या बिग बजेट आणि मल्टिकास्ट चित्रपटाला रमेश सिप्पीनं हात घालणं हे फार मोठं धाडसच होतं; पण त्यात रमेश सिप्पी पूर्णपणे यशस्वी झाले आणि 'शोले ' नं चित्रपटसृष्टीत एक इतिहास निर्माण केला. 'शोले ' च्या अफाट यशानं हुरळून गेलेल्या निर्माता—दिग्दर्शकांची एकच लाट चित्रपटसृष्टीत आली आणि मल्टिस्टार बिग बजेट चित्रपटांची एक भलीमोठी मा.लकाच तयार झाली. यातले काही चित्रपट पडले, काही यशस्वी ठरले; पण अर्थात 'शोले ' ची उंची मात्र कुणीच गाठली नाही.

'शोले ' चं हे निर्विवाद यश कुणाकडे जातं ?

रमेश सिप्पींच्या सफाईदार दिग्दर्शनाकडे?

सलीम जावेदच्या खटकेबाज संवादांकडे?

का संजीवकुमार, अमिताभ बच्चन, धर्मेंद्र यांच्या अभिनयाकडे ?

तर उत्तरादाखल या यशाचं क्रेडिट कुणाला एकाला न देता या सगळ्यांनाच द्यायला लागेल. कारण 'शोले 'च्या निमित्तानं बिग बजेट, मल्टिस्टारर चित्रपटांचा जो पाया रमेश सिप्पीनं घातला होता, तो संपूर्णपणे नवीन होता. आतापर्यंत चालणाऱ्या वन मॅन शोपेक्षा आघाडीच्या अनेक कलावंतांना एकत्र आणण्याची ही कल्पना सामान्य माणसाच्या मनाला निश्चितच पटण्यासारखी होती आणि झालंही तसंच. याशिवाय नायक-खलनायक यांच्यातली हाणामारी, धर्मेंद्र—हेमामालिनी यांच्यातले अवखळ प्रणयप्रसंग, अमिताभ—जयामधलं अबोल, सूचक प्रेम, धर्मेंद्रची कॉमेडी यांच्या निमित्तानं सामान्य माणसाला आकर्षित करून घेणारे किंवा त्यांचं निखळ मनोरंजन सहजी करू शकतील अशा सगळ्याच मुद्द्यांचा खोलवर विचार केल्याचं आणि कल्पकतेनं चित्रपटात समावेश केल्याचं दिसून येतं. सलीम—जावेद यांच्या संवादांनी तर लोकांना इतकं काही वेड लावलं की, 'शोले 'च्या नुसत्या संवादांचीही रेकॉर्ड निघाली !

संजीवकुमार, अमिताभ बच्चन, धर्मेंद्र यांच्यासारख्या अभिनयाच्या बाबतीत रथी—महारथी समजल्या गेलेल्या नटांच्या सहज-सुंदर अभिनयाचा 'शोले 'च्या यशात जितका वाटा होता, तितकाच या चित्रपटात नव्यानं आलेल्या अमजद खानचाही होता.

'शोले 'नं इतर अनेक बाबतीत जशी नवी दिशा दाखवली तशीच 'खलनायक ' या व्यक्तिरेखेलाही एक नवी दिशा दिली. एक डोळा बारीक करत बोलणारा प्राण, एक भुवई वर उडवून बोलणारा के. एन. सिंग, छद्मी हसत बोलणारा प्रेम चोप्रा— इत्यादि त्या काळातील जानेमाने खलनायक; पण या खलनायकांची खलनायकी खूपशी अदाकारीतच गुंतलेली होती. त्यामुळे शेवटी-शेवटी त्याचा अतिरेक होई. खलनायक हा प्रकार कंटाळवाणा किंवा नाविन्याचा अभाव असल्याने नीरस वाटायला लागला; पण 'शोले ' च्या गब्बरसिंगच्या खलनायकाचा



**दोन शक्तींची अशी ही झुंज !**

□

चेहरामोहराच पार बदलून टाकला. गब्बरसिंगच्या एकंदरीत प्रतिमेला साजेशी अशी अमजद खानची देहयष्टी, रफ चेहरा, गडगडाट करीत हसणं, चेहऱ्यावरचे कायम तुच्छ भाव, समोरच्याला कमी लेखून पदोपदी पाणउतारा करण्याची त्याची सवय...या साऱ्यांच्या एकत्रीकरणातून गब्बरची ही व्यक्तिरेखा आतापर्यंतच्या खलनायकांपेक्षा अधिक वेगळी आणि अधिक उजवी ठरली. अमजदचा हा गब्बर अगदी लहानांपासून मोठ्यांपर्यंत सगळ्यांना भावला याचं मुख्य कारणच या वेगळेपणात आहे. कारण खलनायकाच्या ठरीव साच्यापेक्षा वेगळं समाधान त्यांना मिळालं होतं. त्यामुळं शेवटी रमेश सिप्पीच्या दिग्दर्शनापेक्षा, सलीम–जावेदच्या संवादांपेक्षा, संजीव, अमिताभ, धर्मेंद्र यांच्या अभिनयापेक्षा अमजदचा गब्बरसिंग अधिक लक्षात राहिला आणि 'गब्बरसिंग–शोले' हे एक समीकरणच बनून गेलं. अर्थात पुन्हा एकदा हिंदी निर्माता–दिग्दर्शकांनी अमजदची ही 'गब्बर' भूमिका इतक्या चित्रपटांतून रिपीट केली की, त्यातली मजा तर गेलीच पण अमजदही परत कधी इतका यशस्वी होऊ शकला नाही !

'शोलेनंतर रमेश सिप्पींनी एकदम दोन चित्रपटांना सुरुवात केली. 'शान' आणि 'शक्ती'. त्यापैकी 'शान' हा 'शोले'पेक्षाही भव्य प्रमाणावर काढायचं रमेश सिप्पींनी ठरवलं. कारण 'शोले' नंतर सिप्पीकडून लोकांच्या अपेक्षा फार वाढलेल्या होत्या आणि या अपेक्षा आपल्याला पूर्ण करायच्या आहेत, ही खूणगाठ मनाशी बांधून 'शान' ला सुरुवात करण्यात आली. 'कोटचवधी रुपये खर्च करून काढलेला चित्रपट' अशी जोरदार जाहिरात त्या वेळेस करण्यात येत होती. लोकांच्या वाढलेल्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी, 'शोले'पेक्षाही अधिक 'शान'-दार चित्रपट तयार करण्याच्या दृष्टीने 'शोले'तला खेडवळ सेटअप पूर्णपणे बदलून शहरी वातावरण घेण्यात आलं. बॉण्डपटाचा आभास चित्रपटात निर्माण केला. त्यामुळे भव्य सेटिंग, यांत्रिक करामती अशा भव्य-दिव्य गोष्टींना या चित्रपटात फार मोठ्या प्रमाणावर थारा मिळाला; पण याचा मुख्य परिणाम असा झाला की, 'शोले' जसा कथेच्या अंगानं फुलत गेला, तसं 'शान'च्या बाबतीत झालं नाही. तिथे कथेऐवजी आधी वातावरणनिर्मिती झाली आणि त्या वातावरणास साजेशी अशी कथा तयार करण्यात आली. त्यामुळं 'शान' म्हणजे 'शोले'तल्या पात्रांना पाश्चिमात्य किंवा सोफिस्टिकेटेड रूप दिल्यासारखं वाटलं आणि 'शोले' व 'शान'च्या फक्त बाह्यस्वरूपातच झालेला हा बदल फारसा सुखावह ठरला नाही. आधी विशिष्ट चौकट तयार करून त्यात घुमडलेल्या कथेमुळं 'शान'चा तोल ढळला किंवा लोकांच्या वाढत्या अपेक्षांच्या मागणीची सिप्पींना नीटशी कल्पना आली नाही, असं म्हणावं लागेल. कारण 'शोले'त जसा हाणामारी, रोमान्स, कॉमेडी या मनोरंजनात्मक मुद्द्यांचा समन्वय समतोलपणे साधला गेला होता, त्यामुळं 'शोले'च्या कथानकाला एक सुसूत्रता जशी प्राप्त झाली होती, या गोष्टीचा 'शान'मध्ये पूर्णपणे अभाव आढळून आला आणि त्यामुळं 'शान' म्हणजे उरला तो फक्त एक 'ॲक्शन पॅक्ड ड्रामा' की ज्याच्याशी प्रेक्षकांचा सुसंवाद कधीच साधला गेला नाही.

'शोले'तील गब्बरला 'शान' मधील शाकाल ही साधर्म्य दाखवणारी भूमिका. 'शाकाल'च्या व्यक्तिरेखेसाठी रमेश सिप्पी आणि सलीम जावेद यांनी विशेष कष्ट घेतले होते. 'शाकाल'च्या वेशभूषेपासून ते त्याच्या संवादांपर्यंत, वागण्या–बोलण्याच्या पद्धतीपर्यंत त्याची वेगळी छाप पाडण्याच्या दृष्टीने केलेले प्रयत्न स्पष्टपणे जाणवत असतानाही सिप्पी–सलीम जावेद यांचं गणित कुठं चुकलं कुणास ठाऊक; पण लोकांनी जितक्या सहजतेनं गब्बर स्वीकारला, तितक्याच सहजतेनं त्यांनी शाकालला दूर लोटला. कारण एकंदरीतच शाकालचं पाश्चिमात्य व्यक्तिमत्त्व, त्याचा वेष, डोक्याचा चमनगोटा यामुळं शाकाल आणि प्रेक्षक यांच्यात शेवटपर्यंत राहिलेला हा दुरावा रमेश सिप्पींना गाळात घेऊन गेला. 'शोले' चीच सगळी टीम असताना, 'शोले'नं इतकं अफाट यश मिळवलेलं असताना त्याच लोकांचा चित्रपट इतका सपाटून आपटावा–हा चमत्कार चित्रपटसृष्टीत बघायला मिळाला ! 'शोले'च्या टीमचं यश 'शान'च्या अपयशानं पुसून टाकलं. १९८० ची सुरुवात 'खूबसूरत'पणे झाल्यानंतर शेवटही 'शान दार व्हावा–या अपेक्षेत सगळेजण असताना 'शान'च्या अनपेक्षित अपयशानं सगळ्यांच्याच अपेक्षांना तडा गेला.

### शक्तीचं व्यावसायिक गणित

अशा चढउताराच्या अवस्थेतून जात असतानाचं रमेश सिप्पीनी 'शान 'नंतर नव्या उमेदीनं 'शान 'च्या बरोबरीनं सुरू केलेल्या 'शक्ती 'त 'शान 'मधल्या चुका वगळून आणि 'शोले 'मधील यशाचं गमक याची सांगड घालत पुन्हा सुरुवात केली. 'शक्ती' हा 'गोल्ड मेडल' या शिवाजी गणेशनची भूमिका असलेल्या दाक्षिणात्य चित्रपटाचा रीमेक. 'बाप–मुलामधील संघर्ष' हा अगदी सर्वसामान्य माणसाच्या आयुष्याशी जवळीक साधणारा प्रश्न–हाच 'शक्ती 'चा कथाविषय. मुळातील तामिळ चित्रपटात मुलाची भूमिका जराशी डावीच; पण अमिताभला मुलाच्या भूमिकेत चमकवायचं म्हणजे ही भूमिका दुय्यम असून चालणार नाही. त्यामुळं सलीम-जावेदनी आपल्या लेखण्या सरसावल्या आणि बाप–लेकाच्या भूमिका तराजूत तोलल्या-सारख्या स्थिर झाल्या. आता बाप–लेकातील संघर्ष हा विषय चित्रपटसृष्टीला फारसा नवीन नाही. कारण याच प्रकारचा संघर्ष हाताळणारा 'दीवार' हा चित्रपट काही वर्षापूर्वी येऊन गेलेलाच आहे याशिवाय 'शक्ती 'चाच विषय भासणारा 'फर्ज और कानून' हा आणखी एक चित्रपट 'शक्ती '-च्याच बरोबरीनं सेटवर गेला. फरक इतकाच यात जितेंद्रनंच बाप–मुलाची दुहेरी भूमिका केली होती. त्यामुळं 'फर्ज और कानून 'च्या निर्मात्यानं 'शक्ती 'च्या आधी चित्रपट प्रदर्शित झाल्यास त्याचा आपल्याला जास्त फायदा होईल, या उद्देशानं घाईघाईनं चित्रपट पूर्ण केला आणि लावला; पण 'फर्ज और कानून' लागून पडूनही गेला. त्याचा 'शक्ती 'वर काहीही परिणाम झाला नाही.

वास्तविक विषय एकच; पण एक चालला तर एक पडला. याचं कारण रमेश सिप्पीनी अमिताभ–दिलीपला एकत्र आणण्यात तसच इतके दिवस अमिताभच्या प्रेयसीची भूमिका करत असलेल्या राखीला अमिताभच्या आईची भूमिका करायला लावण्यात...अशा गोष्टीत दाखवलेल्या कल्पकतेत आहे. 'शान' आणि 'शक्ती 'चं चित्रीकरण हातात हात घालून जात असतानाच १९७७ मध्ये अमिताभ काविळीनं आजारी पडल्यानं 'शक्ती' मागं राहिला. त्या अवधीत 'शान' पूर्ण झाला, प्रदर्शित झाला आणि पडलाही! तेव्हा 'शान 'च्या अपयशाची काही कारणं गृहीत धरून रमेश सिप्पींनी 'शक्ती 'च्या काही प्रसंगांमध्ये फेरफार घडवून आणले. कथेला वेगळं वळण दिलं. 'शक्ती 'ची कथा फक्त बाप–लेकांतील संघर्षापुरतीच मर्यादित न ठेवता या संघर्षाचा दोघांच्या कात्रीत सापडलेल्या आईवर काय परिणाम होतो, हे दाखवून या चित्रपटाला अधिक भावनात्मक (किंवा मेलोड्रॅमॅटिक) टच देण्याचा प्रयत्न केला आणि 'शक्ती' पूर्ण झाला.

'शोले', 'शक्ती' आणि 'शान' या तिन्हीत अमिताभ हा कॉमन फॅक्टर. 'शोले 'त जेव्हा अमिताभला त्यांनी प्रथम घेतलं तेव्हा अमिताभ नावाची जादू चित्रपटसृष्टीवर आणि चित्रपटशौकिनांवर तितकीशी पसरली नव्हती; पण 'शोले 'तला अमिताभचा संयत अभिनय हा प्रेक्षकांच्यावर एक वेगळीच छाप निश्चितच पाडून गेला होता; पण 'शान 'च्या सुमारास अमिताभची 'अँग्री यंग मॅन' इमेज तयार झाली होती आणि 'शान 'च्या आधी तयार केलेल्या चौकटीत अमिताभची 'अँग्री यंग मॅन 'ची चौकटही ध्यानात घरण्यात आली होती. अर्थात त्या दृष्टीनं जरी अमिताभची व्यक्तिरेखा रंगवण्यात आली होती, तरी अमिताभनं ही भूमिका नेहमीच्याच सफाईदारपणे रंगवली आणि त्या भूमिकेला योग्य तो न्याय दिला; पण 'शक्ती 'च्या वेळेपर्यंत अमिताभच्या 'अँग्री यंग मॅन' इमेजमध्ये तोच–तोचपणा यायला लागला होता आणि त्यामुळं 'शक्ती 'त अमिताभच्या अभिनयाबद्दल मुद्दाम बोलावं असं वेगळेपण जाणवत नाही. अमिताभ आणि दिलीपकुमार यांच्यातील अभिनयाच्या जुगलबंदीचाच विचार करायचा झाला तर अमिताभच्या अभिनयाचा परिणाम कमी होतो, याचं मुख्य कारणच त्याच्या तयार झालेल्या 'इमेज 'मुळं हेच असावं. उलट खूप दिवसांनी अशा ताकदीच्या भूमिकेत आलेल्या दिलीपकुमारचा परिणाम जास्त होतो. तसंच 'शक्ती 'त दिलीपकुमार, अमिताभ बच्चन आणि राखी यांच्याबरोबर स्मिता पाटील हिलाही या चित्रपटात भूमिका आहे; पण प्रत्यक्ष शक्तीत मात्र स्मिताची भूमिका पाहिल्यानंतर स्मितासारख्या अभिनेत्रीनं असली भूमिका का स्वीकारावी असा प्रश्न पडतो. कमर्शियल सेटअपमध्ये स्मिता पाटील कधीच यशस्वी झाली नाही किंवा यशस्वी झाली नाही म्हणण्यापेक्षा ती त्या सेटअपमध्ये चपखलपणे बसली नाही. कारण आतापर्यंत तिच व्यावसायिक चित्रपटातलं उपरेपण स्पष्ट झालंच आहे आणि तीच पुनरावृत्ती 'शक्ती 'तही आढळते. अमिताभबरोबरच्या प्रसंगांमध्ये स्मिता रंगून गेली आहे, असं फीलिंग कुठंच येत नाही आणि मग वाटतं की, केवळ अमिताभबरोबर काम करायला मिळतं आहे, म्हणून स्मितानं ही भूमिका स्वीकारली का ? पण स्मितासारख्या स्वतःच्या बळावर चित्रपट यशस्वी करणाऱ्या अभिनेत्रीला असला बेगडी सहारा घ्यायची गरजच काय ? याउलट दिलीपकुमारची पत्नी आणि अमिताभची आई अशा दोन स्वरूपातून भावनाचे किंवा मानसिक ताणतणावाचे आविष्कार करताना राखीच जास्त परिणामकारक ठरली आहे. 'शोले 'त जया भादुरी, 'शान' आणि 'शक्ती 'मध्ये राखी या नकळतच प्रेक्षकाची सहानुभूती मिळवून जातात आणि सिप्पीचा हेतू सफल होतो. राखीचं हे बदलतं स्वरूप निश्चितच स्वागतार्ह आहे आणि त्यामुळं 'शक्ती' हा अमिताभ किंवा स्मिताचा चित्रपट न वाटता दिलीप–राखीचा चित्रपट वाटतो आणि हे सगळे मुद्दे लक्षात घेतले तरी सिप्पीचा 'शोले' जसा विविध अंगानी यशस्वी ठरला, त्या दृष्टीनं पाहिलं तर 'शक्ती 'चं यश हे मर्यादित मानावं लागेल. कारण त्यात योजकतेपेक्षा आजूबाजूच्या परिस्थितीनुसार किंवा सामान्य माणसाच्या जडणघडणीनुसार दाखवलेल्या कल्पकतेचा भाग जास्त आहे. तसंच प्राप्त परिस्थितीनुसार 'शक्ती' ला मिळत गेलेली प्रसिद्धी आणि त्यायोगे यश हे 'शोले 'पेक्षा जास्त प्रमाणात मिळालं त्यामुळं 'शक्ती 'नं शानचं अपयश पुसून टाकलं. हें काही टक्के मान्य केलं तरी 'शक्ती 'ची गणना १०० नंबरी सोन्यात करत येणार नाही.

–शुभदा रानडे

MANOOS ( Marathi Weekly ) Two Rupees Regd. No. PNC—W 28
( Licensed to post without prepayment of postage–No. 11 )

